म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ललित
क्र. ३२६२



मा णू स

REFBK-0025605

स रो जा प रू ळ क र

प्रकाशक
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

© सरोजा परुळकर
बसंत बहार, ११९ब
प्रभात रोड, पुणे ४११ ००४

प्रकाशनकाल : प्रथमावृत्ती
१ फेब्रुवारी १९८८

मुखपृष्ठ
सुभाष अवचट

किंमत ३५ रुपये

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१।४ सदाशिव पेठ
टिळक रोड, पुणे ३०

स्वसंवेद्या

मी एक बाई माणूस आहे. माझं नाव सरोजा. शालिनी व वसंत वायंगणकर या आई-बापाच्या घरी जन्माला आले. अविनाश व सतीश या दोघा भावांच्या संगतीत त्यांची ताई म्हणून मोठी झाले. मी विवाहित आहे. माझ्या नवऱ्याचं नाव विजय परुळकर. मी आई आहे. माधवी, स्वाती, राधा व मुक्ता ह्या माझ्या मुलींनी हे 'आईपण' मला देऊ केलंय. बाई माणूसपणाबद्दल लिखाण करण्यासाठी एव्हढा अधिकार पुरेसा नाही का?

आज आयुष्याची चाळिशी ओलांडली. वर्षामागून वर्षे जातच असतात. माणसांची ये-जा प्रत्येकाच्याच जीवनात होते. माझ्याही आयुष्यात खूप स्त्री-पुरुष जीवाला चटका लावून गेले. हुरहूर लावून गेले. जीव लावून गेले. ह्या जवळिकीत आपली सुखदुःखे फार फार मनमोकळेपणी बहुतेकांनी उघडी केली. का कुणास ठाऊक? अगदी उच्चभ्रू समाजापासून साधं जगण्याचा आनंदही नाकारलेल्या लोकांच्यात मी मिसळून गेले. विविध स्वभावधर्माच्या, विविध परिस्थितीत टांगलेल्या व्यक्तींच्याबरोबर मीही उंच-खाली झोके घेतले. त्यांच्या हसण्यानं हरखले. दुःखानं पिळवटून निघाले. त्या सर्वांची सुखदुःखे ही 'माझी' कधीही होऊ शकत नाहीत ह्याची पूर्ण कल्पना मला आहे—पण स्वतःला जाणवलेल्या, जाणवणाऱ्या भावना तीव्रतेने उचंबळणाऱ्या संवेदना ह्या तितक्याच तीव्रतेने प्रदर्शित न करणे आता माझ्या हातात राहिले नाही. हे कुणा 'एका' व्यक्तीचे

सुखदुःख मला अस्वस्थ करून गेलेले नाही तर ठायी ठायी भेटणाऱ्या साऱ्या स्त्री-पुरुषांनी मला नवरसपूर्ण जीवनानुभव प्रदान केले–आणि मीदेखील एखाद्या अतृप्त याचकासारखी माझ्या झोळीत ते सर्व सुखदुःखमिश्रित अनुभव साठवत होते – का कुणास ठाऊक ? पण आज झोळी रिकामी केल्याशिवाय राहवेनाच. हे ओझं फार झालं असं वाटतंय.

झोळी रिकामी करताना वाटलं की आता साऱ्या अनुभवांची नैसर्गिक – अनैसर्गिक मोती (So called " Cultured " and so called "Uncultured.") इतस्ततः घरंगळून जातील. पण तसं झालं नाही. ते सारे नैसर्गिक – अनैसर्गिक मोती जीवन-धाग्याने एकत्र गुंफून त्यांची एक मोत्यांची माळ तयार झाली होती. तीच मी तुमच्यासमोर ठेवत आहे. ह्या मालेचं सौंदर्य –असौंदर्य, ह्या मालेची कवडीकिंमत वा अनमोलता प्रत्येकजणाने आपल्या इच्छेने करावयाची आहे. तो अधिकार प्रत्येकास आहे. फक्त प्रत्येक मोती बनण्याची प्रक्रिया सुरू होण्यास त्या प्रत्येक शिंपल्यातील जीवास 'दुखरा टोचा' बसलेला असतो. तो मोती मखमलीवर विराजमान होण्यापूर्वी एका शिंपजीवाची हत्या मात्र झालेली असते. एव्हढे भावनिक तादात्म्य वाचकाने अंतःकरणात बाळगले तरी मला मनापासून आनंद होईल.

पुणे
२६ जानेवारी १९८८


सरोजा परुळकर



अनुक्रमणिका

१	नाकारलेले स्त्रीजीवन	१
२	विवाहवेदीवरील अग्निशिखा	९
३	उपभोगिता	२०
४	वैराग्यवृत्ती	२६
५	कौटुंबिक वटवृक्ष	३४
६	तृप्त मातृत्व	४१
७	अतिप्रसंग	४७
८	श्रममूल्य	५५
९	स्त्री टाकाऊ वस्तू नव्हे	६१
१०	देवत्व ? — छे, मनुष्यत्व !	६८
११	मुक्तीची पहाट	७७
१२	रक्ताचे नाते	८६
१३	निळी जीवनज्योत	९०

●



१

नाकारलेले स्त्रीजीवन

पुण्याहून सोलापूरला जाणाऱ्या उजाड रस्त्यावर एका छोट्या गावाजवळ गाडी गरम झाल्यामुळे थांबली होती. तेवढ्यात एक सात-आठ वर्षांची गुरे राखणारी मुलगी कुतूहलाने जवळ येऊन विचारू लागली – " गाडी बिघडली का ? ऊन खूप आहे – तुम्हाला पाणी पाहिजे का ?– माझं घर तिथं जवळच आहे— " मी म्हटलं – " मला तहान नाही लागली. पण तुझे डोळे किती लाल झालेत – नाक वाहतंय – तुझ्या अंगात ताप दिसतोय. ही औषधाची गोळी घेऊन तू झोप. "-—" हंऽऽ बरं वाटत नाही – पण गुरं कोण राखणार ? आई बाळातीण आहे – भाऊ झालाय मला. " " तुझं नाव काय ? " – माझा सहज प्रश्न, आणि तिचं उत्तर—" नकोशी, " नकोशी माझं नाव.

हे असलं नाव ठेवण्यात तिच्या आईनं क्रूरपणा दाखवला की औचित्य ? मुलगा आणि मुलगी. दोन्हीही मानवी जीवनाचे मूलघटक. पण जन्मतःच जीवनाच्या तराजूत वजनदार पारडे पुरुषाचे. दुसऱ्या पारड्यात वेगवेगळ्या वजनांची भरपाई करत तराजू समांतर आणण्याकरता फक्त स्त्रीनं आयुष्यभर धडपडायचं. दोन्ही पारडी समतोल करताना जड पारड्यातील वजन थोडे कमी केले तरी दुसरं पारडं लवकर तोल गाठेल हे खरं ना ? मग एवढा विरोधाभास स्त्रीजन्म

व पुरुषजन्म यात जन्मत:च का ?

आपल्या भारतीय संस्कृतीत मुलाचा जन्म म्हणजे मोक्षाचा दरवाजा खुला करणारा दरवान ठरवल्यामुळे पुत्राकडून आपल्या मृतदेहाला अग्निसंस्कार मिळणार याचा आनंद अपरिमित ठरतो. पुरुष म्हणून जन्माला आलेल्या ह्या बालकाचे हे भासमान कर्तव्य मग आयुष्यभरात त्याने दाखवलेल्या साऱ्या अकर्तव्यांवर पांघरूण घालून टाकते. एकदा जीव शरीरातून उडून गेल्यावर त्या देहावर स्वत:च्या पुत्राकडूनच केलेला अग्निसंस्कार जर स्वर्ग दाखवणार असेल तर मुलगा असणाऱ्यांनी आयुष्यभर बेतालपणे वागण्यास हरकत नसावी. खरं म्हणजे ज्या त्या व्यक्तीने उपभोगलेले सुखदु:ख व मिळवलेले पाप-पुण्य ज्याचे त्याचेच – त्याच्यापुरते असते. दुसरा कुणीही वाटेकरी त्यात नसतो – दुसरा हिस्सेदार तिथे येऊच शकत नाही. बापाच्याच वीर्यापासून जन्मलेली मुलगी बापाला स्वर्गाचे दार उघडू शकत नाही म्हणून कमी दर्जाची ठरवणे खरंच योग्य आहे का ?

स्त्रीला मुलाला जन्म देताना ज्या सुखद – दु:खद अनुभवांना सामोरे जावे लागते त्यात जन्माला आलेल्या मुलांचे लिंग काहीच फरक करत नाही. तसंच नैसर्गिक भावनांच्या आविष्कारास मूल वाढविताना अधिक–उणेपणाही दाखवणे तिला प्राणी म्हणून खटकण्याचे काहीच प्रयोजन मुळात नाही. पण तिच्यावर झालेले सामाजिक बंधनाचे – विचारांचे संस्कार स्त्रीला आपल्याच मुलांच्या बाबतीत भेदभाव करायला भाग पाडतात यात शंका नाही. गर्भ राहिल्यापासून सासूच्या तोंडचे 'नातू हवा हो !'—असे उद्‌गार नवगर्भवतीस धसकावून टाकतात – " जे आपल्या हातात नाही त्याची चिन्ता करू नकोस पोरी – चांगलं खा – पी, आराम कर. " अशी समजूत आपल्या माहेरी बाळंतपणास आलेल्या मुलींची घालताना अनेक आया मनात तडफडत असतात.

" पेढे आणा पेढे, मुलगा झाला हो मुलगा. अगदी राजबिंडा आहे. बाळ-बाळंतीण खुशाल... " हे परिचारिकेचे वा दाईचे शब्द कानावर पडताच ह्या बाळंतिणीची आई हरखून जाते. तिच्या डोळ्यांत पाणी तरारते. आपल्या स्वत:ला मुलगा होईपर्यंत सर्व नातेवाईक व ओळखीच्या लोकांनी काढलेल्या वाभाड्यांच्या आठवणीने ते आले की आपल्या मुलीला आता असे वाभाडे सहन करायला लागणार नाहीत म्हणून आनंदाने आले हेच नवीन आजीला कळत नाही.

मुलाचा जन्म म्हणजे घरच्या ऐश्वर्याला मिळालेला वारसदार—म्हणून हा

आनंदोत्सवही. पण असे ऐश्वर्याचे वारसदार होण्याचे भाग्य किती पुरुषांना लाभते ? आपल्या पुत्राला कर्जाचे ओझे घालून निघून जाणारे बापही जगात पुष्कळ आहेत. स्त्रीला आज कायद्याने बापाच्या मालमत्तेत वाटेकरी म्हणून हक्क मिळाला आहे, पण कोणीही बऱ्या स्थितीतील स्त्री तो हक्क बजावत नाही—पण काही कारणाने आपल्या आई-वडिलांची स्थिती समाधानकारक नसेल तर तिचा तुटणारा जीव परिस्थिती असूनही नवऱ्याच्या धाकाने मदत करू शकत नाही. स्त्रिया ह्याच स्त्रियांच्या शत्रू आहेत असे सतत म्हणणाऱ्यांनी पुरुषही पुरुषाचा शत्रूच आहे हेही स्वीकारले पाहिजे. सासऱ्याची सांपत्तिक स्थिती खालावली असता त्याला आर्थिक सहाय्य देण्याची जबाबदारी स्वीकारणारे जावई समाजातील 'स्त्री-पुरुष' जन्माचा भेद नाहीसा करण्यास खूप मदत करणार आहेत याची मात्र खात्री वाटते.

मुलगी झाली म्हणूनही बर्फी वाटली जाते पण घास गिळताना एक न ऐकू येणारा आवंढाही त्याचबरोबर गिळला जातो हे बहुतेकजणांना – बहुतेकजणींना नाकारता येणार नाही. त्यातून दुर्दैवाने बाळंतपणात आईचा मृत्यू ओढवला तर मग ह्या नूतन मुलीचे कौतुक कुणाला राहत नाही. सगळ्यांनी मग राग राग करतच तिला वाढवायचं – तिचं जगणं म्हणजे मग जिवन्तपणीचं मरणच. जिला आयुष्यात कुणाचं प्रेमच मिळालं नाही तिनं दुसऱ्यावर प्रेम तरी कसं करावं ? मुलगा मातृहीन झाला तर मात्र 'आईवेगळं पोर' म्हणून दोन्ही आजोळी कौतुकाने वाढविला जातो. मुलगी अपशकुनी ठरते व मुलगा दुर्दैवी ठरतो.

नवराबायकोत असलेल्या प्रकृतीतील गुणदोषांमुळे जर मूल काही अपंगत्व घेऊन जन्माला आलं तर दोष माथी मारायचा फक्त बाईच्या. त्याचं लालनपालन आजारपण सारं करायचं स्त्रीनंच. समजून घेऊन लालनपालन – संगोपनात मदत करणारे पुरुष हाताच्या बोटावर मोजण्याएवढे. पुरुष–प्रकृतीतील दोषही ह्या आपत्तीस कारणीभूत असू शकतात याची जाणीवही न ठेवता स्त्रीची कूसच याला जबाबदार ठरवली जाते आणि सतत कानावर पडणाऱ्या ह्या दोषाच्या उद्गारांनी स्त्रीही स्वतःला दोष लावत जीवनातील साऱ्याच अपयशांची मग मालकीण बनते. मुलात वंशपरंपरागत आलेल्या दोषांना स्त्री-पुरुष सारखेच जबाबदार असताना त्याचं सारं खापर स्त्रीच्या ओटी-पोटी मारणं खरंच बरोबर आहे का ?

पांढऱ्या पायाचा मुलगा – असा वाकूप्रचार तर कुणीही – कधीही ऐकलेलाच नाही. मूल जन्माला यायला आणि काही दुर्दैवी घटना घडायला गाठ पडते. घरातील एखाद्या वडिलधाऱ्या महत्त्वाच्या वृद्ध व्यक्तीचा मृत्यू ओढवतो, कुटुंबावर आर्थिक संकट येते – त्याला इतर अनेक कारणे असू शकतात – पण अशा वेळी जन्मलेली मुलगी – पांढऱ्या पायाची ठरते. " माझे पाय तर काळे आहेत. मग मला सगळे पांढऱ्या पायाची का म्हणतात ? — " असा अबोधावस्थेत असलेल्या मुलीचा प्रश्न डोळ्यांत पाणी आणत नाही का ? तिच्या आजूबाजूस असणाऱ्या साऱ्याच स्त्री-पुरुषांनी स्वतःच्या मनातील अभद्र भावना काढून टाकून अशा मुलीच्या डोळ्यांत पाणी येणार नाही हे पाहायला नको का ?

एखाद्या मुलीच्या जन्मानंतर पाठोपाठ मुलींचाच जन्म होतो किंवा आईची प्रकृतीच अशक्त झाल्याने नवीन पाठोपाठ जन्माला आलेली भावंडे जगू शकत नाहीत. पण त्याचा दोष या मुलीला राक्षसीण ठरविण्यात होतो हेच दुखते. आपण आपल्या आई-वडिलांच्या दुःखास कारणीभूत आहोत हे शल्य तिने आयुष्यभर टोचून घेत स्वतःचाही राग राग करत घालवायचे यात सहृदयतेचा अंश तरी शिल्लक राहतो का ? बोचऱ्या शब्दांचे सामर्थ्य नवीन रोप उमलण्यात होतच नाही – अंकुरलेले कोंब मात्र उमलता उमलता करपून जातात.

विवाहाच्या वेळी आपल्या जोडीदाराबाबतची आवडनिवड प्रगट करण्याचे भाग्य फारच थोड्या स्त्रियांना मिळतं. बाकीच्यांनी स्वतःच्या परिस्थितीची जाणीव ठेवून आईवडिलांनी देऊ केलेल्या घराचं माप ओलांडायचं. लग्न म्हणजे नवा जन्मच. इथंही कुंकवाच्या टिळ्याबरोबर तिला ' भाग्यशाली ' वा ' अभागी '-पणाचा टिळा जन्मभराकरता लावला जातो. फक्त ह्या टिळ्याची झळाळी मुलीने माहेरहून आणलेल्या सुवर्णाच्या प्रमाणात झळाळते. सुशिक्षित-अशिक्षित, गरीब-श्रीमंत, शहरी-ग्रामीण, उच्चजात–नीचजात हे सारे भेदभाव फक्त सुवर्णाच्या बाबतीत नाहीसे होतात. मुलीचे सारे गुण ह्या झळाळीपुढे निष्प्रभ ठरतात. स्त्री आणि पुरुष या दोघांनाही स्वतःच्या आवडीचे जोडीदार निवडण्याची संधी मिळाली तर संसार नक्कीच अधिक सुखाचे होतील. पण एकदा संसारात प्रवेश केल्यावर स्त्रीची सुटका तिला दुःख असह्य होऊनही सहजासहजी होत नाही. मनाची फार किंमत मोजून तिला ती मुक्तता मिळवावी लागते. ' बायको आवडत नाही ' या तीन शब्दांच्या वाक्यांवर मात्र पुरुष दिमाखाने भ्रमरवृत्ती उपभोगू शकतो.

असा अन्याय सर्वांवर होतो असे नाही—बहुतांशी कुटुंबे ही तडजोड करत सुरळीत चालतात. बाहेरच्या जगाशी लढत असताना पुरुषाला जखमा होतात. मात्र सतत ठेचकळलेल्या, दुखऱ्या जखमी अंगठ्यावर दररोज फुंकर घालत स्त्रीला जीवनमार्ग क्रमावा लागतो. वरकरणी कसलेही आर्थिक वा शारीरिक दु:ख सहन न करायला लागणाऱ्या भाग्यवान स्त्रिया नाहीत असं नाही, पण त्यांच्या मानसिक दु:खाची जाणीवही करून घ्यायची कुणाला इच्छा होत नाही.

खाणं-पिणं नि कपडालत्ता याबाबतीत काटकसर करतच आपल्या बहुतांशी भारतीय स्त्रिया काटक बनतात. पुरुषाचे जेवण-खाण्याचे चोचले नीटपणे बायकोकडून पुरवले गेले नाहीत यावरून कितीतरी स्त्रिया जीवनातून उठल्या गेल्या आहेत. स्त्रीचं आजारपण तर ती अंथरुणावर आडवी पडल्याशिवाय समजतच नाही. घरच्या कर्त्या पुरुषाला जरा बरं नसेल तर सारं घर त्याच्या-भोवती रुंजी घालतं—डॉक्टरचा दरवाजा प्रथम गाठला जातो. आजारपणात खर्च केलेला पैसा ही कौतुकाची गोष्ट होऊन बसते—मात्र स्त्रीच्या बाबतीत दुर्लक्षित केल्या जाणाऱ्या रोगांची जंत्री आपण दूरच राखिली तरी चालेल—पण किती संपन्न घरांतूनही आजकाल सर्रास आयुर्मर्यादा वाढविण्यासाठी होणाऱ्या हृदयरोगावरील Bi-pas-Surgery ची स्त्रीसाठी व्यवस्था केली जाते? स्त्रीचं उणेपण पुरुषाला पटकन् भरून काढता येतं, हेच खरं.

मुलांचे संगोपन करून वाढवीत असता आपल्या बुद्धीनुसार स्त्री तन-मन खर्ची घालते—मुलं आणि मुली गुणी निघाल्या तर बाप कौतुकाने मिरवतो. मात्र तिथे ह्या मुलामुलींनी काही गैरवर्तणूक दाखवली की मग लगेच दोषी धरायचे आईला. तिच्या दहा-बारा वर्षांच्या वागणुकीची छाननी करून चुकांची लाखोली काढायची. मुलांच्या संगोपनात बापाने भाग घ्यायला नको का? अगदी लहानपण सोडून द्या—पण शाळेत मुले जायला लागल्यापासून त्यांच्या प्रगतिपुस्तकावर सही करण्यापलीकडे स्वत:त दंग असलेला—स्वत:ची करिअर उच्च जागी नेण्यास धडपडणारा बाप त्यांच्यासाठी वेळ खर्ची किती घालतो? मुलांच्यावर संस्कार करण्याची जबाबदारी प्रामुख्याने स्त्रीवरच पडते हे खरं, पण याचा अर्थ ती जबाबदारी झटकणे वा त्या संस्कारांशी सहमत न होता मुलांच्या मनात द्विधा-वृत्ती निर्माण करणे एवढेच पुरुषाचेही कर्तव्य ठरत नाही. मुलांची वागणूक आई-वडिलांच्या वर्तणुकीचेच प्रतिबिंब असते. संस्काराचा प्रश्न मुलीच्या

बाबतीत तर जास्तच नाजूक बनतो. कारण कितीही सुसंस्कारित मुलगी असली तरी सासरी गेल्यावर तिच्या दोषांची चर्चा करताना 'आईचा उद्धार' नवीन सासुरवाशिणीचे डोळे ओले करतोच.

पण आत्ताच्या सुधारलेल्या जगात विज्ञाननिष्ठ समाजाकडून सर्वांत जास्त अन्याय संततिप्रतिबंधक साधने व त्यासंबंधातील शस्त्रक्रिया करून घेण्यात होतोय. सुरुवातीच्या वैवाहिक जीवनात मूल जर लवकर नको असेल तर खूपशा प्रमाणात यशस्वी होणारा नैसर्गिक 'असुरक्षिततेचा' काळ शरीरसंबंध न येण्यात घालवणे बहुतेक पुरुषांना अशक्यच होते. तांबी बसवणे, डायफ्रॅम वापरणे, ट्रप बसवणे किंवा तीन आठवडे न विसरता गोळ्या खाणे एवढ्या सोप्या गोष्टीतून स्त्रीने एक मार्ग निवडला तर वेळकाळाचे बंधन शरीरसंबंधात मानण्याचा प्रश्नच येत नाही. मूल झाले तर तिलाच होणार मग तिनेच काळजी घ्यायला नको का? जरुरीपोटी वापरायला लागणारा 'निरोध' पुरुषाला 'पूर्ण सुखी' बनवत नाही ही बहुतेक पुरुषांची तक्रार आहे – असेलही असे मान्य केले तरी मुले होण्याची क्रिया शस्त्रक्रियेने बंद करण्याच्या वेळी पुरुषाने जास्त पुढाकार घ्यायला हवा. स्त्रीवर करण्याच्या शस्त्रक्रियेपेक्षा तुलनेने पुरुषावरील शस्त्रक्रिया सोपी असते – शस्त्रक्रियेनंतरचा पूर्ववत होण्याचा काल हा कमी त्रासाचा असतो. तेव्हा संतति-प्रतिबंधक शस्त्रक्रियांचे पुरुषांचे प्रमाण स्त्रियांवर होणाऱ्या शस्त्रक्रियांच्या प्रमाणात अधिक असायला हवे. मग ते तसे का नाही?

सुरू केलेला संसार सुरळीतपणे पार पडल्यावर उतारवयात मृत्यूचे आमंत्रण कुणाला आधी, कुणाला नंतर येणारच. या शतकाच्या सुरुवातीपर्यंत कोणत्याही वयात स्त्रीवर वैधव्य येणं म्हणजे 'सतीचं वाण' च तिला घ्यायला लावून, गीतं रचिली जाऊन तिचा उदोउदो करत आयुष्य जायचं नाहीतर जीवंतपणी उभं मरण तिनं जगायचं हीच 'परंपरा' होती. मृत्यू पावलेल्या स्त्रीचं मात्र 'तेरावा' होताच विधुराजवळ लगेच होतकरू नववधूंची चर्चा सुरू व्हायची. आता सतीची चाल बंद झाली. अल्पवयीन विधवांचे विवाहही आईवडीलच नव्हे तर सासू-सासरेही करून देत आहेत – ते स्वागतार्ह व स्तुत्य आहे हे कोणीच नाकारणार नाही. मात्र आजच्या आधुनिक, सुशिक्षित, संपन्न पुरुषावर जर उतारवयात विधुरपण आलं तर त्याला सहवाससुख देणारी मैत्रीण मिळवून देण्यासाठी सारेजण खटपट करतात. त्याच वयातील विधवा स्त्रीला मात्र स्वत:ची व्यक्तिगत गरज म्हणून

अशा 'मित्राची' मागणी मोकळेपणी – गैरसमज होणार नाही याची खात्री बाळगून – करता येत नाही. उतारवयाकडे झुकलेल्या खूपशा स्त्रियांना ही नवीन कसरत नकोच असते पण ज्यांना ती हवीशी वाटते त्यांच्या ती क्वचितच वाट्याला येते.

स्त्रीजीवन आणि पुरुषजीवन यांच्या या तऱ्हा व त्यातील तफावत नवीन मुळीच नाही. त्यावरती वाद वा भांडणही मुळीच नाही. फक्त या जीवनालयात जेवढ्या जेवढ्या दालनांमधून स्त्री हिंडते त्या दालनांना चार दरवाजे असूनही तिच्यापुरते एकच दार खुले असते – बाकीची घट्ट बंद असतात. एकाच उघड्या दरवाज्यामधून तिला दुसऱ्या खोलीत प्रवेश करावा लागतो – कसलाही विचार-सुद्धा करायची संधी न मिळता. पुरुषाच्या जीवनालयातील दालनांना खुले दरवाजे असतात – दारांच्या चौकटी असतात, मात्र त्यांना कवाडे नसतात. पुरुष इतकी प्रचंड मोकळीक अनुभवत असताना, ज्या स्त्रियांना चाकोरीबद्ध जीवन खटकतंय त्यांच्या दालनाचे बंद दरवाजे उघडण्यासाठी का कचरतोय? झापड लावून एकच एक मार्ग क्रमणाऱ्या टांग्याच्या घोडीला रस्ता बदलून हवा का म्हणून कोणी विचारतं का? नाही – आणि कोणी विचारणार पण नाही. तरीही मुकं जनावर आणि बाई माणूस यांत फरक आहेच. तिला आज स्वतः विचार करून दालनाचे चारी दरवाजे खुले असताना हव्या असलेल्या दरवाज्यातून हव्या असलेल्या दालनात प्रवेश करायचाय.

हे असे बंद दरवाजे कोणते ते प्रत्येक स्त्री-पुरुषांना माहीत आहेत. वागणुकीतील तफावत स्त्री-पुरुष या दोघांनाही सारखी खटकते–पण नेहमी दुसऱ्या स्त्री-पुरुषांच्या संदर्भात. प्रत्येक स्त्री-पुरुष स्वतःच्या मनाला साक्षी ठेवून आपली वागणूक न्यायी आहे असे छातीठोकपणे सांगतील तर ती आनंदाची गोष्ट आहे. आपल्या सर्वांच्या हृदयात जी कणव आहे ती नेहमी दुसऱ्या त्रयस्थ व्यक्तीच्या संदर्भात होणाऱ्या अन्यायाने उफाळून येते. मात्र आपल्या संबंधियांच्याबरोबर होणाऱ्या त्याच स्वरूपाचे अन्यायाचे रूप जाणवतही नाही–आणि जाणवलेच तर त्या अन्यायाचे आपलेच मन आपल्याला हव्या त्याच विचारांचे समर्थनही करते. हे भयानक नाही का?

'तुमची भारतीय संस्कृती कशी आहे ते पाहण्यासाठी मी आलेय–मला दाखवाल का?'–एक परदेशी पाहुणी मला प्रश्न विचारत होती. मी होकारार्थी

मान हलवली. पण 'भारतीय संस्कृती' ही थोडीच एक वस्तू आहे जी तिच्या-समोर टाकली व म्हटले–'ही पाहा–' मी विचार करू लागले. एकदम डोक्यात प्रकाश पडला. मी तिला फोन लावला– "हॅलो, कॅथरिन, तुला 'भारतीय संस्कृती' पाहण्यासाठी तुझं पंचतारांकित हॉटेल सोडावं लागेल. भारतीय कुटुंबांतून तुला राहावं लागेल–नवविवाहित जोडप्यांपासून समृद्ध जीवन जगलेल्या वृद्ध जोडप्यांपर्यंत जेवढी जेवढी कुटुंबे तुला जवळून अभ्यासता येतील तेवढी पाहा..." खूप बोलून मी फोन ठेवला.

गृहस्थाश्रम -वानप्रस्थाश्रम या दोन्ही आश्रमांचे वर्णन संसाराचे जंजाळ ह्या रूपात बसत असल्या तरी शैशव व वृद्धत्व यांनाही लपेटून घेऊन जाणारे गृहस्थाश्रमातील सामान्य–असामान्य स्त्री-पुरुष, सामान्य–असामान्य आई-बाप हेच भारतीय संस्कृतीचे निर्देशक आहेत. तेव्हा यातील कुणावरही होणारा अन्याय हा अमानुष आहे. तो दूर झाला तर उरतो अत्यानंदच. तो आपण स्त्री-पुरुषांनी मिळवू या.

२

विवाहवेदीवरील अग्निशिखा

"शुभमंगल साऽवधाऽऽनऽऽ—" भटजीचे सूर वातावरणात विरतात न विरतात तोच मंडपात जमलेल्या सर्वांनी हातातल्या अक्षता नवरा-नवरीच्या दिशेने उधळल्या. मंगल सनई–चौघडा 'लग्न लागले' हे शब्द बोलू लागले. पेढे वाटले गेले. नववधू आणि वर सर्वांचे आशीर्वादपर अभिनंदन स्वीकारू लागले. पक्वान्नाचे जेवण झाले आणि सुगंधित विडे चघळत नातेवाईक व स्नेही मंडळी घरोघरी परतली. लग्न लागलं.

—आपण सारेजण अशा तऱ्हेने लग्नांचा आनंद घेण्याचा प्रयत्न करत असतो. कारण प्रत्येक लग्नसमारंभाचा भर ओसरल्यावर विवाहसमारंभात खटकलेल्या गोष्टी, वधू व वर यांची योग्य-अयोग्यता याचीच चर्चा आपणा सर्वांच्याच गप्पाष्टकांचा प्रमुख भाग होते.

—अशाच एका लग्नासाठी म्हणून माझी आत्या परगावहून माझ्याकडे आली. दुसऱ्या दिवशी सकाळचा मुहूर्त साधण्यासाठी नटून लगबगीने विवाहस्थळी गेली आणि पंधरा मिनिटांतच परत आली. कार्यालयाबाहेर "काही अपरिहार्य कारणामुळे विवाह स्थगित. क्षमा असावी." असा बोर्ड लावला असल्याचे तिनं सांगितलं. सुशिक्षित वधू-वर, दोन्ही संपन्न–सुसंस्कारित घराणी असूनही असं

मंडपापर्यंत आलेलं लग्न मोडण्याइतपत काय मुद्दा उत्पन्न झाला असावा याची मला कल्पनाही करता येईना. माझं मन दिवसभर उदास राहिलं.—उगाचच.

एक स्त्री आणि एक पुरुष विवाहाने आयुष्यभरासाठी एकत्र जोडली जातात आणि मानवजातीचे सूत्र पुढे नेण्यासाठी हातभार लावतात. विवाह हीच खरी शारीरिक व मानसिक मीलनाची कसोटी असं मानून त्या नूतन पति-पत्नींनी आपलं भावी जीवन संपन्न करावं आणि मुलं जन्माला घालावीत—त्यांना उत्तम नागरिक बनवावं असा एवढा उदात्त हेतू ह्या विवाहामागे असताना विवाह जुळविताना किंवा विवाह पार पडेपर्यंत सतत तणावाचे वातावरण सर्वांना जाणवते ते का? ह्या विवाहाची जुळवणी काही चुकीच्या पद्धतीने केली जाते का? वधूपक्ष व वरपक्ष एकमेकांकडून काही चुकीच्या अपेक्षा तर ठेवत नसावीत? आई–वडील व स्वत: लग्नास इच्छुक असलेली मुलं व मुली कोणत्या निकषांवर आपल्या भावी सुनेची व जावयाची किंवा भावी जीवनसाथीदाराची निवड करतात? लग्न हा प्रत्येकाच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा आहे हे सर्वांना माहीत असूनही लग्न जुळविण्यात दाखवावी तेवढी जागरूकता वडिलधाऱ्यांकडून दाखवली जाते की नाही?—का अधिक जागरूकतेपोटीच नंतर विसंवाद निर्माण होतात? मला कळायला लागल्यापासूनची लग्ने–विवाहसमारंभ–त्यानंतरचे संसार–हातावर मोजण्याएवढे सुखी संसार–बहुतांशी सर्वत्र कुरबूरच जास्त–असे का? अशा सर्व प्रश्नांनी मनात घरच केले. जास्त जास्त आठवणी दाटू लागल्या आणि वरील प्रश्नांभोवती सुलट-उलट विचारांची खळबळ माजली.

सध्या आपल्या भारतात प्रचलित असलेल्या दोनच विवाह जुळविण्याच्या पद्धती नजरेसमोर आल्या. आई-वडील वा वडिलधाऱ्या नातेवाइकांनी आपल्या कुटुंबातील वयात आलेल्या मुलामुलींच्यासाठी जीवनसाथी निवडायचे ही एक पद्धत आणि 'प्रेमविवाहाची' दुसरी पद्धत. आपल्या भारतीय समाजात तरी वडिलधाऱ्यांनी विवाह 'जुळविण्याची' पद्धतच जास्त प्रमाणात रूढ आहे. 'प्रेमविवाहात' वयात आलेले तरुण मुलं आणि मुली एकमेकांकडे नैसर्गिक भावनेने आकर्षिले जातात. एकमेकांच्या आवडी-निवडी ओळखत थोडा प्रिया-राधनेचा काळही घालविला जातो. आपापल्या जीवनविषयक क्षेत्रांच्या विचारांचे साधर्म्य एकमेकांकडून जोखले जाते आणि एक दिवस ती दोघे विवाहोच्छुक तरुण-तरुणी आयुष्यभरासाठी एकत्र येण्याचा निर्णय घेतात. आपल्या आई-

वडिलांना तसे कळवितात. विवाह होतात आणि त्या दोघांचा नवसंसार सुरू होतो.

'ठरविलेल्या' विवाहातील पहिली पायरी म्हणजे मुलामुलींची 'पसंती'. या शतकाच्या सुरुवातीपर्यंत मुलामुलींची पसंती विचारातच घेतली जायची नाही. साऱ्या वडिलधाऱ्यांना आपण निश्चित केलेले जोडीदार हे कुल, रूप, आर्थिक संपन्नता, घराणं, शिक्षण, नोकरी या सर्वांचा विचार करूनच निवडले असल्याने मुलामुलींना काय विचारायचे? असा प्रश्नही पडत नव्हता. त्याची गरजही वाटत नव्हती. त्या काळच्या तरुण मुलामुलींना वैयक्तिक आवड-निवड प्रगट करण्याची मुभाच नव्हती व तेव्हढे धैर्यही अनेक सामाजिक कारणांमुळे त्यांच्याकडे नसावे असे वाटण्याएवढी रगड उदाहरणे सर्वांच्यासमोर आहेत. एखाद्या मुलाने वा मुलीने आपल्याला न आवडलेल्या जोडीदाराशी विवाह करण्यास नकार दिला अशा तऱ्हेचे त्या काळचे उदाहरण माझ्या तरी ऐकिवात नाही — उलट काही वेळा जोड्या अनुरूप नसूनही त्या दोघांनी संसार कसा व्यवस्थित करून दाखविला याचीच मालिका जास्त प्रमाणात आहे.

आजकाल मोठ्या शहरातून राहणाऱ्या, सुशिक्षित, सुसंस्कृत घरांतून मुलामुलींची एकमेकांबद्दलची पसंती नक्की विचारात घेतली जाते. आपली पसंती मुलामुलींवर लादून संसार यशस्वी होणार नाहीत याची ज्या व्यक्तींना, कुटुंबांना कल्पना आहे – अशा समंजस घरातून मुलांमुलींवर विवाहाची सक्ती करण्यात येत नाही. मुलामुलींचे उत्तर जर नकारात्मक असेल तर अकांडतांडव न करता दुसऱ्या ठिकाणी विवाहसंबंध जुळविण्याची खटपट सुरू करण्याचे प्रमाणही खूपसे वाढले आहे – आणि ते स्तुत्य आहे.

मात्र आमच्या खेड्यापाड्यांतून छोट्या छोट्या गावांतून आणि अल्प प्रमाणात शहरातून राहणाऱ्या बहुतांशी मुलामुलींना आजही आवडी-निवडीचे स्वातंत्र्य अजिबात नसते असं म्हटलं तर फारसं चूक ठरणार नाही. आपल्या 'मुलीची पसंती' यावर काही ग्रामीण आयांशी बोलताना त्यांचे बोल ऐकून मन हेलावले. एक आई तळमळीने म्हणाली—

"ताई, आमच्या वयात आलेल्या मुलींना आपल्या आई-बापाच्या परिस्थितीची फार चांगली समज असते, जाणीव असते. आपले आई-बाप आपलं थोडंच वाईट करणार आहेत ह्या एका विश्वासापायी आमच्या मुली आलेलं स्थळ सहसा

नाकारत नाहीत. पण एखाद्या मुलीने धिटाई करून आलेलं स्थळ नाकारलं तर मात्र तिला व तिच्याबरोबर तिच्या आईलाही नावं ठेवणं सुरू होतं. नंतर येणाऱ्या स्थळांकडून 'नाकापेक्षा मोती जड' दिसतोय बरं असं ऐकविलं जातं. ती मुलगी खचून जाते व पुन्हा नकार देण्याचे धाडस तिला करवत नाही."

"आमच्या समाजात पुरुषांचा नकार विचारात जरा तरी घेतला जातो. मात्र मुलीचा नकार सर्वांना खटकतो. हे चूक आहे. पण सर्वांचा नाइलाजही असतो. माझ्याच थोरल्या लेकीचं लग्न ठरविताना तिनं नकार देऊ नये म्हणून बोललेले माझेच शब्द कधी कधी मनात घुमतात. वाईट वाटतं—" आपल्या अवघडलेल्या मनाची रुखरुख दुसऱ्या आईने उघडी केली.

खरंच, हे बदलायला नको का? विवाहात कालान्तराने, सहवासाने प्रेम उत्पन्न होत नाही असे नाही – पण अशा नावडीच्या संसारात सुरुवातीची घालमेल प्रचंड असते. ती घालमेल दोघांचीही होते. नावडीचे आवडीत रूपांतर होण्यासाठी स्त्री व पुरुष या दोघांनाही भलती किंमत द्यावी लागते – गरज नसताना.

"आमच्या घराण्याच्या प्रतिष्ठेला शोभेल असं तोलामोलाचं स्थळच हवं आम्हाला–" सरदारकी न उरलेल्या, पण अजूनही त्याची धुंदी न ओसरलेल्या माझ्या ओळखीच्या एक बाई बोलत होत्या. आपल्या घराला शोभेल अशाच कुटुंबाशी आपले ऋणानुबंध जोडले जावेत असं वाटणं बरोबर असण्याची शक्यता जास्त प्रमाणात असली तरी प्रतिष्ठेचा स्तर थोडाफार खालचा-वरचा असला म्हणून काही दररोजचे आनंदी जीवन जगण्यात भयंकर बाधा येण्याचेही कारण नाही. 'प्रतिष्ठा' म्हणजे काही नुसता पैसा नव्हे.

प्रत्येक घराण्यातील माणसे गुणावगुणांनी वेगवेगळीच असतात. त्यामुळे घराण्यातील एखाद्या व्यक्तीने समाजात मान्यता मिळविणे हे त्या व्यक्तीचे व्यक्तिगत यश असते. तसेच एखाद्या व्यक्तीकडून काही न आवडणारे काम, चुकीची गोष्ट घडली असेल तर तेही त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वापुरतेच मर्यादित असते. उपवर मुला मुलींचे नातेवाईक हे व्यक्तिशः गुणी मुलामुलींना साधक-बाधकच असण्याबाबतचे पक्के मत आपण कुणीच बनवू शकत नाही. गुणी सूनबाई मिळूनही वर उल्लेखलेल्या सासूबाई तिच्यावर जेव्हा नाराज असतात तेव्हा काही उणे–दुणे वा आपल्या घराण्याचा टेंभा येन–केन–प्रकारेण बोलण्याची

संधी सोडत नाहीत. एखाद्या कुटुंबाकडे किती मालमत्ता आहे यापेक्षा त्या कुटुंबातील प्रत्येकाची वागणूक त्या कुटुंबाला प्रतिष्ठा देते असे मला वाटते.

दररोज वर्तमानपत्राचे पहिले पान उलगडले की डाव्या पानावर नजर पडताच 'वधू–वर' सूचक जाहिराती प्रथम लक्ष वेधतात. वय, उंची, शिक्षण, रंग, रूप, जात, नोकरीची कमाई, स्थावर इस्टेट–या साऱ्या जंत्रीमधून विवाहातील अपेक्षांची यादी सर्वांनाच कळते. त्यावरून व येणाऱ्या व्यवहारातील उदाहरणावरून हे सारे निकष कितपत ताणले जावेत याची परिसीमाच मला दिसेनाशी झालीय की काय असे वाटू लागले ते वधूपक्षाकडून आणि वरपक्षाकडूनही.

वरील सर्व माहिती जाहिरातीत असते पण लग्न ठरविताना त्यातील काही कल्पना या मुलाच्या दृष्टीने पक्क्या असतात. मुलापेक्षा मुलगी ही वयाने लहानच असली पाहिजे, तिची उंची मुलापेक्षा जास्त असता कामा नये. तिचे शिक्षणसुद्धा मुलापेक्षा जास्त नको असतं–फक्त ती नोकरी करत असेल तर 'कमाई' जास्त असलेली चालत असावी. रूपाने ती नवऱ्यापेक्षा देखणी असावी, गोरी असावी, सुंदर असावी यात तडजोड नाही. खरं म्हणजे आपण बहुतांशी भारतीय हे सावळ्या व काळ्या रंगाचेच असतो–(काही उत्तर भारतीय व काही विशिष्ट जमाती सोडता), पण आपल्या काळ्या मुलाला शोभेलशी स्मार्ट काळी वधू पाहिजे अशी योग्य जाहिरात कधीच नजरेस का पडत नाही?

गोरी, सुरेख, चवळीच्या शेंगेसारखा बांधा असणारी, चाफेकळी नाक असलेली, बदामासारख्या टपोऱ्या डोळ्यांची, इंद्रधनुष्यी भुवया असलेली, डाळिंबी ओठ विलग करून सुरेख दंतपंक्ती दाखवणारी इ. इ. असं अंग-प्रत्यंगाचे पूर्णत्व गाठलेली स्त्री प्रत्येक पुरुषाला मिळणे कठीणच. तसेच उंच, धिप्पाड, रुंद खांद्याचा, भरदार छाती असलेला, पोट सपाट असणारा, रुबाबदार व्यक्तिमत्त्वाचा पुरुषही प्रत्येक स्त्रीला मिळणे अशक्यच. वधू आणि वर यांची शारीरप्रकृती सुदृढ असावी व जोडी अनुरूप ठरावी याची काही किमान शक्यता वडीलधाऱ्यांनी मनात ठेवली तर 'आपण म्हणजे केवळ शोभेची वस्तू नव्हे' हा भाव मुलामुलींच्या व खास करून मुलींच्या मनात रुजण्यास मदत होईल. आपण स्वत: शारीरिकदृष्ट्या कसे आहोत याचा तरुण मुलामुलींनी अगोदर विचार केला व आपल्या जोडीदाराविषयीच्या अपेक्षा निश्चित केल्या तर अनुरूप जीवनसाथी मिळणे कठीण न जावे.

" आमचा बाळ सावळ्या रंगाचा (मुलगा कधीच काळा असत नाही) पण सून आणली की नाही गोरीपाऽऽन— " असं अभिमानाने म्हणणाऱ्या आमच्या कुसुमताईंना विचारावंसं वाटतं की, " ताई, तुमच्या सुनेला गोरा नवरा आवडला नसता का हो ? " गोऱ्या मुलीचा काळ्या नवऱ्यासाठी होकार मिळविण्यासाठी तिच्या आत्या, मावशी, काकी-मामींनी ' सावळा वर बरा गौर वधूला ' किंवा ' पुरुषाचं कर्तृत्व बघायचं असतं, रूप नाही ' अशी वक्तव्यं केलेली असतात. ती तशी पोकळच असतात. ' कन्या वरयते रूपम्, माता वित्तं च, पिता श्रुतम्—' हे खरंच आहे. गोरेपणाचं अवास्तव स्तोम आपणा सर्वांनीच कमी करायला हवं—नाहीतर तारुण्याने मुसमुसणाऱ्या साध्या निरागस सौंदर्याचा अपमान होईल.

कसलेही रंगढंग न केलेल्या सोज्वळ मुलीला ती फॅशनेबल नाही असे म्हणत ' Uncultured ' ठरवायचं हे वेडेपणाचं नाही का ? कृत्रिम सौंदर्य-साधनांनी ' Cultured ' व्यक्तिमत्त्व ठरत असेल तर अशा मुलींना सहचरी वा सून म्हणून निवडल्यावर त्यांच्यावर ' नटव्या ' म्हणून टीकाही आयुष्यात कधी कुणी करू नये. पण तसे न घडता तिलाही कधी ना कधी बोचरे शब्द ऐकवले जातातच. तीच गोष्ट मुलांच्या बाबतीतही. आधुनिक पद्धतीचे कपडे घालून आपल्या वडिलार्जित संपत्तीचे प्रदर्शन करत फिरणारा, ढोंगी वर्तनाचा मुलगा हा जसा ' खानदानी ' ठरत नाही—तसाच साधा पेहराव करणारा, भावना व्यक्त करण्यास लाजणारा पण खरं पौरुषत्व बाळगणारा मुलगाही ' रांगडा ' ठरत नाही हे मुलींनीही लक्षात घ्यायला हवं. दिवसाचे चोवीस तास एकमेकांच्या सहवासात विवाहानंतर घालवत असताना फारसे अपेक्षाभंग होऊ नयेत अशी इच्छा असेल तर केवळ शरीर-सौंदर्यालाच अवास्तव महत्त्व देणे पेलायला कठीण जातं असं मला वाटतं.

स्त्री-पुरुषांना जेव्हा एकमेकांचं आकर्षण वाटतं तेव्हा त्या आकर्षणाला गोरा रंग, सुंदरता, वैभव ही कारणं असावीच लागतात असं नाही. अतिशय सुंदर, एकमेकांस अनुरूप असलेली जोडपी सुखाने नांदताना क्वचित नजरेस पडतात. उलट तथाकथित कल्पनांप्रमाणे विजोड असूनही मनापासूनचे आनंदी सहजीवन जगणारी जोडपी जास्त दिसतात-भेटतात.

वय आणि शिक्षण या दोन्ही बाबतीतही ठरविलेल्या विवाहात पक्के रूढ संकेत

नजरेस पडतात. मुलगी ही मुलापेक्षा लहानच असली पाहिजे व ती नवऱ्यापेक्षा अधिक शिकलेली असता कामा नये अशीच सर्वांची कल्पना असते. सर्वांचीच कशाला प्रत्यक्ष तरुण मुलामुलींशी बोलताना त्यांच्या मनाच्या चाकोरीबद्ध विचारवाढीमुळे वरील संकेताला धरूनच उत्तरे मिळतात. शरीरशास्त्र, जीवशास्त्र, मानसशास्त्र–ह्या साऱ्यांच्या संदर्भात खूपशी कारणे या विचाराला पुष्टी देतील किंवा नाहीही, पण आपली होणारी बायको वयाने लहान व आपल्यापेक्षा अधिक शिकलेली नसावी असं प्रतिपादन करताना पुरुषाची संरक्षणकर्त्याची व स्वामित्वाची वृत्ती थोडीफार जास्त प्रमाणात तृप्त होत असावी ही शक्यता नाकारता येत नाही. तसेच स्त्रीलासुद्धा आपल्यापेक्षा वयाने मोठा असलेला पुरुष जास्त भक्कम आधार देईल असं वाटत असावं–किंवा जास्त शिकलेल्या नवऱ्याचा नवरेपणा सहन करणं अवघड जाणार नाही अशी तिची भूमिका असण्याची शक्यताही नाकारता येत नाही. पण समवयस्क मुलामुलींचे किंवा मुलगी थोडी मोठी असताना झालेले विवाह हे टीकास्पद होण्याचे कारण नाही. शिक्षणाच्या डिग्र्या ह्या विवाह जुळविताना अडसर होण्याचे कारण नाही. 'माणूस' म्हणून अनेक गुणधर्म जुळत असताना वय व शिक्षण संसारसुखाच्या आड येऊ नयेत असं मला वाटतं. तेव्हा प्रचलित संकेताला थोडी मुरड घालूनही विवाह जुळविता येतील, योग्य जीवनसाथी निवडता येतील, असे विवाह आपण सर्वांनी 'स्वागतार्ह' ठरवायला नकोत का? निदान अशा विवाहांकडे नाक मुरडणे तरी आपण थांबवायला नको का?

आता विवाह ठरविताना किंवा जोडीदार निवडताना एकमेकांची सांपत्तिक स्थिती आजमावणं. इथं वधू-वरांची आर्थिक कमाई करण्याची कुवत किती आहे, हे पाहण्यापेक्षा त्या दोघांच्या आई-वडिलांची आर्थिक परिस्थिती व पैसे खर्च करण्याची ताकद जास्त लक्षात घेतली जात असावी का? दोन्ही कुटुंबांवर आर्थिक ताण न पडता देखील जे विवाह पार पडतात ते सुखी होतातच असे थोडेच आहे? पण साऱ्या इतर गोष्टी अनुरूप असताना फक्त देण्या-घेण्याच्या व्यवहारावरून जेव्हा विवाह उधळले जातात तेव्हा मात्र मला खरोखरच वाईट वाटते.

आपली मुलगी किंवा मुलगा हे दोघेही व्यापार करण्याच्या वस्तू नव्हेत हे सर्व आई-बापांनी समजून घ्यायला हवे. वधूपक्षाला जर वरदक्षिणा द्यायचीच

असेल तर तो सर्वस्वी वधूपक्षाचा प्रश्न आहे. पण ठरावीक वरदक्षिणेची 'हुंडा' म्हणून मागणी करणे हा आपल्या मुलाचा आणि आपल्या कुलाचा अपमान असेच सर्वांनी समजायला नको का? सन्मानाचे मूल्य कधी करतात का? सन्मान–आदर हा महत्त्वाचा–पण तो मनापासून उत्स्फूर्तपणे मिळाला असताना. मान कधीच मागून मिळत नाही. तेव्हा रीत म्हणून अनोळखी वधू-पक्षाकडून वा वरपक्षाकडून आपला मानपान व्हावा अशी इतर नातेवाइकांनी अपेक्षा धरणे–त्यावरून लग्नसमारंभात तणाव निर्माण करणे हास्यास्पद नाही का? ज्या नात्या-गोत्याने आपण या नवीन वधू-वरांशी जोडले गेले आहोत, त्या दोघांनी पुढच्या जीवनात तुम्हांला आपणहून मान देणे हे अधिक महत्त्वाचे ठरते असे मला वाटते.

लग्न हा व्यवहार झाला की त्याचा ताळेबंद आलाच. काही जमेच्या बाजूस, काही तोट्याच्या बाजूस. भरपूर वरदक्षिणेची मागणी जेव्हा वधूपक्षाकडून पुरविली जाते तेव्हाच मुलीतील खटकणाऱ्या दोषांवर चर्चा करण्याचा अधिकारही वरपक्ष गमावत असावा असेच दिसते. आपल्याच मुलाला 'बायकोच्या हातातलं बाहुलं झालाय' म्हणून टोमणा मारताना त्याचं 'बाहुलं' आपणच विवाह-व्यवहारात केलंय हे सारेजण विसरून जातात. पूर्वीच्या काळी व आजही काही जमातींत कन्याशुल्क घेऊन विवाह पक्के करतात. पद्धत कोणतीही असो जिथं 'मूल्यालाच' महत्त्व देऊन विवाहसंबंध केले जातात तिथे तो व्यापार असतो, विवाह नसतो.

उपवर मुलामुलींनीही स्वत:च्या जोडीदाराला पैशात किती तोलायचं? 'श्रीमंत पतीची राणी, मग थाट काय तो पुसता?—' यातील श्रीमंत पती-विषयी सौभाग्यकांक्षिणीची काय मनोभूमिका असावी? पैसा हा संसार सुखी करायला मदत करतो पण पैसा सुख देतोच असे नाही. पुरुषाचा बडेजाव जर फक्त वडिलार्जित संपत्तीवरच आधारलेला असेल तर पुरुष-जोडीदाराच्या कर्तृत्वाचा अभिमान त्याची भावी पत्नी कसा बाळगणार? आपल्या जोडीदाराच्या कर्तृत्वाचा अभिमान म्हणजे संसारी स्त्रीचा कणा आहे.

"आमच्या सात पिढ्यांनी बसून खाल्लं तरी चालण्यासारखं आहे—" असं म्हणणाऱ्या जबाबदार स्त्री-पुरुषांनी खरोखर आरामात लोळावं. आपल्या मुलांना आरामात लोळण्यास शिकवावं, आयुष्यभर आरामात आनंदाने लोळू शकणाऱ्या मुलींना सुना म्हणून घरी आणाव्या. आपल्या मुलींना त्रास होऊ नये म्हणून

घरजावई आणावेत आणि नेहमी आनंदी-आनंद साजरा करत जीवन घालवावं. पण हे आपणा सर्वांना शक्य आहे का?

आपल्या संसाराची सुरुवात करताना सजवलेलं घर, दारात गाडी, घरीदारी नोकरमाणसं, भरपूरसा बँक-बॅलन्स असलेला जोडीदार जर प्रत्येक मुलीने नजरेसमोर ठेवायचा ठरविला तर आयुष्याची चाळिशी उलटलेला पुरुषच जोडीदार म्हणून तिला शोधावा लागेल. आपल्या भावी संसारी – जीवनाची पूर्तता वरीलप्रमाणे व्हावी असं स्वप्न प्रत्येक स्त्री-पुरुषांनी बाळगलं तर त्यात काहीच चूक नाही. कारण ज्या जोडीदारांच्यात धडाडी असेल त्यांना हे स्वप्न 'स्वप्न' कधीच राहणार नाही. ते दोघेही असं स्वप्न सत्यात उतरवतील. ते सत्यात आणल्याचा आनंद घेतील. संसाराची सुरुवात करताना, सहजीवन जगण्याचा आनंद लुटताना, वर उल्लेखलेल्या साऱ्या गोष्टींची गरज असतेच असे नाही. आपल्याला आवडलेल्या पुरुषाकडून सुरुवातीसच फार आर्थिक स्थैर्याची अपेक्षा करून पुरुषाला पेचप्रसंगात पाडण्याचं टाळलं तर स्त्रीचं जीवनदेखील अर्थपूर्ण होण्याचीच शक्यता अधिक आहे असं मला वाटतं.

श्रीमंताघरची मुलगी फक्त वैभव घेऊन येणार म्हणून मुलाने विवाहास तयार होणं हे त्याला नंतर मिंधं जिणं जगण्यास भाग पाडतं असं बहुतेक वेळा नजरेस पडतं. पैशाने मिळणाऱ्या प्रतिष्ठेपुढे, इतर विवाहोत्सुक गुणी मुली ज्या मुलांना तुच्छ वाटतात त्या मुलांनी विवाह झाल्यावर सुखी संसारच करून दाखवायला नकोत का?

एकूण लग्न ठरविताना पैसा, रूप, शिक्षण, वय, प्रकृती, कुल या गोष्टी ध्यानात घेतल्या जातात. पण माणसाचं मन माणसाला कसं विकृत बनवतं याचा एक नमुना म्हणजे 'पत्रिका' पाहण्याचं निमित्त. ज्यांचा ज्योतिषशास्त्रावर, पत्रिका पाहण्यावर, पत्रिकेतील छत्तीस गुण जुळण्यावर विश्वास आहे त्यांनी पत्रिका जुळताच विवाहबद्ध व्हायला नको का? ग्रह आणि तारे हे जर माणसाचे जीवन घडवीत असतील तर असा विश्वास असणाऱ्या कुटुंबात इतर कुठल्याही कमतरतेचे कारण विवाह न जुळण्यात होऊ शकत नाही. ह्या शास्त्रांवर ज्यांचा गाढा विश्वास आहे त्या कुटुंबात मुलाने मुलगी न पाहताही संसारात पदार्पण केल्याची उदाहरणे आहेत – पण लाखांत एखादे. स्वत:ला सुजाण समजणाऱ्या सर्वांकडून पत्रिका पाहण्याचा देखावा हा फक्त 'नकार' देण्यापुरताच केला

जात असण्याची शक्यता या काळात तरी जास्त प्रमाणात दिसून येते. अशी उदाहरणे मी पावलोपावली पाहिली आहेत.

विवाह झाल्यानंतरचे जीवन कसे जाते हा भागच वेगळा. पण जिथून संसारी जीवन सुरू होते तो विवाह जुळविताना व विवाहसमारंभ घडवून आणताना दोन कुटुंबे जोडण्याची अपेक्षा असते – पण बहुतेक वेळा ती कुटुंबे दुरावलेलीच का नजरेस पडावीत? आपल्या मुलीला त्रास होऊ नये म्हणून सारे अपमानाचे किंवा दुखरे प्रसंग हसत सहन करायचेच असतात म्हणून मुलीकडील साऱ्या माणसांनी अयोग्य, खटकलेल्या गोष्टी नजरेआड करायच्या आणि आपली मात्र मुलाची बाजू होताच त्या साऱ्या प्रसंगांचा बचपा म्हणून पुन्हा त्याच त्या खटकणाऱ्या चुकांची उजळणी करायची. आजच्या यंत्रयुगात व्यवस्थित चालणाऱ्या मशिनमधील छोटी छोटी चक्रे एकमेकांच्या दात्यात गोवून देखील न अडखळता फिरतच असतात हे तर आपणा सर्वांना माहीतच आहे. मग आपल्या संसारचक्राशी जोडलेली मुलाच्या व मुलीच्या लग्नाची चक्रेही व्यवस्थित चालावीत म्हणून आई-बाप झालेले स्त्री-पुरुष प्रयत्न करणार की नाही? आपला मुलगा, आपली मुलगी व आपण आईबाप या तिघांनी धैर्याने जोर करायचा म्हटले तर ती अडकू पाहणारी चक्रे एकमेकांच्या संगतीने, स्वयंगतीने, सुरळीत आणि वेगाने धावतील – पण तसे प्रयत्न केले नाहीत तर चक्राचे एकमेकांत अडकलेले दाते कुठे कुठे बोथट होत, झिजून जात जात चक्रांची गतीच थांबवतील. प्रगतीची वाटचाल करताना सुख मिळविण्याची सारी भौतिक साधने असूनसुद्धा जीवनात निर्जीवपणा यायला लागला तर पानांना कीड लागलेल्या वेलीसारखी स्थिती होईल सर्वांची. केवढ्या उमेदीने आपल्या मुलामुलींना आपण वाढवितो? मग त्यांच्या संसारवेलीवर कीड न पडण्याची खबरदारी घेण्याची जबाबदारी आपणा सर्वांची नाही का? त्यातून काही कीड लागलेली पाने आपणाला दिसली तर ती खुडून टाकून वेल अधिक कशी बहरेल हे पाहणार नाही का?

सहवास, आत्मीयता आणि ममत्व या जीवनरसावर खरं म्हणजे साऱ्याच वेली छान बहरायला हव्यात. स्त्री आणि पुरुष या दोघांनीही सहजीवन जगताना प्रेम रसात तुडुंब न्हाऊन निघायला हवं – भिजून चिंब व्हायला हवं. विवाह–वेदीवर पाऊल टाकताना आपल्या मुलामुलींनी अनेक खटकणाऱ्या चालीरीतीचा होम करायला हवा. प्रेमाची धगधगती अग्निशिखा अधिक प्रज्वलित करायला हवी –

तेजस्वी करायला हवी. हे सर्व घडायला हवं – आणि घडणार.

पण नाही घडलं तर मात्र विवाहात पेटलेल्या होमाच्या अंगारातून सर्वस्वाचा 'होम' करणाऱ्या स्त्रिया होरपळून निघणार आणि पुरुषांना ते भेसूर चेहेरे पाहात राहाण्याची शिक्षा मिळणार – काही अपवादात्मक उदाहरणे धरूनसुद्धा.

३

उपभोगिता ?

काही ग्रामीण स्त्रियांच्याबरोबर सुखदु:खाची देवाण-घेवाण करत बसण्याचा योग आला. काही वेळा पाणावलेल्या डोळ्यांनी एखादा संसारातील अपमानाचा प्रसंग सांगणारी भगिनी दुसऱ्याच क्षणी त्या दु:खाला विनोदाची झालर लावून तेच दु:ख हसण्यावारी नेत होती. चपखल शब्दांच्या प्रासाने सर्वांनाच हसवत होती. माझ्याबरोबर माझी मैत्रीण होती. शिकलेली, समाजकार्य मन लावून करणारी, हुषार, पण कुंकू न लावलेली, बांगड्या न घातलेली, मानेलगत पुरुषी थाटाने केस कापलेली व निर्विकार चेहऱ्याने, गंभीरपणे सर्व बोलणे डोक्यात साठवून घेत असलेली—सवयीनं व ह्या सर्व कृतीमागचे तिचे विचार माहीत असल्याने मला काहीच विशेष वाटत नव्हते. तिला बाहेर कुणीतरी आल्याने त्यांना भेटण्यास जावे लागले. तिचे पाऊल बाहेर पडताच सर्वजणींनी शुकशुक करून इतर विषय थांबवले व मला म्हणाल्या, 'ताई, आम्हाला तुम्हांला एक प्रश्न विचारायचा आहे. एव्हढ्या तरुण वयात वैधव्य येण्यासारखी काय दुर्घटना घडली हो या बाईंच्या जीवनात ? त्यांच्याकडे पाहाताना मन अगदी गलबलून येतंय बघा. त्यांच्यासमोर कसं विचारावं म्हणून मन अवघडत होतं—त्या बाहेर गेल्यात म्हणून तुम्हाला विचारायचं धाडस केलं— '

एवढ्यात ती पुन्हा खोलीत शिरली. एकदम शांतता पाहून तिने विचारले–'काय विषय चाललाय?' आमच्यात तसा मोकळेपणा असल्याने मी म्हटले, 'अग तुझ्याकडे पाहून त्यांना वाईट वाटलं—तुझ्यावर वैधव्याची कुऱ्हाड कोसळलीय असा त्यांचा समज झाला—' माझे वाक्य पुरे होईपर्यंत तिने बोलायला सुरुवात केली—

'आपल्या स्त्रियांची गुलामगिरी ही मुळात नवऱ्याच्या नावाने कुंकू लावणं, मंगळसूत्र बांधणं, बांगड्या लेणं यातूनच सुरू झालीय. पुरुषाच्या नावानं आपण कुंकू लावायचं–आपल्या नावानं तो लावतो का टिक्का? घालतो का गळ्यात मंगळसूत्र? बांगड्या घाला, पायी पैंजण घाला, पायाच्या बोटात खण, खण, वाजणारी जोडवी घाला–अहो हे सर्व दागिने नाहीत. आपल्या हातापायांत अडकवलेल्या बेड्या आहेत बेड्या. तुमच्या हालचालीवर सतत लक्ष असावे म्हणून सासू, जावा नणंदा यांचा ती किणकिण म्हणजे परवलीचा शब्द आहे. छुमछुम वाजणारे पैंजण पायात घातले म्हणून तुम्ही खूष होता पण त्यामुळेच तुम्ही कुठे जाता, कुठे येता, कुठे थांबता हे कळावे म्हणून अडकवलेली घंटा आहे घंटा ती. माझा नवरा जिवंत आहे. मनाने आणि विचाराने आम्ही दोघे नवराबायकोच आहोत. त्यालाही ह्या बाह्य गोष्टींचा फोलपणा पटल्यामुळे मला कुंकु लावण्याबाबत, बांगड्या घालण्याबाबत तो कधीच हट्ट धरत नाही. माझ्या नवऱ्याला जर हे खटकत नाही तर जगाची पर्वा कशाला करायची?—" तिचे ते खणखणीत आवाजातील बोलणे ऐकून सगळ्या बाया गपगार. 'मी माझे विचार तुम्हांला स्पष्ट सांगितले, मला काही कामानिमित्त पुढील गावी जाणे जरुरीचे आहे. तेव्हा मी तुमची रजा घेते'–सगळ्या बायांनी माना डोलावल्या. मेंदू जाग्यावर येईपर्यंत कुणाच्या तोंडून शब्दच फुटेना.

एक परिस्थितीची बाई घसा खरवडून बोलायला लागली–'नवरा जिवंत असताना कुंकू न लावता बाहेर पडलो तर नवरा व सासू जिवंत ठेवील का आम्हाला? कुंकू लावलं काय आणि नाही लावलं काय आमची गुलामगिरी थोडीच सुटणार हाय?–' दुसरीच्या तोंडून वेदना बाहेर पडली, 'घराच्या लिंपलेल्या भिंतीत एक फुटका आरशाचा तुकडा हाय–त्यात धड त्वांड बी दिसत नाही. हे कुंकू लावताना काय ती कपाळपट्टी पाह्यची. एकदा कुंकू नीट हाय का म्हणून पाहायला संध्याकाळी फुटक्या आरशात डोकावले तर सासू वराडली

—'वेसवा हायस का ग, संध्याकाळच्या पारी आयन्यात बघायला'—आठवणीनं अजून अंगावर काटा येतोय.'

शहरी आणि ग्रामीण भारतीय स्त्री-जीवनात, राहणीमानात, केव्हढी तरी दरी आहे. नुसता पैसा व शिक्षणाचा अभाव ग्रामीण भागाकडे आहे म्हणून नव्हे तर आम्हा शहरी स्त्रियांकडे पैसा आणि शिक्षण यामुळेच स्त्रीत्व हरवून गेल्याने उत्पन्न झालेली दरीही प्रचंड आहे याची प्रकर्षाने जाणीव झाली.

ज्या स्त्रियांना स्वत:चा चेहराही फुटक्या आरशाच्या तुकड्यात तुकड्या-तुकड्यांनी पाहावा लागतो, ज्यांना स्वत:चं सौंदर्य काय हे मोकळेपणी निरखता येत नाही त्यांना तुमच्या शरीराचे पुरुष भांडवल करतात म्हणून काय सांगायचे? आणि त्याविरुद्ध त्यांनी आरडाओरडा करावा म्हणून अपेक्षा करायची? आमची ग्रामीण भगिनी कसला दुसरा साजशृंगार करणार?—आम्हाला बंधन वाटणाऱ्या कुंकू लावण्यात तिचा मुक्ततेचा कणभर आनंद आहे. कपाळाला कुंकू लावणे एव्हढाच साजशृंगार ती करू शकते. तो तिच्यापासून हिरावून घेण्याचा अधिकार कुणालाही नाही. तिला स्त्रीत्वाचा ठेवा लेवून स्वतंत्र व्हायचंय. मुक्त व्हायचंय.

बांगड्या घालणे वा न घालणे याबाबत व्यक्तिगतरीत्या मला काहीच फरक पडत नाही किंवा व्यक्तीचे मोजमाप करायचे ते परिमाण माझ्या लेखी नाही. उलट काही व्यावसायिक स्त्रियांनी उदा. डॉक्टर्स, नर्सेस, इंजीनिअर्स, फॅक्टरी वर्कर्स यांनी त्या घालूच नयेत. कारण त्यांच्या कामात मग्न असताना या बांगड्यांचा अडथळाच जास्त होतो. आणि खरं म्हणजे एकाग्रपणे कामात गुंतले असतानाचे त्यांचे हात हे व्यावसायिकांचे हात असतात. पुरुषहात व स्त्रीहात हे वेगळेपण त्यांना नसते.

एकत्र कुटुंबात एवढ्या इतर बायका असताना बरोबर कुणाच्या बांगड्या नि पैंजण वाजताहेत हे ओळखणारी सासू खरंच चतुर असली पाहिजे—पण त्याच-बरोबर एवढ्या बायकांच्यातून आपल्या बायकोच्या बांगड्यांचा आवाज ऐकून उत्तेजित होणारा कोणीच रसिक नवरा नसेल असे म्हणणेही धाडसाचे ठरेल.

एखाद्या नववधूचा चुडा भरलेला हात किंवा कोणत्याही स्त्रीचा बांगड्या ल्यालेला हात कितीतरी पुरुषांना आकर्षक वाटत नसेल असे कशावरून? मला स्वत:ला स्त्री असूनसुद्धा असे कितीतरी हात आकर्षून गेले आहेत.

फार पूर्वीपासूनची कलाक्षेत्रातील रसिकता अभ्यासायची असे ठरविले तर

पुरातन महाकाव्ये, काव्ये, नाटके, लोकगीते यांतून आढळत असलेल्या शृंगार-रसाचा आविष्कार नीट निरखावा. 'चुडेकी खन्‌खन् आणि पायलकी छुन्‌छुन्' या नादाने घायाळ झालेले अनेक प्रेमवीर आपली मनोगते मुक्तपणे, रसिकतेने बोलून गेलेले आहेत. 'झुमका गिर गया, गुम हो गया—' कानातील कर्णभूषण गहाळ झाले म्हणून भांबावलेली प्रेयसी व ती शोधण्याची धडपड करणारा प्रियकर यांच्या मनाची अवस्था काव्यात बद्ध करताना ते कर्णभूषण पैशाच्या दृष्टीने किती मौल्यवान होते आणि ते हरवल्यामुळे आर्थिक तोटा किती झाला बरे? म्हणून कवी शब्दरचना करत नाहीत किंवा ते प्रियकर प्रेयसी हळहळत नाहीत—तर ज्या क्षणी ते कर्णभूषण हरवल्याची शक्यता आहे तो क्षण स्त्रीला लज्जित करून सोडतो आणि त्याचबरोबर पुरुषाला जिंकल्याचे समाधानही देतो.

अनुनय—प्रणय आणि प्रणयपूर्ती यात अनुनय आणि प्रणयाला किती महत्त्व आहे हे सर्वांनाच माहीत आहे. नुसतेच नीरस शरीरसंबंधाचे क्षण कुणालाही पशुवत् जीवन जगल्याचीच भावना देऊन जातील. संपूर्ण एकांतात शरीरसुख उपभोगण्याचे भाग्य फारच थोड्या लोकांच्या वाट्याला येते. पण एकत्र कुटुंबात किंवा जागेच्या अभावी ज्यांना असे सुख अनुभवता येत नाही त्यांना नुसती बांगड्यांची किण् किण् आनंद देऊ शकते. पुरुषाचा जातिवंत धसमुसळेपणा, किंवा आपल्या स्त्रीविषयी दाखवायची ओढ जेव्हा जबरदस्त असते, अनावर असते, तेव्हा स्त्रीसुलभ लज्जेने बांगड्यांचा आवाज होतोय हे सांगून स्त्री पुरुषाला प्रणयांत हळुवारपणा आणायची विनंती करते. त्याच्या मनस्वी वृत्तीवर हळुवार फुंकर घालते.

असे हळुवार क्षण ज्यांना भावत नाहीत त्यांना खरं म्हणजे बांगड्या असल्या काय आणि नसल्या काय, कर्णभूषणे घातली काय आणि न घातली काय काहीच फरक पडत नाही. पण दररोजच्या जीवनात शृंगाराचे अत्युच्च क्षण गाठण्यासाठी लागणारे वातावरण सतत पोषक असेलच असे नाही—आर्थिक आणि मानसिक दृष्टीनेही. पण अशा छोट्या गोष्टींची 'नजाकत' लक्षात घेतली तर अवघड वाटणारे क्षणही क्षणार्धात बदलून सुरम्य होऊन जातात. अशा छोट्या छोट्या गोष्टींमधून जर आपण जीवन फुलवू शकलो नाही तर मनुष्यपणालाच आपण मुकतो असं मला वाटतं.

विधवांनी बांगड्या घालू नयेत, कुंकू लावू नये, सौभाग्यचिन्हे लेवू नयेत

ह्याचा आग्रह धरणेही मला मान्य नाही. विधवा स्त्रियांना ही सर्व सौभाग्यचिन्हे लेण्यास आपली संस्कृती मना करते म्हणून आम्ही विवाहित असूनही ती लेणार नाही. हा आमचा त्यांना पाठिंबा आहे–असे म्हणणाऱ्या स्त्रियांना सांगावेसे वाटते की तुम्ही ह्या सर्व वस्तूंना नाकारण्यापेक्षा विधवांनी त्या वस्तू वापरल्या तर काहीच हरकत नाही याचे प्रतिपादन जास्त जोरात करा. विधवा स्त्रियांना हळदीकुंकू, बारशी, लग्न, मर्तिक या साऱ्या समारंभांत मानाने बोलवा व मानाने वागवा. तोंडाशी सरळ जाणारा घासाचा हात डोक्यामागून वळसा घेऊन तोंडाशी न्यायची खटपट करायची काय जरुरी आहे ?

विधवा असली तरी ती स्त्री आहे व तिच्या स्त्रीत्वाचा सामाजिक अव्हेर करणे योग्य नाहीच. उलट तिच्या स्त्रीत्वाचा तो अपमान आहे. आज शहरांतून विधवेचे हे अलंकार लेणे खटकत नाही–त्याची तिला परवानगी आहे. पण तिच्यामागे नाक मुरडणे आपण स्त्रियांनीही सोडलेले नाही हे नाइलाजाने कबूल करावे लागते. आमच्या ग्रामीण विधवा भगिनींच्यात मात्र हे धैर्य अजून आलेले नाही.

प्रत्येक स्त्रीची प्रकृती वेगळी असते. काही विधवा स्त्रियांना अगदी स्वतःकरता जगण्यासाठी, स्वतःला उल्हसित ठेवण्यासाठी व्यवस्थित राहण्याची गरज असते. आपले स्त्रीत्व जपण्यासाठीच तिने कुंकू लावून, बांगड्या लेवून व्यवस्थित कपडे परिधान केले तर लगेच काही ती स्त्री पुरुषसुखासाठी हपापली आहे असे अनुमान काढणे योग्य ठरणार नाही. दुसऱ्या पुरुषाचा विचारही मनात न आणता ती आपले बाईपण टिकवू शकते. आपले उरलेले एकाकी जीवन थोड्या-फार आनंदाने घालवू शकते. तिला सौभाग्य अलंकारांचा अव्हेर करणे म्हणजे पुरुषांना आपल्या अंतःस्थ वृत्ती चाळविण्याचा परवाना देण्यासारखे आहे. पूर्वीच्या काळी असलेले विधवेचे विद्रूप रूप आज दिसत नसले तरी तिचा संभाळ करण्याच्या नावाखाली पुरुषांकडून झालेले अत्याचार ऐकण्यात तरी येतातच.

बांगड्या घालणे, पैंजण लेणे, कर्णभूषणे असणे व कुंकू लावणे – या साजशृंगाराची शृंगारातील नजाकत विवाहितांना विलोभणारी आहे – मग तीच जर विधवा स्त्रियांनीही उपभोगायची ठरवली तर – ? संस्कृतिसंरक्षकांना भेडसावणारा हा प्रमुख प्रश्न आहे. पण कोणतीही स्त्री – विवाहित असो अविवाहित असो वा विधवा असो – जी आपल्या कामभावनेला आवर घालू

शकत नाही, ती प्रसंगानुसार वाहवत गेलेली आपण पाहतोच. असं वाहवणं हा तिचा दोष आहे असं आपण म्हणू शकत नाही – पण त्यातून निर्माण झालेल्या अतीव सुखदु:खाची तीच मालकीण असते.

'ताई, ही नवीन जोडवी घेतलीत.' आमच्या घरी माझ्या मदतीस येणाऱ्या बाई गुलाबी पुडी उलगडत होत्या. नवऱ्याच्या मारहाणीला कंटाळून सहा महिन्यांची मुलगी काखोटीस मारून कोकण सोडून पंधरा वर्षांपूर्वी त्या पुण्यास आल्या. चार-सहा घरची धुण्याभांड्याची कामे करून मुलीला शिक्षण देत आहेत. नुकताच जवळच्या झोपडपट्टीत गाळा घेऊन त्यावर खोपटं बांधून संसार थाटलाय – 'छान आहेत, पायात घालून दाखवा बघू' – माझे शब्द त्यांच्या कानावर पडले की नाही ते माहीत नाही. विचारात हरवलेल्या त्या क्षणात आपले मन उलगडू लागल्या – 'मला संसाराची फार हौस ताई. पण नशीब नव्हतं. माझी हौस आता कोण भागवणार? मीच ना? चार भांडी घेऊन व्यवस्थित खोली लावली, सोनं स्वस्त होतं बगा तेव्हा सोन्याची वाटी व मणी घेऊन हे डोरलं केलं – मला आवडतं म्हणून घालते. मी मेले की तेव्हाच हे उतरायचं. पोरीला सोनं द्यायचं. एव्हढं पाऊल वाकडं पडू दिलं नाही. – त्या नवऱ्याची आठवण पण येत नाही, पण बाई म्हणून माझी हौस मी केली तर चुकलं का?' माझ्या विचारांचा धागा पुढे नेणाऱ्या मंदाबाईंकडे मी पाहत राहिले. नाही नाही म्हणून मान डोलावली. 'माझ्या आजूबाजूच्या राहाणाऱ्या बाया काहीबाही बोलतील असं वाटायचं – पण त्याही म्हणाल्या की तुमची हौस तुम्ही केलीत म्हणून कोणी नावं ठेवणार नाही. दुसरा जन्म कसला येतोय कुणाला ठाऊक –' पैसा व शिक्षण नसणाऱ्या स्त्रिया स्त्रीत्व अनुभवताना कुठेही कचरत नाहीत आणि पैसा व शिक्षण यांनी शहाणपण आलंय असं समजणाऱ्या आम्ही शहरी सुशिक्षित स्त्रिया बरवरच्या गोष्टींना महत्त्व देत स्त्रीत्व नाहीसं करण्याच्या, स्त्रीत्व उपभोगण्याच्या आनंदाला फाटा देण्याच्या मार्गाला लागलोय हे बरोबर आहे का? आयुष्यातल्या काही जिवंत क्षणांची कत्तल करून २००१ च्या रोबोयुगात प्रवेश करण्याचेच आपण स्त्रियांनी ठरविले असेल तर मग जीवनात येणारी नीरसता अटळ आहे असे मानूनच चालायला हवे आता.

४

वैराग्यवृत्ती

" हा संसार असार आहे. यात पुरुषाने आपले मन गुंतवू नये. अंगी विरागी वृत्ती बाणवावी. वैराग्य हे पुरुषाला ब्रह्मपदाला पोहोचवते—" असं नेहमी कानावर पडतं.

—आणि मग डोळ्यांसमोर कितीतरी उदाहरणे तरळू लागतात. भरल्या संसारातून मुलंबाळं-स्त्री यांच्या सहवासाचा लाभ घेतलेला गृहस्थ बाहेर जाऊन येतो म्हणाला आणि परतलाच नाही. एकदम संसाराबद्दल वैराग्यच उत्पन्न झालं त्याला.

अमुक एक मुलगा देवाच्या शोधासाठी, ज्ञान मिळविण्यासाठी, संसाराची आसक्ती न बाळगता घरातून पळून गेला. एवढ्या लहान वयातही वैराग्य आलं त्याला.

ज्ञानेश्वरांनीही एवढ्या लहान वयात, तरुणपणात असताना ब्रह्मांडज्ञान मांडले. ब्रह्मचारी असूनही संसाराच्या गुंत्याची उकल केली. खरंच, धन्य तो पुरुष! आणि बोहल्यावरून 'सावधान' हा शब्द ऐकताच अंतरपाटापलीकडील एका स्त्री-जीवाच्या मनाला उद्ध्वस्त करून पळून जाणाऱ्या नारायण ठोसरांचे कौतुक तरी किती?

हे सर्व सांगताना ज्ञानेश्वरमाऊली व रामदासस्वामी यांच्या तत्त्वज्ञानाबद्दल मला संपूर्ण आदर आहे हे स्पष्ट करते. त्यांना कुठेही कमी लेखणे वा त्यांची निंदानालस्ती करणे हा हेतू मुळीच नाही. एक पुरुषव्यक्ती व त्याच्या जीवनातील घटना यांचाच फक्त विचार आहे.

वैराग्य स्त्रीला येत नसेल का हो? का या वृत्तीवरही पुरुषाचीच मक्तेदारी आहे? ही विरागीवृत्ती हृदयाला स्पर्शायला स्त्री आणि पुरुष असा भाव ती वृत्तीही दाखवते का?

'अहो, वृत्तीला कुठला आलाय स्त्री-पुरुष भाव?' 'नाही ना?'—मग स्त्रीला वैराग्य येऊनही तिच्या वैराग्यवृत्तीबद्दल समंजसपणा कुणी दाखवायचा?

प्रत्येक जन्माला आलेल्या जीवाचा एक विशिष्ट पिंड असतो. सर्व गुण-अवगुण हे कमी-अधिक प्रमाणात प्रत्येकात विखुरलेले असतात. ही लक्ष्मी भांडखोर आहे. ही सीताबाई बोलभांड आहे, ही जानकी मत्सरी आहे आणि ही सोनूबाई चहाडखोर आहे. हे रामराव गर्विष्ठ आहेत, हे शामराव रागीट आहेत; हे आनंदराव अगदी व्यवहारशून्य आहेत; आणि हे बाबासाहेब जिथे तिथे काड्या घालणारे आहेत.

अरे पण हो! हीच लक्ष्मी पुरणाच्या पोळ्या किती सुरेख करते, हीच सीताबाई घर किती स्वच्छ आणि नीट नेटकं ठेवते, हीच जानकी गोधड्या किती सुंदर शिवते आणि हीच सोनूबाई अडलेल्या वेळी स्वभाव विसरून जाऊन मदतीस उभी राहाते. तीच गोष्ट पुरुषांची. रामरावांनी गर्व करू नये हे खरं पण त्यांनी गर्व नाही करायचा तर कुणी? सर्व स्वत:च्या हिंमतीवर उभं केलंय. एक गर्विष्ठपणा सोडला तर मात्र माणूस लाख मोलाचा. शामराव रागावले नसताना जाऊन पाहा. त्याच रागीट डोळ्यांमधून मिस्किल हसू ओसंडताना सापडेल. आनंदराव स्वत:च्या व्यवहारशून्यतेला हसून, 'अक्कलखाती जमाऽऽऽ! हे वाक्य म्हणून गप्प बसतात. आणि बाबासाहेब आपणच निर्माण केलेले भांडण हिरीरीने, समजुतीने सोडवतात.

—म्हणजे सर्व अधिक-उणे हे स्त्री-पुरुषांत सारखेच असते. पण बाईने विरागी वृत्ती दाखवणे हे समाजाला मान्य नाही. ज्ञानेश्वरमाऊलींनी त्यांच्या आईबापांचा जो संसार पाहिला आणि सुखी, आनंदी बालपणाला वंचित होऊन अपमानित जिणं जगण्यामधली स्वत:ची व भावंडांची तडफड पाहिली; त्यावरून

त्यांना ह्या संसाराबद्दल अनासक्ती निर्माण झाली तर आश्चर्य करण्यासारखे काही नाही.

आजसुद्धा जेव्हढे संसारी पुरुष वैराग्याचे कौतुक करत, आपल्या बायका-मुलांचे शिव्याशाप घेत जिथे कुठे तीर्थक्षेत्री वास्तव्य करत असतील त्यांचे बालपण किंवा त्यांना तोंड द्याव्या लागणाऱ्या संकटाचा अभ्यास केला तरच त्यांचे पळून जाणे थोडेफार समजू शकेल. पण संसार करताना स्त्रीला संसारा-विषयी उदासीनता येऊनही ती घर सोडून गेलेली सहसा दिसत नाही. तिने संसारात या वृत्तीचा अंगीकार केला तर तिला 'ही काय अवदसा आठवली? कसा हसतखेळत, सर्वांची मर्जी राखत मौजेनं संसार करावा. एवढी अवकळा धारण करायला काय नवरा मेलाय का—?' अशीच बोलणी ऐकावी लागतात.

लहानपणीसुद्धा एखाद्या मुलीला नसते नटण्या-मुरडण्याची आवड. चार-चौघांत मिरविण्याविषयी तिला तिटकारा असतो. तिला साधेपणा आवडतो. तिची प्रकृती थोडी गंभीर असते. पण ते लक्षात कुणीच घेत नाही. 'ज्या त्या वयात त्या वयासारखं वागायचं सोडून आजीबाई झालीय नुसती. जसं काही जगाचं ओझं हिच्यावर टाकलंय. असलं हे ध्यान कुणाच्या पदरी टाकायचं बाई? काळजीच आहे—' हे उद्‌गार तिला दुखावत नसतील का?

आई-वडिलांचा दु:खी संसार, स्वत:चं कोमेजलेलं बालपण आणि त्यांत धर्मग्रंथांनी केलेला ब्रह्मचर्यव्रताचा कंठशोष यांनी पुरुषाचं उमलत्या वयातील मन घाबरून जात नसेल असं थोडंच आहे? 'वीर्याचा एक थेंब रक्ताच्या हजार थेंबाबरोबर आहे, तो वाया घालवू नका'—असे वाक्य वाचता येणाऱ्या तरुणाला पौंगडावस्थेतच जर नजरेस पडलं किंवा एखादा अशिक्षित पण वयात येणारा तरुण शारीरिक शक्तीची कसरत बघत आखाड्यात रमला असता मित्रांकडून त्याच्या कानावर शब्द पडले—'अरे, असली कुस्ती खेळायला जी शक्ती लागते ती कमवायला मनाची ताकदच लई लागते. बाईच्या वाऱ्यालासुद्धा उभं राहायचं नाही. बाई भेटली की सारी ताकद खलास—!!' आणि मग तो तरुण आपल्या नैसर्गिक भावनांना आवर घालत उन्मळून पडतो. धड संसार नाही नि धड पहिलवानकी नाही. लग्न ठरविताना वडील आपल्या मुलाची तरफदारी करतात, 'आमचा मुलगा अगदी सच्छील हो! मुलीकडे कधी मान वेळावून बघणार सुद्धा नाही. अगदी नाकासमोर नजर.' हा जर 'गुण' असेल तर त्याचे

लग्न करण्यासाठी सर्वजण का धडपडतात ? ज्यांना सहजीवन जगण्याची ओढ नाही त्यांच्यावर संसार का लादतात ? मुलं काय आणि मुली काय, त्यांना नको असताना संसारात ढकलायचे–आणि अशा संसारातून पळून जाण्याची मुभा मात्र फक्त पुरुषाला ! त्याच्या अर्धवट संसार टाकून पळून जाण्यावर शिक्का मात्र वैराग्याचा. बाईला ती वृत्ती दाखवण्याची सुद्धा संधी द्यायची नाही. आधुनिक, सुशिक्षित समाजातील स्त्रीकडून जर यदाकदाचित अशा वृत्तीचे प्रदर्शन झाले तर नवरा म्हणतो, ' आमची ही ' ना अगदीच अरसिक ! सारा थंडा कारभार !' असा भेदभाव का ?

संसार अर्धवट टाकून जाणारे तर सारे पुरुष पळपुटेच असतात. संसारात संकटं उभी राहिली की एक तर लढायला पाहिजे; त्यांना तोंड देण्यासाठी धडपडलं पाहिजे नाहीतर कुल्ल्याला पाय लावून पळून जायला पाहिजे. आणि हा दुसरा सोपा मार्ग अवलंबलेल्याचं जगानं कौतुक करावयाचं ही कुठली रीत ? हा चक्क भ्याडपणा आहे. आपला समाज जेव्हा त्यांना कौतुकाचे, गौरवाचे हार घालू पहातो तेव्हा पळून गेल्यावर तरी त्यांनी मोठे विरागीवृत्तीनेच जीवन घालवले असेल याची खात्री देऊ शकतो काय ? साऱ्या वेश्यावस्तीतून तथाकथित ब्रह्मचारी व संसारी माणसांची ये-जा आपण समजू शकतो. पण तिथे जेव्हा ही वैराग्याचे पांघरूण पांघरलेली मंडळीही मुक्तपणे ये-जा करत असतात, किंवा आपल्या शिष्यगणातील स्त्रियांकडून ' देवाची सेवा ' या नावाखाली जे सुख लुटत असतात ते पाहता असेच मनात येते की असल्या वैराग्याचे कौतुक करण्यापेक्षा त्या पुरुषाची टाकून दिलेली स्त्री ही जास्त कौतुक करण्याच्या लायकीची आहे. संकटांना तोंड देण्याच्या बाबतीत....ज्या परिस्थितीत तिचा ' विरागी वृत्ती ' आलेला नवरा पळून गेला त्या परिस्थितीत–तीही खचलेलीच असते. तिच्याजवळही धैर्य नसते. ताकद नसते. पण उरलेसुरले धैर्य ती पळून जाण्यात वाया घालवत नाही. ती त्या परिस्थितीशी सामना करणे पसंत करते, किंबहुना पुरुषाने पलायन केल्याने तिला झगडून मार्ग काढण्याशिवाय इलाजच उरत नाही. तिने दाखवलेल्या धाडसाचे ' व्यक्ती ' म्हणूनही कोणी कौतुक करत नाही. समाजही उपेक्षेने फक्त बोटेच दाखवतो. तिच्या मायबहिणींनीही तिला छी: थू करायचे. ' हिचेच चुकले असणार ! नवऱ्याला छळत असणार ! नवऱ्याला संभाळता आलं नाही तेव्हा हे करंटेपण पदरी आलंय— ' असलं

बोलणं कानी पडताच तिचं मन आक्रोश करतं, 'नाही हो, मी त्यांना कसलाही त्रास दिला नाही. उलट साथच देत होते. पण, ते 'भ्याड' होते. हे निघून जाणं लांच्छनास्पद आहे त्यांना',—मनापासून आलेले शब्द तिच्या अंत:करणाच्या आधणात उकळत राहातात. कढ ओसरून गेल्यावर दुसरा काहीच उपाय नसल्याने देवाला, नशिबाला दोष देत ती आपल्याच मनाची समजूत काढते. संस्कारांनी निगरगट्ट झालेलं मन तिच्यातील पत्नीव्रताला हलवतं आणि मनातल्या मनात का होईना पण आपण विरागी वृत्ती आलेल्या नवऱ्याला 'भ्याड' म्हटलं या पापाचे क्षालन करण्यासाठी उपासतापासाचं आणखी एक कडक व्रत ती स्वीकारते.

कधी जाणीव होणार आम्हा स्त्री-पुरुषांना की एखाद्या गोष्टीची सत्यासत्यता पारखून घेताना स्त्री व पुरुष हा भेद टाकून देऊन व्यक्ती म्हणून विचार करावयाचा. योग्य-अयोग्य न पाहता अयोग्याला योग्य म्हणण्याचा अट्टहास तरी आपण सोडून द्यायला नको का?

वैराग्यवृत्ती आणि त्यातील पुरुषांची मक्तेदारी या संदर्भातच हे विचार आहेत. विरागी वृत्तीबद्दल माझ्या मनात नितांत आदर आहे आणि सर्वसामान्य स्त्री-पुरुषांनी जीवनातील आसक्तीविषयी वयपरत्वे अलिप्तता अंगी बाळगण्याची वृत्ती वाढवावी असं मला स्वत:ला मनापासून वाटतं.

विरागीवृत्ती व आसक्ती यांचा सर्वार्थाने विचार हा जीवनाच्या प्रत्येक अंगाविषयी करायला हवा. भौतिक गोष्टींविषयी लिप्त-अलिप्तता आपण सोडून देऊ व मनाच्या अलिप्ततेचा विचार करू. वैराग्याची भाषा बोलताना त्याची दुसरी बाजू आसक्ती ही शारीरिक-संबंधाबाबतचा स्वैराचार, लंपटपणा इथंच नेऊन बहुतेक वेळा भिडविली जाते. आजकालची स्त्री-मुक्तीची चळवळ ही स्वैराचार पसरवणारी आहे असा उघड आरोप वारंवार केला जातो. स्त्रीचे वैराग्य समाजाने मानले नाही आणि आज स्वैराचाराची उधळणही तीच करते आहे असं म्हणणं अन्यायाचं नाही का? असा स्वैराचार असलाच तर अर्धा आरोपी पुरुषवर्ग आहे हे विसरून चालणार नाही. असो. प्रश्न आहे वैराग्याचा –

महाभारतातील एक उदाहरण –

'शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे....' हा श्लोक सर्वांना माहीत असावा. पण नुसते शब्द म्हणून. शुक नावाचा असेल कुणी ऋषिमुनी व त्याची विरागी

वृत्ती श्रेष्ठ असलेली एखादी सुंदर कथाही असेल लिहिलेली – पण ती कथा ज्यांना माहीत नाही त्यांच्याकरता इथे ती सांगणार आहे –

शुक ऋषी हे महर्षी व्यासाचे पुत्र. सारे राजेरजवाडे, ऋषिमुनी, प्रजाजन जेव्हा शुक ऋषींच्या विरागी वृत्तीचे कौतुक करू लागले तेव्हा ज्ञानी असूनही महर्षी व्यासांच्या मनात पाल चुकचुकत असावी. शुकमुनींनीही ते ओळखले. एकदा आपल्या वडिलांसमवेत ते दुसऱ्या गावी जाण्यास निघाले. गावची सीमा पार करताना नदीचा घाट ओलांडावा लागे. सकाळची वेळ असल्याने सारा घाट स्त्रीवर्गाने गजबजलेला होता. कुणी भांडी घासीत होत्या, कुणी कपडे धूत होत्या. कुणी कळशा भरून परतत होत्या तर कुणी सकाळचं आन्हिक आटोपत होत्या. संपूर्ण विवस्त्र अवस्थेतील तरुण शुकमुनी जेव्हा नदीचा घाट झपझप ओलांडून गेले तेव्हा घाटावरच्या वातावरणात तिळमात्रही बदल न होता सारे व्यवहार निश्चितपणे चालले होते. त्यांच्या पाठोपाठ थोड्याच वेळात महर्षी व्यास घाट ओलांडायला लागले. एकदम साऱ्या वातावरणात चलबिचल झाली. कपडे धुताना, धुणे आपटताना चालू असणारे संवाद, हंसणे, खिदळणे एकदम बंद झाले. भांडी घासणाऱ्या बायकांनी तोंडे फिरविली. कळशा भरून घेऊन जाणाऱ्या अर्ध ओलेत्या स्त्रिया रस्त्याच्या बाजूला तोंड फिरवून गप्प उभ्या राहिल्या आणि अंग धुणाऱ्या स्त्रियांनी भराभर वस्त्रे लपेटून घेतली तर काहींनी पाण्यातच बुडया घेतल्या. एका क्षणार्धात घडलेल्या ह्या बदलाचे महर्षी आश्चर्य करेपर्यंत ते शुकाजवळ येऊन पोहोचले. शुकमुनींनी मंदस्मित केले आणि तेव्हा महर्षी व्यासांना विरागी वृत्ती म्हणजे काय हे उमजले असावे.

आपल्या मनात जसे भाव असतात त्याचे प्रतिबिंब दुसऱ्याच्या मनात उमटते. तुम्ही पुरुषभाव धरून स्त्रीशी वागायला जा तिने उगाच पदर सावरलाच म्हणून समजा. तुम्ही स्त्रीभावाने ओथंबून पुरुषाकडे नजर टाका, क्षणार्धात त्याची नजरही दुसरीकडे वळलीच म्हणून समजा. यात अर्थात् वाईट काहीच नाही.

वैराग्याचे स्तोम, त्याचा फोलपणा, अलिप्तवृत्तीची स्त्री-पुरुषांकडून अपेक्षा हे सर्व सांगत कुठं नेताय आम्हाला असं तुम्ही कदाचित् म्हणाल. पुढच्या काळातील स्त्रीचं असं एक वेगळं रूप आपल्याला प्रखरतेनं जाणवणार आहे, त्या रूपाबद्दल कुरूपता निर्माण होऊ नये म्हणून ही धडपड आहे. नजदिकच्या एकदोन पिढ्यांतच एक नवा स्त्री वर्ग निर्माण होणार आहे.

आजच्या आर्थिक तणावाच्या काळात स्त्री व पुरुष या दोघांनाही अर्थार्जन करणे भाग आहे. ज्या वयात पुरुषाने संसार थाटायला हवा त्या वयात लग्न करायला पुरुष तयार नाहीत. आर्थिक पारतंत्र्य वेळप्रसंग आला तर नको म्हणून मुलीही शिक्षण पूर्ण करण्याच्या धडपडीत. दोघांच्या विवाहाचा काल हा पुढील काळात वाढतच जाणार आहे.

आजचे आई-बापांचे संसार, त्यातील ताण-तणाव, स्वत:ला आयुष्याची तिशी ओलांडेपर्यंत आलेले जीवनानुभव अविवाहित स्त्रीला विवाहापासून परावृत्त करण्यास कारणीभूत ठरण्याची शक्यता आहे. एकटं राहून आपले जीवन घालवणं हे स्त्रिया अधिक पसंत करण्याची देखील शक्यता आहे. आत्ताच कितीतरी क्षेत्रांत उच्चपदावर असणाऱ्या स्त्रियांनी आपली करिअर हेच ध्येय मानून जीवन व्यतीत करावयाचं ठरविलं आहे. त्यांच्या अनेक मुलाखतींमधून असं एकटं जीवन जगण्याबद्दलचा कडवटपणा मुळीच प्रगट झालेला नाही.

तोच प्रश्न मुलं होऊ देण्याच्या बाबतीमध्येसुद्धा. आज कितीतरी स्त्रीपुरुषांनी आपण मूल जन्माला घालायचेच नाही असे ठरविलं आहे—'विवाह उशिरा झाल्याने मुलांचे पालनपोषण करून त्यांना जीवन जगण्यास समर्थ करू ही खात्री जेव्हा वाटत नाही तेव्हा त्यांना जन्माला घालाच कशाला?' काही मुलींनी विवाह करतानाच हे स्पष्ट केले आहे. 'आमच्या आई-वडिलांचा संसार करून आम्ही थकलो.' एक मुलगी म्हणते—'आईची वारंवार बाळंतपणामुळे ढासळलेली तब्येत; वडिलांची पैसे कमविताना ची धडपड व त्याचे अपुरेपण. घरची वडील बहीण या नात्याने भावंडांची देखभाल करत माझा संसार बालपणी व तरुण वयातच आटोपला. आता निदान प्रौढत्व आणि म्हातारपण तरी आरामात जाऊ दे. खरोखर मी स्वत: मूल जन्माला घालावं असं मला अजिबात वाटत नाही. मला मूल नाही असं 'कुणा बाईनी किती मुलं?' म्हणून विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मला अजिबात खंत वाटत नाही. उलट मी मूल जन्माला न येऊ देण्याचा निश्चय केलाय असं अभिमानानं सांगते. मी माझ्या भावाच्या, बहिणीच्या व मैत्रिणींच्या मुलांना जीव लावते. तेवढंच बस्स.'

स्त्रीच्या वैराग्यवृत्तीकडे समाजाने आजपर्यंत जेवढं दुर्लक्ष केलं तसंच या अविवाहित किंवा नुसते सहजीवन जगण्यासाठी उद्युक्त झालेल्या स्त्रीवर्गाकडे पुढील काळात दुर्लक्ष करून चालणार नाही. त्याची ही जीवनातील विरागीवृत्ती

काहीवेळा नैसर्गिक असेल पण बहुतेकवेळा परिस्थितीच्या कोंडमाऱ्यामधून निर्माण झालेली असेल. अजाणता मिळालेल्या वैराग्यहक्काचे आत्तापर्यंत पुरुष भांडवल करून जगला पण आज जाणीवपूर्वक कुणाला न फसविता, कुणा पुरुषमनाची ओढाताण न करता ज्या स्त्रियांनी ह्या जीवनमार्गाचा अवलंब केलेला आहे, त्यांचे निर्णय समाजाने आदरणीय मानायला नकोत का ? आत्ताच्या काळापासून वयात येणाऱ्या मुलामुलींना अशा कर्तृत्ववान किंवा अपत्यहीन स्त्रियांबद्दल किंचितही तुच्छता निर्माण होणार नाही याची काळजी घेणं जरुरीचं आहे. प्रकर्षाने विरागीवृत्ती दाखवणारा जो स्त्रीवर्ग आपल्या दृष्टिपथात येणार आहे त्याकडे निकोप मनाने पाहता येणं जुन्या व नव्या पिढीला आवश्यक आहे.

आयुष्यात सर्वच युद्धे जिंकली जात नाहीत. काही वेळा पराजय देखील स्वीकारावा लागतो. वैराग्याचा स्वीकार करून जीवन जगणाऱ्या ह्या स्त्रियांकडे 'पराजिता' म्हणून बोटे दाखवण्याची शक्यता असली तरी आजच्या व पुढच्या पिढीने त्यांना 'अपराजिता' असेच मानून त्यांचा गौरव करणे योग्य ठरेल.



५

कौटुंबिक वटवृक्ष

'आज कुटुंबसंस्था मोडकळीस आलीय, पुढच्या पिढीत बहुधा कोलमडून पडेल —' साठी उलटलेल्या स्त्री-पुरुषांकडून असे बोल जेव्हा कानी पडतात तेव्हा आपल्या मुलाबाळांच्या भवितव्याविषयीच्या कल्पनेनं हृदय धडधडायला लागतं. त्यांचे उद्‌गार हे सर्वांच्याच मनात उमटणाऱ्या सादाचे प्रतिसाद असतात.

ही कुटुंबसंस्था कशी काय निर्माण झाली असेल? मूल जन्माला येते आणि स्त्री-पुरुषाचा राजाराणीचा नवसंसार कुटुंबाचे रूप धारण करतो. अगदी पुरातनकाळी मानवजमात ही टोळ्या करून राहत असे. सर्व स्त्री-पुरुष-मुले यांचा एक कळपच असे. टोळीतील सर्व पुरुष हे बाप असत, सर्व स्त्रिया या माता असत आणि सर्व मुले त्या सर्वांची असत. या सर्व स्त्रियांना जनी म्हणजे मुलांना जन्म देणाऱ्या, – पुरुषांना जन म्हणजे मुलं उत्पादणारे आणि मुलांना जात म्हणजे स्त्रिया व पुरुष याजपासून झालेले असे संधोधण्यात येई. 'वसुधैव कुटुंबकम्' हा थोर विचार तेव्हा असण्याची शक्यताच नव्हती. कारण वसुधेचे रूपच अज्ञात होते त्या टोळीला. 'हे विश्वची माझे घर' — ह्या जगन्मान्य झालेल्या आजच्या थोर विचाराचे बालरूप मात्र त्या काळी ह्या

टोळीच्या स्वरूपात अस्तित्वात होते यात शंका नाही. आज जीवनाची प्रगल्भता दाखवणारे एक मूलभूत तत्त्व जाण आल्याने स्वीकारणे कठीण जाते, ते अजाणता तिथे निर्माण झाले होते.

सामुदायिक मातृत्व व पितृत्व मान्य असलेल्या त्या काळात पिता कोण हे जरी निश्चित ठरविता येत नव्हते तरी जन्मदात्री आई ही कुणा कुणा मुलांची आई आहे हे डोळ्यांनीच पाहिले असल्याने कळत असे. मानवी जमातीचे सातत्य टिकवण्यासाठी जी प्रजा-जनन शक्ती आहे ती स्त्रीमध्येच एकवटलेली आहे हे पुरुषांना ओळखले होते. आपल्या टोळीचे सामर्थ्य संख्येने वाढवायचे असेल तर स्त्री ही महत्त्वाची घटक आहे हे मान्य करण्यात त्याला काही अवघड वाटले नसणार. 'जननी' आणि 'वंशाची माता' या भूमिकांतून स्त्रीला मानाचे स्थान प्राप्त झाले होते. ह्या स्त्री-सत्ताक काळातच कुटुंबसस्थेचे बीज रोवले गेले असावे असे मला वाटते. टोळीतील मुलांची संख्या जसजशी वाढू लागली तशी प्रत्येक स्त्रीच्या संबंधात येणाऱ्या मुलांची संख्याही विशिष्ट होऊ लागली असावी. आपली मुले कोणती हे स्त्रीला गुह्य नसल्यामुळे त्यांचे पालनपोषण, संवर्धन करताना टोळीतील इतर स्त्रियांशी (जरी सर्व मुले सर्वांची असली तरीही) मतभेद किंवा आवडीनिवडीचे तंटे त्यांच्यात सुरू झाले असावेत. जी वृत्ती आजही समाजात घट्ट रुजली आहे. सवतीच्या मुलाचा संभाळ करण्याची वेळ आलेली स्त्री आपल्या स्वतःच्या मुलाच्या व सावत्र मुलांच्या बाबतीत काही अपवाद वगळता जो आपपर भाव दाखवते तो आपणा सर्वांना माहीत आहे. 'आपला तो बाळ्या व दुसऱ्याचं ते कार्टं—' या म्हणीमागेही त्या वृत्तीचेच बीज आहे. आज जिथे जिथे एकत्र कुटुंबे आहेत तिथे होणाऱ्या जावाजावांतील भांडणाचे किंवा वादावादीचे मूळही आपल्या व दिराच्या मुलातील उजवे–डावेपणा जोखण्यातच आहे. आपल्या बालकांचे संवर्धन आणि पालनपोषण अधिक चांगले कसे होईल याचा विचार करताना स्त्री समुदायात दर्शनी स्वरूपात नसली तरी प्रथम विभागणी व्हायला सुरुवात झाली असावी. कालांतराने आपले ज्यांच्याशी भांडण होत नाही अशा स्त्रिया आपापली मुल घेऊन गट करून राहायला लागल्या असाव्यात. टोळीतील प्रजेची एकूण संख्या वाढल्याने पुरुषही सर्वच स्त्रियांशी संबंध ठेवण्याच्या भानगडीत न पडता आपल्याला आवडणाऱ्या स्त्रियांच्या गटाशी जास्त संबंध ठेवू लागले असावेत—जी आवड-निवड आजही आपणा स्त्री-पुरुषांत

आहे. पुरुष-स्त्रिया आणि त्यांची मुले यांचा समावेश होऊनच छोटे गट निर्माण झाले आणि त्याचे कुटुंब बनले. काही मानवजमातीत एक स्त्री व एकाहून अधिक पुरुष व त्यांची मुले कुटुंबात एकत्र राहत तर काही मानवजमातीत एक पुरुष, एकाहून अधिक स्त्रिया व त्यांची मुले एकत्र राहात. या पद्धती मानवसमूहातील स्त्री-पुरुषांची संख्या व त्यांचे प्रमाण यावर अवलंबून असे. आपल्या कुटुंबाची वंशावळ सांगताना स्त्रीच्या नावाने कुटुंब ओळखले जायचे. नंतरच्या काळात तिच्या मुलांचे नामाभिकरणही तिच्या नावावरून व्हायला लागले. मुलांच्यावर आणि संपत्तीवर तिचाच अधिकार असे. अशा तऱ्हेने मातृसत्ताक कुटुंबपद्धती रूढ झाली. आजसुद्धा—पृथ्वीवर अनेक ठिकाणच्या मानववसाहतींमध्ये मातृसत्ताक कुटुंबपद्धती चालू आहे.

मग स्त्रीला महत्त्व असलेली अशी ही सहज निर्माण झालेली पद्धत जाऊन पितृसत्ताक पद्धती कशी रूढ झाली असा प्रश्न येतो. स्त्रीसत्ताक कुटुंबपद्धतीचे पुरुषसत्ताक पद्धतीत रूपांतर होईपर्यंत हजारो वर्षांचा काळ गेला हे खरं; पण हा बदल घडायला काय कारणे झाली असावीत हे पाहायला हरकत नाही.

आजच्या काळातील पुरुषसत्ताक पद्धती यायच मूळ कारण हे स्त्री व पुरुष यांचे श्रेष्ठत्व व कनिष्ठत्व किंवा शारीरिक ताकद – कमजोरी हे नसून पुरुषाला जेव्हा मुलाच्या जन्माला आपण कारणीभूत असतो व आपल्या स्त्रीबरोबर होणारा दुसऱ्या पुरुषाचा संग येनकेनप्रकारेण आपण रोखू शकलो तर जन्माला आलेले मूल हे आपलेच आहे यांची खात्री वाटली असणार आणि त्यातून स्त्री व मुले यांच्यावरील मालकी हक्काची जाणीव निर्माण झाली असणार. गर्भावस्था व बाळंतपण या स्थितीतील स्त्रीची अगतिकता आणि जन्माला आल्यापासून मूल अपल्या पायावर उभे राहीपर्यंतचे मुलाचे शारीरिक दौर्बल्य लक्षात घेता पुरुषाने संरक्षणकर्त्याची भूमिका अत्यंत चोखपणे बजावण्यास सुरुवात केली असणार. आणि नवीन जीवाचे लालन-पालन करण्यात तो रमलाही असणार.

हे सर्व वैचारिक व सामाजिक परिवर्तन घडत असताना इतरही अनेक गोष्टींचे ज्ञान वाढीस लागले होते. शेतीची सुरुवात होऊन वन्य पशूंशी सतत सामना करण्याच्या दगदगीला आता पुरुषाला सामोरे जायची गरज नव्हती. ती धडपड खूपच प्रमाणात कमी झाली होती. एकप्रकारचे स्थैर्य पुरुषाच्या जीवनता अवतरले. वन्य पशूची शिकार करताना स्त्रियांची मदत होण्यापेक्षा अडथळाच

जास्त होत असल्याने तिला व लहान मुलांना मागे सुरक्षित जागी ठेवून आपल्या इतर पुरुष-सहकाऱ्यांसमवेत तो जंगलात दूरवर जात असे. मात्र शेतीची सुरुवात झाली आणि मुलांना जन्म देणे, वाढविणे एवढ्याच कामात मग्न असलेल्या स्त्रीवर मात्र अधिक जबाबदारी येऊन पडली. शेतीची जमीन ही निवासस्थानाच्या जवळपासच असल्याने रिकाम्या वेळात पुरुषाच्या जोडीने ती शेतावर राबण्यास जाऊ लागली. तिच्या ह्या मदतीने पुरुषांचे स्थैर्य दुणावले आणि त्याच वेळी त्याच्या मनात आरामाच्या, सुखाच्या कल्पनेचा जन्म झाला असावा.

जन्मदाता, संरक्षणकर्ता आणि स्वामी म्हणून सुखासीनतेकडे झुकलेल्या या पुरुषाने आपली कुटुंबाची कल्पना पक्की केली. मुले व स्त्रिया यांना काही वेळा सुखाची गाजरे दाखवत आणि काहीवेळा बागुलबोवाची भीती घालत त्याने आपल्या संपूर्ण कब्जात घेतले. धर्म आणि नीतिबंधने यांचा आविष्कार करून त्यांच्या सहाय्याने स्त्रिया व मुलांवरील आपली पकड त्याने घट्ट केली आणि कुटुंबसंस्थेचा तो अनभिषिक्त राजा बनला.

असे हे राजे, त्यांच्या राण्या व त्यांचे राजकुमार काही काळ निश्चित सुखाने जगले असणार पण मानव-वंश वाढीच्या कालात हा सुखाचा काल हळूहळू कमी होत गेला. सुख आणि सत्ता याला दृष्ट लागू नये असे वाटणाऱ्या राजांच्या मनातून राण्या आणि राजपुत्र हळूहळू लोप पावले. त्यांना गुलाम करण्याच्या कल्पनेचा उदय झाला. कुटुंबाचे भरण-पोषण करण्याची जबाबदारी घेतलेला भर्तृ, पितृ आणि भ्राता हे नाते नाममात्र राहिले. आर्थिक विवंचना पुरुषाने आपल्या शिरावर घेतली तेव्हा त्या विवंचनेचे निराकरण करण्यात मला मदत नको का? शेतीच्या कामात मला सहकार्य नको का? असे प्रश्न विचारत स्त्रीकडून प्रजोत्पादन करत घरचे हक्काचे शेतमजूर निर्माण करण्यास त्याने सुरुवात केली. आणि आजतागायत ती चालू आहे. आज संततिप्रतिबंधक उपायांनी आपल्या मुलांचा जन्म रोखावा या कल्पनेला शेतीवर जगणाऱ्या पुरुषांचा विरोध आहे. नाराजी आहे. विनातक्रार राबणारे गुलाम सर्वांना हवे असतात. आजचे राज्यकर्तेही याच पुरुषवर्गातून आल्यामुळे शेतीवर राबणाऱ्या घरच्या स्त्रियांना व मुलाबाळांना काही मजुरी द्यावी ही कल्पना त्यांनाही सहन होत नाही.

माझं घर, माझी शेती, माझा नवरा, माझी मुलं या चार बेड्यांत आपले हात-पाय कधी अडकले हे स्त्रीला कळलंच नाही. तिची आपली शारीरिक कमजोरीची

जाणीव मात्र पक्की होती. त्यामुळे आपल्या व मुलाबाळांच्या सुरक्षिततेच्या आधाराचं गुणगान करण्यात ती एवढी रमली की आपलं सारं जीवन तिने पित्याच्या, पतीच्या, भावाच्या आणि पुत्राच्या हातात सोपवून दिलं. असा आपल्या जीवनाचा सौदा करणारी स्त्री आणि सौदा पटवून घेणारा पुरुष या दोघांचाही तो मूर्खपणा होता. त्या मूर्खपणाचे बक्षीस दोघांनीही आपापल्या परीने भरपूर भोगले आहे. स्वत:चे हातपाय हलविण्याचं स्वातंत्र्य स्त्री गमावून बसली.

काळ त्याच्या स्वभावानुसार पुढे पुढे धावतच होता. तिच्या जीवनक्रमात राबराबण्याचा तिला कंटाळा जाणवू लागला. शरीराची व मनाची साथ उभारीने असेपर्यंत ती खुशीनं राबली पण जेव्हा ही साथ अपुरी पडली तेव्हा तिनं राबण्यास नाराजी दाखवली. पण तिच्या नाराजीकडे पिता, पती, पुत्र लक्षच देईनात. उलट माझी सोनी ती, माझी राणी ती, माझी आई ती अशी साद घालत तिला कठपुतळीसारखं नाचविण्यासच सुरुवात झाली. आपल्या शरीराला व मनाला मोकळेपण मिळणं कठीण आहे हे तिनं ओळखलं पण तिचा प्रतिकाराचा मार्ग संपूर्ण बंद होता. म्हणून मग तिने आपल्याभोवती कोष निर्माण करायला सुरुवात केली आणि स्वत:ला संपूर्ण बंदिस्त करून घेतलं. तिला पुरुषांनी सुखं उपभोगायला दिली नाहीत, तिला सुख मानायला शिकवलं. तिच्याजवळ असलेला प्रेमाचा साठा हळूहळू संपादन करण्याऐवजी स्वत:च्या सामर्थ्याच्या जोरावर आपल्याला हवा तसा त्या वेळी लुटायला सुरुवात केली. तिचा होकार गृहीत धरला आणि नकाराला किंमत दिली नाही.

जी परिस्थिती आपण बदलू शकत नाही तिचा निमूटपणे स्वीकार करावयाचा असे तिनं ठरविलं. आपल्या पायातली लोखंडाची बेडी ही सोन्याची बेडी आहे असे मानून त्याचं ओझं सहन करायला लागली. आपल्या कोषातून सुरेख रेशमी वस्त्रच निर्माण होणार अशा फसव्या कल्पनेने ती स्वत:ला एखाद्या अफिम-बाजासारखं गुंगीत ठेवू लागली. कोमेजलेल्या मनाला दररोज न विसरता पाणी घालायला तिनं सुरुवात केली. आपले कठपुतळीचे रूप मनातल्या मनातच तिचा पेहेराव बदलत किती छान आहे असे म्हणत हरखत गेली.

आणि तिला कल्पनाही नसताना भूतलावर 'औद्योगिक क्रांती' अवतरली. सारं समाजजीवनच बदलून गेलं. कुटुंबसंस्थेचं रूप पालटलं ते मात्र जादूच्या कांडीसारखं. पुरुष शेती सोडून शहरांकडे धावू लागला आणि दिवसपाळी-

रात्रपाळीच्या चक्रात गुरफटला. शहरी जीवनाने त्याला सुखाचे मृगजळ दाखवले. त्याला तृप्तता येईना, आपली तहान भागविण्यासाठी त्याने पुन्हा आपल्या स्त्रीला मदतीला बोलावले आणि व्यक्तिस्वातंत्र्याचे पदक बहाल करून नोकरीच्या तावेदारीत अडकवून टाकलं. मात्र हे व्यक्तिस्वातंत्र्याचे पदक नुसतंच शोभेचं नव्हतं. त्या पदकाच्या अभिमानानं ती अंतर्बाह्य घुसळून निघाली. स्वतःच्या कष्टाचं मोल स्वतःच्या हातात पडताना पाहून पैशाचं, रुपयाचं महत्त्व तिच्या ध्यानात आलं. आपल्याला बेडयांतून सुटका करून ध्यायची असेल तर हीच किल्ली आपल्याला चालवून आपणाला सुटता येईल या विचाराची ज्योत तिच्या मनात पेटली, शिक्षणाच्या आगमनानं पुरुषांच्या काही विचारपटलांवरचा गंज निघून गेला. स्त्रीवर होत आलेला व होणारा अन्याय त्यांना खटकायला लागला. 'स्त्री-शिक्षणाचं' दालन उघडलं आणि आपल्या मरणानं कोषातून रेशमी वस्त्र निर्माण होणार म्हणून वाट पाहत असलेल्या स्त्रीला कोषातून सुंदर फुलपाखराच्या रूपात बाहेरच्या जगात प्रवेश मिळाला. सोन्याची म्हणून मानलेली बेडी अखेर लोखंडाची आहे हे कटुसत्य तिच्या स्पष्टपणे ध्यानात आलं. शारीरिक व मानसिक गुलामगिरीचे धागे हळुवारपणे सोडविण्यास स्त्रीवर्गाने सुरुवात केली. जुन्या वस्त्राचे पदर वर्षानुवर्षे उलगडले नाहीत तर एकमेकाला चिकटून बसतात. घाई केली तर वस्त्रच फाटण्याची भीती. गडबड केली तर धाग्यांचा गुंता होण्याची शक्यता. तेव्हा स्त्रीने धीर धरायचं ठरविलं.

आजची शिक्षणाने प्रज्वलित झालेली स्त्री आर्थिक स्वातंत्र्याबरोबर व्यक्ति-स्वातंत्र्यही चाखते आहे. असुरक्षिततेच्या आवरणाखालूनही थोडाफार मनाचा स्वच्छंदीपणा गोंजारते आहे. अतिशय आनंदाची गोष्ट आहे. आत्ता कुठे सुरुवात झालीय. अजून खूप वाटचाल करायची आहे स्त्री-पुरुषांना. पैसा कमाविण्याच्या ताकदीवर आपलं गमावलेलं घरातील स्थान ती परत मिळविण्याच्या धडपडीत आहे. आजच्या साठी उलटलेल्या स्त्री-पुरुषांना आताच्या पिढीतील अकस्मात बदल हा पेलविण्यासारखा नाही. नवऱ्याला कधीही प्रत्युत्तर द्यायचा प्रसंग न आलेल्या त्या साठी उलटलेल्या स्त्रियांना आजचे स्त्री-पुरुषांतील मोकळे वागणे, चर्चा, उघड भांडण किंवा नाइलाजास्तव एकमेकांनी कायदेशीर स्वीकारलेला विभक्तपणा हे सर्व खटकण्यासारखेच आहे आणि त्यामुळेच कुटुंबसंस्था कोलमडण्याची भीती त्यांच्याकडून साहजिकच व्यक्त केली जाते.

ती भीती जर आपण, आपल्या पुढील पिढीने खरी करून दाखवण्याचाच मार्ग आक्रमायला सुरुवात केली तर मात्र सर्वांनीच कसून विचार करण्याची वेळ आहे. ज्या कुटुंबसंस्थेच्या भवितव्याविषयी आपणही साशंक आहोत ती स्त्रियांनीच निर्माण केलेली आहे हे स्त्रियांनी विसरून चालणार नाही. कारण स्त्री-सत्ताकपद्धतीच्या काळीच कुटुंबसंस्थेचे बीज रोवले गेले. मानववंशाचे सातत्य टिकविण्यासाठी कुटुंबसंस्था खूप खूप मदत करू शकेल. स्त्रियांना खूप वर्षे पिंजऱ्यात कोंडून ठेवलं पुरुषांनी पण आज पुरुषांनाही कळून चुकलंय की आपण पिंजऱ्यात अडकवलेल्या मैनेला घेऊन मिरवू शकणार नाही. आपल्याला उंच भरारी मारायची आकांक्षा असेल तर मैनेला प्रथम पिंजऱ्यातून सोडवले पाहिजे. ती सुरुवातीला अवघडून बाहेर पडेल, अडखळेल – पण हळूहळू दीर्घ श्वास घेऊन पुरुषाबरोबर भरारी मारेल. हा दोघांनी मिळून भरारी मारण्याचा आगळा आनंद पूर्वीच्या काळातील पुरुषाला तरी कुठं माहीत होता? तिला जेवढं बंदीवान करत तो गेला तेवढी त्याची रखवालदारीही वाढली. कैद्याच्या बरोबर रखवालदारही बंदिवानच असतो. एक गजाअलीकडे आणि एक गजापलीकडे.

सोसाट्याचं वारं आलं की एखादा महाकाय पिंपळवृक्ष देखील घुसळून निघतो. तसा हा कुटुंबसंस्था डळमळीत करणाऱ्या विचारांचा वारा आजच्या पिढीतील स्त्री-पुरुषांना गदगदून हलवतोय. त्याला कशाला भ्यायचं? आजच्या आपल्या मुलामुलींना आपण असं तयार करूया की त्यांनी कुटुंबसंस्थेविषयी आदर राखूनच त्याचा स्वीकार करावा. नाहीपेक्षा सहजीवन वा एकाकी जीवन मुक्तपणे जगावे. नवीन जीवाला जन्म दिल्यावर मात्र पालकत्वाची जाणीव ठेवून त्याला उत्तम नागरिक बनविण्याची जबाबदारी विसरून चालणारच नाही. स्त्री आणि पुरुष यांच्या संयोगातून झालेल्या बीजाची वाढ वीस वर्षांपर्यंत प्रेमपूर्वक न्याहाळणे हा स्त्री आणि पुरुष यांच्या मनोमीलनाचा उत्कृष्ट ठेवा आहे. आणि पुढील पिढीतील समजदार स्त्री-पुरुषही हा ठेवा नको म्हणणार नाहीत. स्त्री-सत्ताक पद्धती असो वा पुरुषसत्ताक पद्धती असो दोहोतही नवीन जीव जन्माला घालून त्यांना जगात समर्थपणे उभे करणे आणि भविष्य घडविणाऱ्यांच्या मधून आपण वर्तमान स्त्री-पुरुषांनी अलगदपणे अलग होणे हे महत्त्वाचे आहे. जे कोलमडून पडणार नाही याची खात्री आहे त्याला आधाराची गरजच काय?

६

तृप्त मातृत्व

जीवनवेलीवरचं सुंदर फूल म्हणजे मूल. खरंच वैवाहिक जीवनाचं पुरं रूप बदलून टाकणारी घटना म्हणजे नवीन चैतन्याचं घरातील आगमन. विवाहित स्त्रीला हे सौभाग्य प्राप्त होईपर्यंत आपण स्त्री म्हणून जन्माला आल्याचं खूप वेळा टोचलेलं असतं. ज्यांच्या घरी जन्म झाला त्यांच्या घरगृहस्थीत पैशाची सुबत्ता असेल तिथे मुलीचं धनाची पेटी, लक्ष्मी, शोभा असे म्हणत कौतुक होतं पण हाच मुलगा झाला असता तर किती बरं झालं असतं या विचाराची झालर त्या कौतुकाला चिकटलेली असतेच. अर्भकावस्थेत असलेल्या बालिकेला हे विचार जाणवत नाहीत हे किती बरं नाही का? पण आर्थिक सुबत्ता नसलेल्या किंवा सुबत्ता असूनही मुलीचं आगमन ज्यांना सह्य होत नाही अशा घरी जेव्हा तिचं आगमन होतं तेव्हा तिला पाहायलासुद्धा जेव्हा कोणी जात नाही तेव्हा जन्म दिलेल्या मातेच्या हुंदक्याशिवाय दुसरं काहीच उरत नाही. आता काळ बदलला आहे, समाज सुशिक्षित होत आहे, असं आपण म्हणतो पण हसत हसत मुलीच्या आगमनाचं स्वागत करणारी घरं फार फार थोडी आहेत.

पण मुलीचं आगमन आवडो न आवडो तिची वाढ थोडीच थांबते? सुबत्ता असलेल्या घरात मुलीला वाढताना खायला, प्यायला, ल्यायला काही कमी पडत

नाही पण मोठी झाल्यावर शिक्षण यावर जेव्हा चर्चा सुरू होते तेव्हा उच्च शिक्षण देण्याच्यापेक्षा तिला उजवून टाकण्याची भाषाच ठामपणे बहुतेक घरांतून बोलली जाते व आपण मुलगी असल्याचा, आईवडिलांवरचा भार असण्याचा काटा तिला चांगलाच खुपतो. 'काय करायचं आहे एवढं शिकून? शेवटी रांधा–वाढा उष्टी काढा सुटलंय का? चार पुस्तकं वाचता येतात तेवढं बस्स झालं....' तिला जर दोघं लहान भाऊ असतील तर त्यांचं शिक्षण अधिक महत्त्वाचं असं समजून बेताची परिस्थिती असलेल्या घरांतून तिचं शिक्षणाचं दार बंद होतं. खेड्यापाड्यांतून तर मुलीचं चौथी–सातवीपर्यंत शिक्षण होणं हे मूठभर मुलींचंच भाग्य. बाकीच्या मुलींनी घरातील लहान भावंड सांभाळायची किंवा गुरं वळायला जायचं, श्रमाची कामं करत एक दिवस लग्नाचं बोहलं ओलांडायचं आणि दुसऱ्या घरात त्याच जीवनाची मुस्कटदाबी सहन करत जीवन जगायचं. ज्यांना शिक्षणाची दारं बंद झाली त्यांनाही माहेरी घरकाम काय नि सासरी घरकाम काय हे जर चुकत नाही तर मुलीला लवकरात लवकर सासरीच पोहोचवलेली बरी म्हणून तिची घरातून पाठवण करायची.

एकूण काय तर मनासारखा जोडीदार असेल तर हसणारी व नसेल तर खट्टू झालेली नववधू आपल्या पसंतीची पर्वा न करता झालेला हा जीवनाचा सौदा मान्य करून संसारी रममाण व्हायचा प्रयत्न सुरू करते. नैसर्गिकरीत्या तिच्या जीवनात सुखाचं ऊन डोकावतं ते बाळाच्या आगमनाच्या चाहुलीनं. त्या उन्हाची उब घेत व गर्भाला ऊब देत दोन्ही देह फुलत जातात. स्त्री म्हणून जन्माला आल्याबद्दलची तिची तेढ निसर्ग नाहीशी करून टाकतो. गर्भारपणाच्या तेजातून निथळून निघत स्त्रीचा देहही वेगळा जीवनरस घेऊन तरारून उठतो. गात्रा-गात्रांना नवजीवन मिळते आणि नवजीवनरसावर पोसलेलं चैतन्य एक दिवस सुखद वेदनांचा धुमाकूळ घालत तिच्या उदराबाहेर येऊन ट्यांऽऽहा–ट्यांऽऽऽहा अशी साद घालत मानवी जीवनप्रवाहात झेप घेते.

प्रजा-जननशक्ती जेव्हा आपण स्त्रीमध्ये एकवटलेली आहे असे म्हणतो त्याचवेळी मातृत्व हा स्त्रीचा जन्मसिद्ध हक्क आहे हे मान्य करणे आलेच. मानवाने निर्माण केलेल्या सामाजिक मूल्यांच्या, औरस-अनौरस ह्या खुळ्यासारख्या भोंगळ शब्दांच्या कोंदणात न बसू शकणारा हिरा म्हणजे हा नुकताच जन्मलेला बालजीव. मानवी वंशांचा दिवा. त्याला व्यक्तिगत कुलाचा कुलदीपक वा कुलांगार

आपल्या कर्तृत्वाने बनू द्या. आई-वडिलांच्या निवडीचे कसलेही स्वातंत्र्य नसलेल्या ह्या सर्व जीवांचे आपण माणसांनी स्वागतच करायला हवे.

मानव जेव्हा रानटी अवस्थेत राहत होता तेव्हापासूनच स्त्रीने जन्माला घातलेल्या ह्या नवीन जीवाचे सारेजण कौतुक करतच स्वागत करावयाचे. पितृत्व व वारसाहक्क याची जाणीव नसतानाही पुरुष ह्या नूतन अर्भकांचे लालन-पालन करण्यात हातभार लावून सहवासाने उत्पन्न होणाऱ्या प्रेमाने स्वत: लडिवाळ-पणात अडकून जायचा–आजही सारे पुरुष आपल्या मुलांना लळा लावता लावता स्वत:च्या लहानपणाचा अनुभव नकळत लुटतच असतात. पुरुषाकडून उत्पन्न होणारे हे भावबंधाचे धागे कुटुंबाला घट्ट बांधूनच ठेवतात. स्त्री+पुरुष = मूल असं समीकरणाच्या स्वरूपात कुटुंबसंस्थेचं दाखवलेलं रूप फारच रूक्ष भासतं. त्यापेक्षा स्त्री=पुरुष=मूल यांचे हे एकमेकांशी जोडलेले दुहेरी बंध निश्चितच मोहक आहेत व खरे आहेत. इथं सर्वांच्यातील देवाणघेवाण समान आहे. जिथं जिथं असे बंध असलेली विवाहित कुटुंबे आहेत त्यांची घरे ही चार भिंतींचे व छपराचे आडोसे असलेली घरे नसतात. घराला घरपण आणणाऱ्या मानवांचे ते निवासस्थान असते.

दुर्दैवाने ज्या मुलांना जन्मत: रोगट प्रकृतीच्या आई-वडिलांचे Genes घेऊन जन्माला यावे लागते किंवा आई-वडील सुदृढ असूनही दुसऱ्या अनेक कारणांनी शारीरिक व मानसिकत्व अपंगत्व घेऊनच जन्म मिळतो ती खरोखरीच अभागी असतात. पुढच्या जीवनसंघर्षात सदा थपडा खातच मरून जाणे हीच त्यांची जीवनपूर्तता. आंधळेपणा, लुळेपणा, मेंदूची अपुरी वाढ इ. अनेक व्याधींनी ग्रस्त असलेल्या या जीवांना निसर्ग जीवन नाकारतो. Surrival of the fittest हा डार्विनचा सिद्धांत शास्त्रीयदृष्ट्या चूक आहे, की बरोबर आहे हा वाद जाऊ दे; सर्वसामान्य व्यक्तींना हे जाणवणारे सत्य आहे की शारीरिक व मानसिकदृष्ट्या जन्मत: अपुरेपण लाभलेल्या जीवांना मृत्यू लवकरच बोलावून घेतो. जणू तेच त्यांच्या अपंगत्वावरील रामबाण औषध असते.

जगात काही जमाती अशा आहेत की त्या नवीन जन्मलेल्या अर्भकाला एक रात्र झोपडीबाहेर उघड्यावर ठेवतात, दुसऱ्या दिवशी सूर्योदयाबरोबर मूल जीवंत असेल तर आनंदोत्सव साजरा करतात. व्यवहारीपणाचे हे एक टोक आहे. पण आजचा प्रगत समजला जाणारा समाजही दुसरे टोक गाठतोय. भूत-

दयेच्या भावनेने त्यांचे फक्त लालनपालन न करता, धडधाकट जीवाच्या तोंडचे घास काढून या अपंग मुलांना अजीर्ण होईतो घास भरवणे चालू आहे. समाजामध्ये आज शारीरिकदृष्ट्या व मानसिकदृष्ट्या समर्थ असलेल्या पण आर्थिकदृष्ट्या कमकुमत असणाऱ्या मुलांचे खच्चीकरण चालू नाही का? शून्यातून काही निर्माण होतेय का पाहूया, असे म्हणत चमत्काराची वाट पाहत बसणे वेडेपणाचे आहे की शहाणपणाचे आहे हेच समजेनासे झालेय. शून्यातून शून्यच निर्माण होते. जे मुळात नाही ते आपण मानव कसे निर्माण करू शकणार?

आपल्या भारतीय समाजात तरी अशा दुर्दैवी जीवांचे कुटुंबामधूनच, फारशा अपेक्षा न धरता, मायेच्या जोरावर संभाळणे चालू आहे आणि ते अतिशय चांगले व अनुकरणीय आहे. घरातील आई-वडील भावंडे व नित्य सहवासात येणारी माणसे आपला सर्व अहंभाव बाजूला ठेवून या मुलांचे जीवन सुसह्य करण्यासाठी धडपडतात. पाश्चात्त्य लोकांना जे संस्था काढण्याचे वेड आहे ते अशा मुलांच्या बाबतीत तरी त्यांनी व त्यांचे अनुकरण करण्यात भूषण मानणाऱ्या आपण भारतीयांनी थोडे बाजूला सारावे असे मला वाटते. कारण ह्या संस्थांमध्ये दुर्दैवाने बरे होऊ न शकणाऱ्या रोगांनी ग्रस्त झालेल्या मुलांना एकदा अडकवले की आपली जबाबदारी संपली अशा दृष्टीने वागणाऱ्या आई-वडिलांची संख्याच जास्त प्रमाणात नजरेस पडू लागेल. सुरुवातीची ओढ दूरत्वाने हळूहळू कमी होते. आई-वडिलांना संस्थेत राहणारं मूल बंधमुक्त करते पण त्यामुळे मुलावर होणारा अन्याय थोडाच नाहीसा होतो? सुरुवातीला वर्णन केलेल्या व आपण ज्यांना मागासवर्गीय, अशिक्षित, जमातीचे लोक म्हणून म्हणतो त्यांच्या चालीरीतीचा धक्का प्रदर्शित करताना आपण आधुनिक–शिक्षित लोक तरी अधिक चांगलं वर्तन थोडंच करतो? नवीन जन्मलेलं अर्भक रात्रभर बाहेर उघड्यावर ठेवणं हे ज्यांना क्रौर्य वाटतं त्यांना शारीरिक व मानसिक अपंगत्व लाभलेल्या विकलांग मुलांना संस्थेत डांबून टाकणं हेही तितकंच क्रूरपणाचं आहे हे मान्य करावे लागेल.

आता मनुष्यनिर्मित नीतिनियमांच्या चौकटीत न बसणाऱ्या मुलांचा जन्म. 'अनौरस संतती' हा शब्दप्रयोग निर्माण करणाऱ्या समाजस्थितीतील प्रत्येक जाणती व्यक्ती ही मानसिक हीनत्वाची खालची पातळी गाठलेलीच असावी किंवा निखळ जीवनतत्त्वाचे आदर्श गाठून अंतराळात फिरणारी तरी असावी.

सर्वसामान्य व्यक्तीना जे नीतिनियम पाळणे शक्य नाही त्यांची आदर्शजीवनतत्त्वे बनवायची; धर्म आणि रीतिरिवाज यांच्या नावाखाली समाजातील जास्तीत जास्त माणसांना हतबल करून सोडायचे आणि उकिरड्यावर नवजात अर्भके फेकली जातात याचे आश्चर्य करायचे हा कुठला शहाणपणा? नको असलेले जीव जन्माला घालायची स्त्रीवर सक्ती करावयाची आणि अनाथाश्रम चालवून पुण्य मिळवायचे. आई-वडील जीवन्त नसताना मूल अनाथ होते व समाजाने अशा मुलांची व्यवस्था अनाथ-आश्रम काढून करायलाच हवी. पण आई वडील असूनही ज्यांना सामाजिक बंधनाच्या ओझ्याखाली पोरकेपण येते त्याला काय म्हणावे? प्रत्येक परिस्थितीत प्रश्नांची चर्चा होताना आर्थिक बाजू महत्त्वाची म्हणून मांडली जाते – गरिबी हे कारण दाखवले जाते – पण हे 'असं' पोरकेपण येण्याच्या बाबतीत आर्थिक प्रश्न गौण ठरतो. आर्थिक चणचणीमुळे उठसूट कोणी आपण निर्माण केलेला जीव धुळीत टाकून देत नाही. आर्थिक अस्वास्थ्य मुलाची वाढ समृद्धपणे होऊ देणार नाही – काही गोष्टींची कमतरता अशा मुलांना जरूर भासेल पण पैशाच्या अभावाने ती पोरकी होत नाहीत. अनाथ होत नाहीत.

अर्भकालये व अनाथगृहे ही पर्यायी व्यवस्था म्हणून ठीक आहेत. नुसतं अन्न देऊन जीव जगवता येतो पण जीवन फुलवता येत नाही. प्रेमाची भूक एवढी प्रचड असते की ती ज्यांची भागते त्यांना भुकेची जाणीवही होत नाही. मात्र त्या भावनेस वंचित झालेल्या जीवांना आयुष्यात पूर्णत्व लाभत नाही.

या व्यतिरिक्त जगात जन्मलेली सारी मुले ही पूर्णत्वाच्या दिशेने प्रवास करणाऱ्या नौकेतीलच प्रवासी असतात. सर्व स्त्री-पुरुषांच्या त्या इवल्या इवल्या छोट्या प्रतिकृती बघून मन उचंबळून येते. हे इवलंसं बाळ आईच्या स्तनातून अमृत प्राशन करून आपल्या पचेंद्रियासमवेत पंचमहाभूतांशी सामना करण्यास सज्ज होतं. हा आनंदाचा ठेवा एक दिवस आपले ओळखीचे हंसू डोळ्यांमधून सांडत आईकडे झेपावतो आणि भावी जीवनसंघर्षाच्या वृक्षाच्या अंकुराला पाने फुटतात. जीवनवेलीवरचं सुंदर फूल देवाने उमलविल्याबद्दल सारे स्त्री-पुरुष एका अज्ञात शक्तीपाशी नतमस्तक होतात.

मूल जन्माला येणे–या निसर्गाच्या अद्वितीय आविष्काराला बांध घालण्याचा प्रयत्न ह्या शतकाच्या सुरुवातीपासून सुरू झाला. कृत्रिम संतती प्रतिबंधक पद्धती या शंभर टक्के यशस्वी होत नसल्या तरी त्यांच्या वापराने मनुष्य-जीव

जन्माला येण्याची क्रिया बऱ्याच प्रमाणात रोखली गेली. काही ठिकाणी साहजिकच लोकसंख्या कमी झाली व या पद्धतीचे फायदे दाखविण्यात आले. आता चार पिढ्या निघून गेल्यावर मानव-वंश-शास्त्राच्या दृष्टीने त्या पद्धतीपासूनचे तोटेही दिसून यायला लागले आहेत. संयमित व आपल्याला हव्या तशा जीवांना निर्माण करणाऱ्या तंत्रांना शरण जाऊनही मानवजात खरोखरच प्रगतीचाच मार्ग आक्रमत आहे व निर्माण होणारे चित्र हे आदर्श मानवजातीचे चित्र असेल की नाही याबद्दल सर्वत्र साशंकताच आहे.

पण काहीही झालं तरी आपली पुढची पिढी आर्थिक, बौद्धिक व मानसिक विचारांची खळखळ माजवून निश्चित निर्णय घेईल. खूपसे तरुण-तरुणी या जबाबदारीचा स्वीकार न करता आनंदी सहजीवनच जगण्याची तयारी दाखवण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र त्या काळात जिथं जिथं नवीन मनुष्य जीव जन्माला येतील तिथं स्त्री आणि पुरुष या दोघांचाही गौरव करण्यात येईल. स्त्री आणि पुरुष यात स्त्रीला स्त्री म्हणून जन्माला आल्याचे साफल्य लाभेल. स्त्रीचा स्त्रीपणा तृप्त होईल.

७

अतिप्रसंग

वयात आलेला पुरुष त्या वयात औत्सुक्याने व त्यानंतरच्या आयुष्यात अगदी म्हातारपण आले तरीही स्त्रीकडे लैंगिक दृष्टीनेच पाहत असतो. संधी मिळताच स्त्रीच्या शारीरिक कमजोरीचा फायदा घेऊन तिच्यावर अतिप्रसंग आणतो किंवा त्याच दृष्टीने पुरुषाची वागणूक असते.

बायकांनी घराबाहेर न पडण्याचा काळ कधीच संपला. आज शहरात काय नि खेडोपाडी काय उंबरठ्याबाहेर पाऊल न टाकलेली स्त्री मिळणे कठीणच. तेव्हा जीवनव्यवहारात पुरुष-स्त्रियांनी एकत्रित येणे हे स्वाभाविक आहे. तरुण मुली, लग्न झालेल्या स्त्रिया, दोन चार मुले असणाऱ्या प्रौढा किंवा अतिशय पुढारलेला, सुशिक्षित प्रगल्भ स्त्री-पुरुषांचा समुदाय घ्या – ते जेव्हा जेव्हा एकत्र येऊन 'पुरुष' हा विषय बोलतात तेव्हा खरंच फार विचार करायला लावणारे बोल आपल्या कानावर सहजपणे पडतात. सुरुवातीचे वाक्यही आज बेफिकीरपणे सारखे वापरून गुळगुळीत नाण्यासारखं झालं आहे.

नुकतंच तारुण्यात प्रवेश केलेल्या अविवाहित मुली जेव्हा पुरुषाला 'घाणेरडा' म्हणून संबोधतात तेव्हा स्त्री पुरुष संबंधाबाबतची त्यांची वैचारिक भूमिका गोंधळाची असते – पक्की नसते. कारण तसा जीवनानुभव नसतो व

नुसत्या ऐकीव गोष्टींनी, उथळ साहित्यामधून वा उत्तेजक चित्रपटमाध्यमातून चेतावलेल्या भावनांनी त्या स्वप्नावस्थेत रमत असतात. हे रमणं त्या वयाला नैसर्गिकच आहे. तारुण्यात प्रवेश केल्यापासून वडिलधाऱ्या स्त्रियांकडून – 'आता तू जपून वागायला हवं. तुझं शील म्हणजे काचेच्या भांड्यासारखं. एकदा फुटलं की गेलं. पुन्हा सांधता येत नाही' हाच उपदेश ऐकावा लागतो. शाळा-कॉलेजमधून 'Modesty thy name is woman' अशा विषयावर त्यांनी निबंधही लिहिलेले असतात. पण हा 'विनयशीलपणा' कुठपर्यंत प्रसंगी ताणायचा हे मात्र सांगितलं जात नाही. तरुण वयाने सारे मन तरल झालेले असते. पुरुष आपल्याकडे आकर्षित झालेला आहे ह्या अशब्द जाणिवेने ती सुखावत असते. आपल्यात झालेला शारीरिक व मानसिक बदल आपली संवेदनक्षमता वाढवितोय हे तिला कळतं. आपल्या बरोबरीच्या मित्रांकडून किंवा कोणत्याही वयाच्या पुरुषाकडून 'तू किती छान दिसतेस', हा ड्रेस, ही साडी, हा रंग तुला अगदी शोभून दिसतोय –' 'अरे, आमची ही बेबी आता बेबी राहिली नाही – मोठी बाईच झाली' .... ही सर्व कौतुकमिश्रित स्तुतिसुमने तिला हरखून सोडतात.

व्यक्तिमत्त्व वाढविण्याच्या अनेक संधी या तारुण्यात नुकताच प्रवेश केलेल्या मुलींच्या जीवनात येतात. शिक्षण, खेळ, कला, नाटक, संमेलने या वेगवेगळ्या जीवनानुभव देणाऱ्या परिस्थितीत हरप्रकारे वयात आलेले स्त्री पुरुष शहरात तरी एकत्र येत असतात. आज अशा साऱ्या ठिकाणी अत्यंत खेळीमेळीचे व मोकळे वातावरण आपणाला दिसून येते. आणि हे चांगले आहे. अतिशय कडक अशी संस्काराची बंधने शिथिल झाल्यामुळे हा खळाळणारा जीवनप्रवाह पाहणे सर्व वयातील प्रौढ स्त्री-पुरुषांना सुखद वाटायला हवे. या तरुण वयातील मुला-मुलींचे भावविश्व खूपच समान पातळीवर असते. आजच्या सुशिक्षित आईबापांना हा मानवी स्वभावातील भावनांचा सच्चेपणा खटकू नये. समवयस्क मुलामुलींनी एकमेकांशेजारी बसणे, विविध क्षेत्रांत यश संपादन केल्यावर एकमेकांशी हस्तांदोलन करणे किंवा चेष्टेत पाठीवर थाप मारणे या गोष्टी निकोप मनोवृत्तीचेच प्रदर्शन करतात. या गोष्टी मुद्दाम सांगण्याचे कारण म्हणजे पंचवीस-तीस वर्षांपूर्वी हे सर्व प्रसंग–सहशिक्षण, खेळ, संमेलने इ. शहरी वातावरणात होत असूनही त्या वेळी मुलामुलींच्या वागण्यात एवढा मोकळेपणा नसे. ह्या अशा

वातावरणातही तरुण मुलींना अतिप्रसंगापर्यंत जाण्याची वेळ येण्याची शक्यता फारच कमी असते. चेष्टा, पाठलाग, अश्लील बोलणं हे सर्व प्रकार पुरुषांच्या घोळक्यांतूनच या व्यातील मुलींच्यात पोहोचत असतात. सहज मिळालेला एकान्त जसा या वयातील पुरुषाला उद्युक्त करतो तसेच या वयातील स्त्रीला 'औत्सुक्य' धाडसी बनवते. म्हणूनच या जीवनकालात मुलींनी पुरुषाबरोबरचा निवान्त एकान्त टाळला—घरचा आणि बाहेरचाही—तर तिच्यावर येणाऱ्या अवघड प्रसंगांची शक्यता खूपच प्रमाणात कमी होईल. कारण नसताना रात्री-बेरात्री फिरण्याचे प्रसंग टाळले तर उगाचच आयुष्यभर अस्वस्थ करणारे अनुभवही तिला टाळता येणे शक्य आहे. त्यातूनही अपघाताने तिला अशा काही प्रसंगाला सामोरे जावे लागले तर मानसिकदृष्ट्या खचून न जाण्याचा त्या मुलीने जाणीवपूर्वक आटोकाट प्रयत्न करायला हवा. तिच्या आईवडिलांनी, नातेवाइकांनी, मित्र-मैत्रिणींनी तिला मानसिक आधार द्यायला हवा.


शहरापासून दूर असणाऱ्या, खेड्यापाड्यांत राहणाऱ्या मुलींच्यावर अशा प्रसंगांना तोंड देण्याची वेळ येण्याची शक्यता अतिशय अल्प असावी. आपल्या बदलत्या शारीरिक व मानसिक अवस्थेची तिला जाणीव होण्यापूर्वी वा जाणीव होताक्षणीच जोडीदार गाठून दिला जातो व तिला संसारातच पडावे लागते. ग्रामीण सामाजिक व्यवस्थेत तिच्यावर या वयात एकटं-दुकटं बाहेर पडण्याची वेळच येत नाही. तिचं घराबाहेर पडणं हे समवयस्कांच्या घोळक्यात किंवा मोठ्या वयाच्या बायांबरोबरच असतं. गावाची हद्द लहान असल्याने सर्व कुटुंबे एकमेकांना दूरान्वयाने का होईना ओळखत असतात. एखाद्या तरुण मुलाने छेड काढणे किंवा बाजार—जत्रा येथे पाठलाग करून काही बडबडणे (Rural Eve-teasing) इतपतच आपल्या मनाचा आवडता कल तो मुलगा दाखवतो.

एकट गाठून एकाने किंवा घोळक्याने एखाद्या तरुण मुलीवर बलात्कार करणे ही गोष्ट वेगळी. तसे शरीरसंबंध गोठेपर्यंत होणारे बलात्कार पूर्वीपासून होत आलेले आहेत; होत राहणार आहेत. बळजबरीने संमतीशिवाय शरीरसुख घेणं हा मानसिक विकृतीचा व स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. एकूण काय तर ग्रामीण भागातील स्त्रीवर पुरुषांकडून होणाऱ्या लैंगिक भावनेचे प्रदर्शन शहरात राहणाऱ्या स्त्रीच्या मानाने कमी होत असावं. एकदा लग्न झालं की पुरुषावर येणारा सामाजिक दबावही मोठ्या प्रमाणात गावातून असतो. सर्वांत महत्त्वाची

गोष्ट म्हणजे छोट्या गावांतून व खेडोपाडी तरुण मुला मुलींची लग्ने लवकर होत असल्याने त्या वयात निसर्गत:च निर्माण होणाऱ्या लैंगिक भावनांचे शमन होत असते. उफाळणाऱ्या नैसर्गिक भावना समाजमान्य लग्नबंधनाने मोकळ्या होतात. हा नैसर्गिक आवेग फार दबून न राहिल्यामुळे त्याचे वासनेत रूपांतर फारच कमी प्रमाणात होत असावं.

पुरुषवर्गाशी सतत संबंध येणाऱ्या स्त्रियांचा तिसरा विभाग आहे तो असा– शिक्षण पूर्ण केलेल्या, विवाहास उत्सुक असलेल्या वा औत्सुक्य नसलेल्या, करिअर करणाऱ्या, नोकरीत वा आपल्या आवडत्या कामात, त्या कार्यक्षेत्रात मग्न असलेल्या स्त्रिया. वयाची पंचविशी गाठीपर्यंत या सर्वांचीच मनोभूमिका जीवनाला सामोरी जायला सज्ज असते. आपली आर्थिक परिस्थिती, आपल्या स्वभावातील कमकुवतपणा, आपल्या आजूबाजूचे वातावरण, नित्य घडणारे प्रसंग व त्यांचे विश्लेषण करत असताना तिला योग्य व अयोग्य वर्तणूक याचे सामाजिक स्वरूप नक्कीच कळलेले असते. या पाठबळावरच ती जास्त सहजपणे समाजात मोकळेपणी वावरू शकते. वावरते. मात्र आपल्या समाजातील पुरुषांचा दृष्टिकोण अशा स्त्रियांच्या बाबतीत वागताना चुकीचा आहे. पुरुषांच्या अंत:करणात कुठे तरी अशी पक्की कल्पना आहे की अशा वाढलेल्या वयातील मुली लैंगिक सुख न मिळाल्याने अतृप्त असतात व आपण यांच्याकडून थोडेफार सहवास-सुख, स्पर्शसुख सहजपणे मिळवू शकू. थोडाफार मौजमजा करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांस जर एखादेवेळी कमकुवत, भिडस्त स्वभावाच्या स्त्रीकडून प्रतिकार न होऊ शकला तर सर्वांच्याच बाबतीत असे घडू शकेल याबाबतचा त्यांचा विश्वास वाढतो. पुरुषाचा पहिली भीती नाहीशी होते. त्यातून तो जर एखाद्या अधिकार-पदावर असेल, आर्थिकदृष्ट्या संपन्न असेल, विवाहित असूनही, मुलाबाळांचा बाप असूनही जर जीवनाचे अपुरेपण तो अनुभवत असेल तर त्याच्याकडून पत्नी-व्यतिरिक्त सहवासात येणाऱ्या स्त्रियांवर जाणीवपूर्वक आव्हाने वारंवार टाकायला सुरुवात होते. आता अशा परिस्थितीस कितपत बळी पडायचे हे सर्वस्वी त्या स्त्रीच्या हाती असते.

ज्या पुरुषाचे असे वागणे स्त्रीला अपमानास्पद वाटते त्या पुरुषाला तिच्या स्वभावानुसार तोही अपमानास्पद वागणूक देऊ शकते. अर्थात हे प्रत्येक स्त्रीला जमेलच असे नाही. पण बहुतेक स्त्रिया आपल्या बोलण्यातून, वागण्यामधून या



स्तुतिपर बोलण्याच्या वा अंगचटीला येण्याच्या प्रकाराबाबत घृणा दाखवू शकतात. इथं Modesty thy name is woman यातील विनयशीलपणा हा ढाली-सारखा वापरू शकतात. मात्र परिस्थितीने नाडलेल्या, मानसिक सामर्थ्य नसलेल्या स्त्रिया मात्र सर्वच समाजस्थितीत जशा बळी दिल्या जातात तशाच या प्रसंगीही बळी पडतात.

अर्थात या विभागातील अशाही स्त्रियांचे प्रमाण खूप मोठे आहे की, ज्यांना या साऱ्या मौजमजेच्या प्रकाराची चटक लागलेली आहे – आवड निर्माण झाली आहे आणि स्वेच्छेने त्यांनी हा सौदा स्वीकारला आहे. या साऱ्या स्त्री-पुरुषांचे अशा प्रसंगातील वागणे हे बरोबर की चूक हे ठरविण्याचा अधिकार त्या त्या व्यक्तींशिवाय कुणालाच नाही. फक्त अशा तऱ्हेचा व्यवहार ज्या स्त्रियांनी राजीखुषीने स्वीकारलेला आहे त्यांनी आपल्या स्त्रीत्वाचा पुरुषाकडून अजाणता फायदा घेतला जात आहे म्हणून आरडाओरडा करू नये.

आता राहिल्या विवाहित स्त्रिया. कुंकू आणि मंगळसूत्र, किंवा सिंदूर भरलेला भांग हा आपल्या समाजात अजून तरी संरक्षणाचे कवच लाभलेला ठेवा आहे– स्त्री आणि पुरुष या दोघांच्याही दृष्टीने. विवाहित स्त्रीकडे जाणूनबुजून कोणताही पुरुष अधिक फायदा घेऊन वागायला सहसा जात नाही. संसारी स्त्री म्हटली की नेहमीच्या जीवनव्यवहारात कुणीही पुरुष तिच्याशी एक अंतर ठेवूनच वागतो. अगदी अपवादात्मक उदाहरणे वगळता पुरुषालाही ही गुंतागुत सहसा नकोच असते.

ज्या स्त्रीला पुरुषाने आपल्याशी जरा अंतर राखूनच वागावे असे वाटत असते, ती आपल्या विवाहचिन्हांचा–कुंकू व मंगळसूत्र याचा योग्य वापर करून घेते. कुंकू व मंगळसूत्राला बंधन मानून ज्या स्त्रिया ते वापरत नाहीत त्या स्वतःचे संरक्षण करण्यास पूर्णपणे समर्थ असाव्यात. एकदा एका झोपडपट्टीत नवऱ्याने टाकून दिलेल्या स्त्रियाच्याशी बोलत असताना त्या त्यांचे जे हाल सांगत होत्या, त्याने मनस्वी चीड येऊन मी विचारले—'इतका त्रास, इतका तळतळाट सहन करत असूनही तुम्ही सर्वांनी त्यांच्या नावचे मंगळसूत्र अजून गळ्यात का ठेवले आहे!' त्यातील एक उत्तरली, "हे मंगळसूत्र नवऱ्याविषयी प्रेम म्हणून राखलेले नाही. चार गुंड लोक याला बघून हिचा कोणीतरी पाठीराखा आहे या कल्पनने एकदम त्रास देत नाहीत—थोडे घाबरतात, म्हणून ठेवलंय

तसंच—" मुंबईच्या लोकलमधून चर्चगेट स्टेशनवर उतरताना आपल्या गळ्यात खोटे मंगळसूत्र अडकवणारी एक तरुण मुलगीही मला भेटली आहे—" मी राहणार विरारला. कोण बघायला आलंय माझं घर? पण हे मंगळसूत्र पाहून पुरुष जरा दूर राहतात." फार मोठ्या शहरातले वातावरण वगळता पुरुष सहसा विवाहितेकडे जरा अंतर राखून वागतात यात शंका नाही.

आता विवाहित असूनही सुरक्षिततेचं कवच फोडून ज्या स्त्रियांचेच मन धावतंय व पुरुषाने आपल्याशी सलगी केली तर याचा अर्थ आपण नक्कीच आकर्षक आहोत या अहंमन्यतेने वावरणाऱ्या स्त्रियांबद्दल—अशी सलगी वा अंगचटीला येण्याचा पुरुषाकडून प्रयत्न झाला तर त्या प्रसंगाचा गवगवा करून, सार्वजनिकरीत्या त्याचा निषेध दर्शवून, चर्चा घडवून, 'प्रकरण' करण्याबद्दलच्या वृत्तीबाबत थोडा विचार करून पाउले टाकायला हवीत. गणित-शास्त्राच्या नियमाने मनोविकार चालत नाहीत. जिथं भावनांचा गुणकार व्हायला पाहिजे तिथे भागाकार होऊन बसतो आणि भागाकाराच्या उत्तरावर निराश झालेले मन गुणाकाराच्या उत्तराने आनंदी होते. विज्ञानाच्या दृष्टीतूनही भावनांना परिमाण व नियमांची समीकरणे लागू पडत नाहीत.

कोणतीही व्यक्ती एकाच एक भावनेने पछाडलेली अशी दिवसाचे चोवीस तास राहू शकतच नाही. आजच्या मिश्र समाजात खूपसे स्त्री-पुरुष एकमेकांचा व्यक्ती म्हणून विचार करतात—स्त्री-पुरुष म्हणून नाही. एका अलिप्त वृत्तीने आपआपल्या कामात मग्न असलेले अनेक स्त्री-पुरुष एकमेकांचे सहकारी म्हणून खूप चांगली कामे करत असतात. एखाद्या दुर्बल क्षणी पुरुषाच्या काही भावनांचा उद्रेक झाला तर त्या वेळी त्या पुरुषाच्या सहवासात असलेली स्त्री नक्कीच घाबरून जाईल. पण अशी भाव-विवशता स्त्रीकडूनही प्रदर्शित होत नाही का? मुद्दाम घेतलेला एकान्ताचा फायदा किंवा दुबळ्या क्षणात घडलेले वासनेचे दर्शन स्त्रीला प्रथम गोंधळून टाकेल यात शंका नाही – पण तिची प्रतिक्रिया तेवढीच सहज व प्रसंगावधान राहण्याइतपत नक्कीच सावध असू शकते. अशा प्रसंगी स्वत: तिथून निघून जाणे – प्रतिकार करणे, आरडा-ओरडा करणे यातून तो प्रसंग ती नक्कीच निभावून नेऊ शकेल. स्त्री विरोध करत असताना – शारीरिक रीत्या सतत प्रतिकार करत असताना कुठलीच प्रणयपूर्ती गाठणे पुरुषालाही कठीणच असते. प्राणिजगतात इतरत्र कुठेही न आढळणारा बलात्काराने शरीर-

संबंध फक्त मानवी प्राण्यातच होऊ शकतो हे विचार करण्यासारखेच आहे. शारीरिकदृष्ट्या बलाढ्य पुरुष ताकदीच्या जोरावर स्त्रीला मूर्च्छित करून वा तिच्या जीवास इजा केली जाईल याच धमकीखाली आपली अनावर वासना पुरी करून घेऊ शकेल. पण हा चक्क गुन्हा आहे.

तरीही पुरुषाने एकान्ताचा फायदा घेऊन आपल्याकडे लैंगिक भावना अनावर होऊन पाहावे या गोष्टीने बहुतांशी स्त्रिया मनोमनी दुखावतील यात शंका नाही. असं व्हायला नको होतं या भावनेने स्त्री तळमळेल. अशा वेळी आपल्या मित्रमैत्रिणींजवळ ह्या घडलेल्या घटनेचा उल्लेख करून आपली घुसमट मात्र ती हलकी करू शकेल. तसे करण्यास काहीच हरकत नाही. संबंधित स्त्री-पुरुषांच्या हितसंबंधीयात घडलेल्या घटनेचा उघडपणे निषेध दर्शवणेही त्या पुरुषावर दबाव आणण्यास व इतर स्त्रीवर्गास सावध करण्यास मदतच करेल. फक्त साऱ्या स्त्री-संघटनांनी घडलेल्या प्रसंगाबद्दल फक्त जाहीर चर्चा करून संबंधित पुरुषाविरुद्ध मोर्चे नेणे वगैरे प्रकार ती वृत्ती नाहीशी करण्यास अजिबात मदत करणार नाहीत. सत्य-असत्य पडताळून पाहताना दोषी व निर्दोषी या दोघांवरही फक्त शिंतोडेच उडले जातात. पुरुष केव्हाही अशी घटना घडताना तिथे तिसरी व्यक्ती नसल्याने असे काही घडलेच नाही – हे सर्व संबंधित स्त्रीच्या मनाचे खेळ आहेत असे म्हणून आरोप झटकू शकतो.

अशा 'मनाच्या खेळाचा' आरोप जरी आपण नाकारला तरी मनाच्या 'दुसऱ्या खेळाचा' विचार करायला हरकत नाही. स्त्री कुमारिका असताना तिच्या मनात आपल्याला आदर्श वाटणाऱ्या पुरुषाचे रूप निसर्गरूप भावनेनेच तरळत असते. बहुतेक जणींना जीवनात जो साथीदार मिळतो तो आपल्या मनातील आदर्श पुरुषाच्या साऱ्या अपेक्षा पुऱ्या करणारा मिळेलच असे काही शंभर टक्के सांगता येत नाही; आणि समजा विवाहाचे वेळी तो आदर्श पुरुष वाटला तरी नंतरच्या जीवनाची वाटचाल करताना तो पुरुष ते रूप कायम ठेवू शकेल की नाही हे सांगणे कठीणच, अन् बहुतेक वेळा नाहीच. पण नंतरच्या जीवनात जे काही पुरुष कारणपरत्वे आपल्या सहवासात येतात – त्यांच्यापैकी कुणी आपल्या मनात काही क्षणापुरता का होईना झुकत्या कलाने डोकावत नाही असे म्हणणे स्त्री-वृत्तीसही बाधक ठरेल. यात वावगे काहीच नाही. आपल्या मनाशी तरी आपण प्रामाणिक राहायला हरकत नाही. मनाची मूलभूत प्रतिक्रिया

आपण स्त्रियांनी उघडपणे स्वीकारायलाच हवी. नाहीतर आपण सर्व स्त्रिया तेवढ्या शीलवान आणि सारे पुरुष तेवढे वासनेने बरबटलेले असे विरूप जग अस्तित्वातच राहिले नसते. उलट काही पुरुषांनी एकान्ताचा फायदा घेऊन स्त्रियाही कशा गळी पडतात याची उदाहरणे सांगितली आहेत. पुरुष असूनही आपण घाबरलो हे ते मनमोकळेपणे कबूल करतात.

आपल्याला ज्या व्यक्तीबद्दल आकर्षण नाही – त्या व्यक्तीने दाखवलेली शारीरिक सलगी पुरुषाला व स्त्रीला दोघांनाही आवडत नाही. असा प्रसंग दोघांच्याही दृष्टीने 'अतिप्रसंग'च असतो. दोघांनाही तो तेवढाच हादरून सोडतो. दोघांचीही मनस्विता सारखीच दुखावली जाते.

फक्त ज्या अतिप्रसंगाचा आपण सार्वजनिकरीत्या निषेध दर्शवू पाहतो तो प्रसंग आपल्याला आवडणाऱ्या, हव्याशा वाटणाऱ्या, मनाचे झुकते माप कलणाऱ्या व्यक्तीकडून झाला असता तर आपली प्रतिक्रिया काय झाली असती हे ज्याने त्याने आपल्या मनाशीच पडताळून पाहावे.

८

श्रममूल्य

यूनोनं १९७५ साल हे स्त्रियांचं वर्ष म्हणून जाहीर केलं आणि हां हां म्हणता एक दशक उलटून जाऊन १९८६ साल उजाडलं. दहा वर्षांच्या स्त्री-जीवनातील खळबळीनंतर नैरोबी इथं एक आढावा घेण्याच्या दृष्टीनं जागतिक स्त्री-परिषद भरविण्यात आली. त्या परिषदेत एक मागणी प्रामुख्यानं करण्यात आली. ती म्हणजे बाईकडून दररोजचं घरकाम हे फुकट करून न घेता तिला त्याचं मूल्य द्यावं. पगारदार नोकरांसारखा तिलाही महिन्याला पगार मिळावा.

पुरुषांना याबद्दल काय वाटते हा प्रश्न अलाहिदा. पण स्त्रियांचीच या मागणीबद्दल पूरक आणि विरोधात्मक अशी विचारधारा निर्माण झालीय. स्वत:चे जीवनानुभव व स्वत:चे जग यातील भावनांशी प्रामाणिक राहूनच हे प्रवाह निर्माण झाले आहेत. या विचारधारा समांतर न धावता एका बिंदूशी मिळण्याचं ध्येय धरून वाहतील तर किती बरे होईल.

'शी:, काही तरीच काय? आम्ही आमच्या घराची मांडणी प्रेमभावनेवर केलेली आहे. नवरा आणि मुलंबाळं यांच्या सुखाकरता आम्ही मन लावून धडपडतो. त्यागातून सुंदर जीवन निर्माण होतं या भारतीय संस्कृतीचा आम्हाला

अभिमान आहे. आमच्या प्रेमभावनेची, त्यागाची आम्ही मोबदल्याच्या रूपात मागणी केली तर साऱ्या कुटुंबाचा पाया डळमळेल. फारच व्यवहारी मागणी आहे ही.' – खरं आहे ते. ज्या संसाराची उभारणी एकमेकांच्या प्रेमाखातर आहे, जिथं सर्वजण एकमेकांच्या भावना जपण्यासाठी धडपडतात, एकमेकांच्या सुखदु:खात रममाण होताना जे आंतरिक सुख अनुभवतात आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे ज्यांना, ज्या कुटुंबातील व्यक्तींना महिन्याच्या तीस दिवसांत कधी उपाशी राहण्याची वेळ येत नाही त्यांना ही मागणी अवास्तव वाटते, कृत्रिम वाटते, अविचारी वाटते.

आजची सुशिक्षित मध्यम परिस्थितीतील किंवा उच्च मध्यम परिस्थितीतील मुलगी जेव्हा विवाह करून घरात प्रवेश करते तेव्हा ती घराची मालकीण म्हणून येते. एकत्र कुटुंब असू दे अगर विभक्त कुटुंबातील इतर नातेवाईक व संबंधितांशी प्रेमाचे संबंध जोडण्यासाठी ती धडपडते. कुटुंबात प्रेमळ व समजूतदार माणसं असली तर तिच्या प्रत्येक कृतीचं कौतुक होते. तिनं प्रगट केलेली छोटीशी मागणीही जेव्हा नवरा तत्परतेनं पुरी करतो तेव्हा तिचं मन उचंबळून येतं. सुखाच्या भोवऱ्यात ती गरगरत राहते.

पण भोवऱ्याचा वेग हळूहळू कमी व्हायला लागतो. कौतुकमिश्रित शब्दांची पखरण मंदावते. दररोजचे जीवन चाकोरीबद्ध होते. एकत्र कुटुंबात असो वा राजाराणीचा संसार असो, नव्याची नवलाई संपून सर्वजण तिला संसारात छान रुळली म्हणून शाबासकी देतात, मुलं जन्मतात. पुन्हा एकदा वसंतऋतूनं तिचं जग फुलून उठतं. मुलं मोठी होतात–आपापल्या पंखांत ताकद भरून घेऊन जीवनात भरारी मारण्याच्या तयारीला लागतात. आता वेळ असतो. नवरा कामात गुरफटलेला असतो. या धकाधकीच्या, चुरशीच्या जीवनात त्याला आणखी पुढे पुढे जायचं असतं. पैसा आणि मानमरातब त्याला आणखी लवकर ये म्हणून खुणावत असतात. बायकोला घर, कपडालत्ता, चार दागिने व इन्शुरन्स पॉलिसी करून दिली, की तिनं आता काहीही कुरकूर न करता जगावं अशी त्याची अपेक्षा असते.

अशा परिस्थितीतील बाईला येणारे मनाचे वैफल्य हे वेगवेगळ्या दुसऱ्या कारणांनी असू शकतं–मात्र कुटुंब यापुरतं बोलायचं झालं तर या वेळी बाई अभिमानी होते. 'आपल्या नवऱ्यासारखा कर्तृत्ववान दुसरा कुणी नाही.' 'माझा

वाढदिवस अगदी बरोबर लक्षात ठेवून एखादी सुरेखशी गिफ्ट द्यायला हे कध्धी कध्धी विसरत नाहीत.' किंवा 'मला हिंदी सिनेमे आवडतात, त्यांना फक्त इंग्रजी, पण माझी हौस म्हणून महिन्यातून एकदा तरी स्वत: तिकिटं आणून मला घेऊन जातात.' 'माझा बाळ्या नि बेबी तरी किती हुषार! पहिल्या दहात असतात आणि शाळेच्या गॅदरिंगमध्ये बक्षीस पटकावल्याशिवाय त्यांचं एक वर्ष जात नाही.' आता एवढी सगळी सुखं आपोआप मिळत असताना नवऱ्याकडं पगार मागायचा ही कल्पना या स्त्रियांना सहन होत नाही. स्वत:ला सुख मिळविण्यासाठी हवे तेव्हा कुरवाळता येणाऱ्या त्यागाच्या पपीला (कुत्रीचं पिल्लू) असं सहज दूर करणं तिला नको वाटते. 'शी: काहीतरीच काय?' म्हणून ती किंचाळते.

ज्या उच्चभ्रू समाजातील स्त्रिया आहेत त्यांना आयुष्यात पैसा कमी पडणं हा प्रश्नच येत नाही. वाडवडिलार्जित मिळकतीच्या त्या हिस्सेदार असतात. त्या भांडवलाच्या जोरावर आणखी पैसेवाला नवरा त्या मिळवतात – भाग्यशाली ठरतात आणि आरामात जगतात. त्यांचा स्वयंपाक करायला आचारी असतो, घर स्वच्छ ठेवायला बाई असते, मुलांना संभाळायला आया असते आणि गाडी चालवायला ड्रायव्हर असतो. असलंच तर घरकाम करवून घेणं हेच एक मोठे काम त्यांना असतं. तेव्हा ज्या घरकाम करत नाहीत त्यांच्या बाबतीत हा वेतनाचा प्रश्न उपस्थित होत नाही. पण जी गोष्ट आपणाला करावी लागत नाही ती दुसऱ्या बायका स्वत: करताना बघून या वर्गातील काही स्त्रिया हळहळतात. ज्या स्त्रियांना ही सारी कामं करावी लागतात 'त्यांची' 'त्यांच्या' नवऱ्यांनी जाणीव ठेवली पाहिजे असं भरसभेतही रोखठोकपणे सांगून सहानुभूती दाखवतात. काय हे 'त्यांचे' जीवन म्हणून वेगवेगळ्या स्त्री-परिषदांचं सदस्यत्व मिळवून जगभर हिंडतात. अतिशय मनापासून, 'त्या' घरकामात अडकलेल्या स्त्रियांच्या नवऱ्यांनी 'त्यांची' दु:खे, पैसा व प्रतिष्ठा यांच्या रूपात परत करावीत म्हणून आग्रह धरतात. एक मात्र खरं. उच्च राहणीच्या, उच्च विचारसरणीच्या, उच्च मजल्यावरील उच्च फ्लॅटमध्ये राहणाऱ्या बहुतांशी स्त्रियांच्या मते 'हा' विषय 'बोअर' असतो.

आता तिसरा विभाग आहे मोलमजुरी करणाऱ्यांचा. सर्व नोकरी करणाऱ्या स्वत:चा उद्योगधंदा करणाऱ्या, कारखाने चालवणाऱ्या, कारखान्यातून काम

करणाऱ्या, ऑफिसमध्ये सकाळी अकरा ते संध्याकाळी पाचपर्यंत अडकलेल्या, धुणी-भांडी करून उपजीविका करणाऱ्या आणि शेती व रोजगारांवर दिवसांचे वेतन घेणाऱ्या स्त्रियांचा. तुमची शारीरिक वा बौद्धिक शक्ती जिथे जिथे वापरली जाते व जिथे त्या शक्तीचे तुम्ही पैशाच्या रूपात मोल घेता ती सर्व मोल-मजुरीच. आम्ही आमच्या श्रमाचं मूल्य घेतो तो पगार व बाकीचे गरीब ते कसल्याही कायम उत्पन्नाची शाश्वती नसताना मातीमोलानं काम करतात त्याची तेवढी मजुरी असा फरक करता येत नाही. तेव्हा ज्या ज्या स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आहेत, किंवा स्वत: पैसे कमवितात, कष्टाचे दाम घेतात, त्यांना श्रम-प्रतिष्ठेची कल्पना असल्यानं घरकामाचं वेतन असावं ह्या मागणीला अनुकूल मत देण्यात काहीच खटकत नाही आणि भावनिक गुंतागुंतीमधून जर काहीसा व्यक्तिगतरीत्या खटकत असेल तर त्यांनी गुन्ता सोडवून स्वत:च्या भावनांची ओढाताण थांबवावी. या वर्गातील बहुतांशी सर्व स्त्रिया फुकटची घरकामं करताना वैतागून जाऊन आपल्या या श्रमाचंही मूल्य द्यावं या मागणीचा पाठपुरावा करतात.

हा वैताग का?—तर आज कष्ट करून पैसा कमविणाऱ्या, आर्थिक दृष्ट्या मिळवत्या स्त्रियांपैकी ऐशी टक्के स्त्रिया हा पैसा स्वत:साठी वापरू शकत नाहीत. त्यांच्या पैशावरही नवऱ्याची, कुटुंबाची मालकी असते. मिळवती मुलगी बायको म्हणून हवी किंवा नोकरी करणारी सून हवी असं म्हणताना तिच्या न चुकता येणाऱ्या महिन्याच्या पगाराचा हिशेब जर लग्नाच्या व्यवहारात असेल तर ती त्या-व्यतिरिक्त घरासाठी करत असलेल्या कष्टांसाठी तिला काही रक्कम हाती द्यायला नको का? किती मिळवत्या स्त्रिया आपल्या पैशाचा विनियोग स्वत:च्या इच्छेनं करू शकतात? पगार झालेल्या दिवशी सारी रक्कम नवऱ्याच्या हातात देणाऱ्या स्त्रियांचंच प्रमाण अधिक आहे. वरकरणी जरी तिला तिचं वेगळं बँक खातं काढून दिलं तरी तिचेच पैसे सतत घरखर्चासाठी वापरले जातात. 'असू दे. आत्ताचा काळ किती महागाईचा आहे – संसारासाठीच तर पैसा वापरला जातोय –' असं मनाशी बोलून ती त्रागा करत नाही. पण घरकाम व नोकरी यांच्या चक्रात तिचा जीव कंटाळत नसेल का? जेव्हा एखादा नवरा, 'काय चार दमड्या तर मिळवताय. त्याचा एवढा जोर कशाला?' म्हणून पदोपदी बोलून पाणउतारा करत असेल किंवा सासूबाई, 'मोठं डबोलं साठवलं असणार

असं वाटलं – पण काहीच नाही – ' असं म्हणत सदा तोंडसुख घेत असतील तर मात्र तिलाही आता या जगात हिशेबी होण्याशिवाय गत्यंतर नाही. आता भारतीय संस्कृतीमधील ' त्याग ' तिला परवडण्यासारखा नाही.

नोकरी न करणाऱ्या स्त्रीलासुद्धा जेव्हा ' आहे का अक्कल चार पैसे मिळविण्याची ? ' म्हणून कधीमधी फाडकन प्रश्न विचारला जातो तेव्हा तिच्याही मनात हा विचार येऊन जातोच, ' अरे, मी नसेन पैसे मिळवत. पण तुम्हा सर्वांचं करता करता आयुष्यभर कष्ट केले ते फुकट असं समजू नका. हिशेब करायचा झाला तर जेवढे पैसे वाचवले तेवढे मी मिळवले असं नाही का ? '

खूपशा स्त्रियांना उतारवयात जेव्हा मुलाच्या आधारानं राहायची वेळ येते, तेव्हा त्यांच्या हातात समजून उमजून जर कुणा मुलांनी चार पैसे ठेवले नाहीत वा मुलांच्याकडे काही प्रसंगानं ते मागायची वेळ आली तर ती दुःखी होते. " आयुष्यभर फुक्कट राबले मी. आज चार पैशांसाठी भीक मागण्याची वेळ आली. त्या ' कामाचं ' मोल असतं तर आज कशाला अशी वेळ आली असती– "

हे आजवर पोटात खदखदत असलेले शब्द ओठावर आलेत. चमकण्यासारखं काय आहे त्यात ? आणि आमच्या हातावर पोट असणाऱ्या भगिनींचे हाल तर काय वर्णावे ? घरी, दारी, जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी सर्वत्र मी आहे असे सांगणाऱ्या परमेश्वराप्रमाणे त्यांच्यासमोर नुसते कष्टच उभे आहेत. जणू परमेश्वर म्हणजेच कष्ट झालेले आहे त्यांच्या ठायी. परमेश्वराचे गुणगान करण्यात साऱ्या भक्तांना आपली माया देऊ केली तो परमेश्वर ह्यांच्यासमोर इतक्या निष्ठुर रूपात कसा काय उभा राहिलाय याचं आश्चर्य करण्यासारखं आहे. देव कुणी पाहिला नाही आणि कुणाला दिसला असेल तर तो सांगायला आलेला नाही. आमच्यासमोर त्याची रूपं आहेत ती वज्रासारख्या कठीण दगडामधून कोरलेल्या मूर्तीची आणि म्हणूनच स्त्रियांना आपलं ' काठिण्य ' किती आहे एवढंच समजावून सांगण्यात तो गर्क झालाय का ?

पण आपण माणसं तर हाडामांसाची आहोत ना ? मग जगभरच्या कष्टकरी स्त्रियांना आपण लुबाडतोय का ? ह्या प्रश्नाचं उत्तर द्यायला घाबरायचं काय कारण आहे ? त्यांना आज कणव नको आहे. जगभर ' श्रमप्रतिष्ठेला महत्त्व द्या ' म्हणून पुरुषवर्ग ओरडतोय. मग तीच मागणी आज स्त्रियांकडून केली गेली तर

त्याला नाक मुरडणं पुरुषांनाही शोभून दिसणार नाही. पुरुषाला विचार करणं भाग आहे.

घरकामाचा पगार ही मागणी कष्टानं खचलेल्या, शारीरिक उभारी कोलमडलेल्या, मानसिक समतोल उद्ध्वस्त झालेल्या स्त्रियांची मागणी आहे. खायला पोटभर मिळू नये, अंगभर वस्त्र ल्यायला मिळू नये, पाय पसरून निवान्त झोपायला कधी मिळू नये, असुरक्षिततेची टांगती तलवार डोक्यावर बाळगत हृदय धडधडत यांनी सदा जीवन कंठावं. कौतुकाच्या, प्रेमाच्या एका शब्दालाही यांनी महाग व्हावं ? प्रेम आणि जिव्हाळा या फुकट देता येणाऱ्या गोष्टींसाठी यांनी डोळ्यांत याचना आणून जीवन जगावं ? साऱ्या मनुष्यजातीला लांच्छनास्पद आहे हा डाग. आता स्त्रियांच्या भावनांनी अमानवी रूप धारण केलंय. त्या सर्वांची आता मात्र अट्टाहासानं मागणी आहे–' आमच्या कष्टाचा मोबदला द्या. आमच्या कष्टाचा हिशेब आम्हाला रोखठोक, छनछन वाजणाऱ्या रुपयात द्या.' काय चुकलंय त्यांचं ? ज्यांच्या भावनांची कलेवरं झाली आहेत, ज्यांच्या बाबतीत शब्द अर्थहीन झालेले आहेत त्यांचे कष्ट नगद रुपये देऊन विकत घेण्याशिवाय दुसरी देवाणघेवाण उरत नाही. भावनेची भाषा न समजण्याच्या हीन पातळीला नेऊन संवेदनाहीन अवस्थेला ज्या स्त्रियांना पोचवलंय त्यांना सौद्याच्या भाषेशिवाय काही समजणं खरोखर अशक्य आहे आणि म्हणूनच ही मागणी—' कष्टाचा मोबदला द्या. '

ह्या घरकामाच्या वेतनासाठी कायदा होण्याची वाट पाहण्याची गरज नाही. ज्या स्त्रियांना मागणी न करता समजून-उमजून मोबदला मिळतो तिथं कायद्याची गरजच नाही. आणि ज्यांना मोबदला मिळत नाही तिथं पुरुषांची वृत्तीही ' कायदे पाळण्यासाठी केलेलेच नसतात ' अशी असल्याने कायद्याच्या बुजगावण्याला ते काय भिणार ? पण जीवन जगताना ज्यानं त्यानं आपल्या स्वत:चे कायदे-कानू ठरविलेले असतात. कुणीही कुणाकडून मोबदल्याशिवाय कष्ट करून घेऊ नयेत. एवढा पाया जरी आयुष्यात घातला तर कुणाचेही कष्ट निदान वाया तरी जाणार नाहीत. कुणाचे कष्ट बहुमोल असतील, कुणाचे अनमोल असतील तर कुणाचे मूल्यवान असतील–त्यांची रूपं आणि गणना कशीही करा पण कुणाही जिवाचे कष्ट मातीमोल ठरवू नका.

९

स्त्री टाकाऊ वस्तू नव्हे

"कसं जीवन जगायचं आम्ही ? – आळशी नवऱ्यानं दोन पोरं जन्माला घालायचं तेव्हढं काम केलं– दुसरं काहीच केलं नाही. मी म्हणाले, पैसे कमवा तर मलाच घराबाहेर हाकलून लावली. माहेरी भावानं आसरा दिलाय हेच लई उपकार झाले म्हणायचं ! दिवसभर दुसऱ्याच्या शेतावर काबाडकष्ट केल्यावर हातात तीन रुपये टेकवतात – ते देखील मुकाटपणे भावाला द्यायचे. भावाच्या शेतावर फुकट राबायचं. कापसाची बोंडं तोडून नखं नाही राहिली बोटांना, मांस नाही उरलं शरीराला. पायाची कातडी हीच उन्हातान्हातील चप्पल – पायात शंभर काटं घुसल्यात पण वेळ नाही काढायला. सांगा ? – दोन मुलं असलेल्या बाईनं नवऱ्यानं टाकून दिल्यावर कसं आयुष्य काढावं ? – रांडमुंड बाईनं पोरं असतील तर कसं जीवन जगावं ? " – चाळिशीची एक शेतमजूर बाई दुःख ओकत होती.

" मला स्वतंत्र व्हायचं आहे – मला स्वतंत्र व्हायचं आहे "— दुसरी एक पस्तिशीची बाई तोंडातल्या तोंडात पुटपुटत होती. मी विचारले, " बाई, स्वतंत्र व्हायचेय म्हणजे काय ? तुमची अडचण स्पष्टपणे सांगा. "– अपराधी चेहऱ्याने तिने मनातील घुसमट मोकळी केली. " लग्नाला पंधरा वर्षे तरी होऊन गेली

असतील. मला मूल नाही झाले. नवऱ्याने स्वत आणली. मी माहेरी आले – भावाकडे ! आईबाप नाहीत – कवाच मेले. भावजयीचे दररोजचे बोलणे ऐकून कान किटले. दिवसभर घरी आणि शेतात राबते पण चार आण्यांबरही मालकी नाही. दुसऱ्याकडे रोजंदारी करते तर हातात पैसे मिळाले असते – हातपाय थकल्यावर काय होणार माझं ? ''

कायदेशीर फारकत ! – घटस्फोट ! ! काडीमोड – बेकायदेशीर घराबाहेर काढणे ! – पोटगी ! मुलांची जबाबदारी ! ! आर्थिक स्वातंत्र्य ? – ! ! ! म्हातारपणाची सोय ? – टक् टक्, टक् टक् – मनाचा लंबक शहरी आणि ग्रामीण स्त्रियांच्या संसाराच्या कालचक्रावरून मागेपुढे सरकू लागला. विवाहबद्ध संसारात काही कारणास्तव बदसूर उमटले आणि विभक्त होण्याची वेळ आली ! कचरा टाकल्यासारखे घराबाहेर हाकलून दिल्यावर काय अवस्था होत असेल अशा स्त्रियांची ?

पन्नास वर्षांपूर्वी घटस्फोट ह्या शब्दाचा उच्चारदेखील अशुभ वाटायचा मध्यमवर्गीय समाजाला. नवरा जर मृत झाला असेल तर मुलीचं माहेरी परतणं– अगदी मुलांसहित–सहसा कुणाला खटकायचं नाही. ती एक सामाजिक तडजोड असावयाची. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या समाजात विभक्त होणे किंवा दुसरा विवाह करणे ह्याबद्दल स्त्रीला काय वाटायचे ह्याचा अभ्यास आपल्याकडे नाही–ह्या कमकुवत गटात अशा गोष्टी मुक्तपणे स्वीकारल्या जातात असाच रूढ समज आहे. (जो तपासून पाहण्याची आवश्यकता आहे.)

–काही असो, एक गोष्ट खरी की सर्वांनाच, मग ते कुठल्याही सामाजिक किंवा आर्थिक पातळीतील असोत – ' दुसरा ' लग्नसंबंध जोडणे सहजासहजी शक्य होत नाही. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या कुटुंबाला–घरी परतन आलेल्या मुलीचा संभाळ करणे, ती रोजंदारीला कामी येत असल्याने, महागाई नसलेल्या काळी विशेष कठीण जात नसावे. निदान तिचा भार तरी होत नसावा.

–पण आजच्या वाढल्या महागाईच्या काळात, नवऱ्यानं हाकलून दिलेली किंवा सासरहून परतून आलेली मुलगी–आणि ती स्वत:च्या मुलाबाळांसहित परत आलेली असेल–तर ' माहेरच्यांना ' जास्त जबाबदारीचे वाटते हे नाकारता येणार नाही. ह्या परिस्थितीला ' माहेर 'च्या कुटुंबियांना दोष देणे मात्र अन्यायाचे होईल. ' टाकून ' दिलेल्या स्त्रीला आणि तिच्या मुलाबाळांना हक्काचे नोकर म्हणून

'घरच्यांनी' वागवलं तर अत्यंत अवघड जिणं जगतच अशा स्त्रीनं आयुष्य कधी संपतंय ह्याची वाट पाहायची का ?

शहरी स्त्रीला विभक्त होताना कायदेशीर घटस्फोट कसा घ्यावा ह्याचा वकिली सल्ला आज मोफतदेखील मिळू शकतो. असा सल्ला देणारी केंद्रे विभक्त होणाऱ्या स्त्रीचे आर्थिक नुकसान कमीत कमी कसे होईल ह्याची सर्वतोपरी काळजी घेण्याचा शक्यतो प्रयत्न करतात. विभक्त होणारी (स्वेच्छेने नव्हे) स्त्री जर मिळवती, नोकरी करून पैसे कमावणारी असेल तर उदरनिर्वाहासाठी, कपड्या-लत्त्यासाठी 'दुसऱ्या' कुणाकडे हात पसरण्याची, भीक मागण्याची वेळ तिच्यावर येत नाही. तिच्या आईबापांची आर्थिक परिस्थिती बरी असेल, भाऊ-भावजय सुशिक्षित-समजुतदार असतील तर तिचं जिणं सुसह्य होण्याचीदेखील शक्यता असते.

संसार सुरू करून नंतर नवरा-बायकोंनी विभक्त होणे हे खरे तर दोघांनाही क्लेशकारकच असावे. पहिला संसार मोडून दुसरा थाटणे सहज शक्य आहे असे पुरुषाने आजवरच्या आपल्या वर्तनाने दाखवले आहे. 'दुसरेपणा'च्या स्थळी आपली मुलगी द्यायला उत्सुक असलेले गरजू आईबाप भरपूर आहेत हेच ह्यामागील प्रमुख कारण असावे.

मात्र विभक्त झाल्यावर लगेचच 'दुसऱ्या' पुरुषाबरोबर नवा संसार थाटावा अशी इच्छा फारच थोड्या स्त्रियांच्या मनात येत असावी हे सत्यदेखील अभ्यासण्यासारखं आहे.

विभक्त स्त्री जर 'एकटी' असेल म्हणजेच मूलविरहित–तर बरेच पुरुष तिच्याशी पुनर्विवाह करण्याचा 'समजूतदारपणा' दाखविण्यास तयार असतात असे चित्रही आजकाल दिसू लागले आहे. पण 'टाकलेल्या', 'सोडलेल्या', किंवा 'विधवा' स्त्रीला जर मूल असेल तर त्यातून निर्माण होणारी भविष्यातली भावनिक गुंतागुंत पुरुषाला व त्याच्या हितचिंतकांना नको असते असाच सर्व-साधारण अनुभव आहे. ही विचारसरणी चूक आहे असे म्हणता येणार नाही.

'दुसरेपणाच्या विवाहसंबंधातून जन्माला येणारं मूल—पहिल्या संबंधापासून जन्मलेलं मूल–ह्या मुलांना जाण आल्यानंतर, त्यांची एकमेकांशी वागतानाची घालमेल–कितीही नाकारायचा प्रयत्न केला तरी ही फार अवघड कोडी बनतात हेच खरं !

त्यामुळेच मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलीचा विवाह होताना तिला सांगितलं जातं, "पोरी, तुला ज्या घरी दिली आहे तिकडेच सुखदु:ख भोगत जीवन जग !—त्या घरातून बाहेर पडायचं ते तिरडीवरूनच !"—हे प्रत्यक्ष अशा शब्दात नसतील सांगत पण भावना जवळपास अशीच असावी असा संशय येण्यास जागा आहे.

अशा रीतीने 'दिलेल्या' मुलीला जर जाणवले की वरमाला पडल्यानंतर माहेरचे दार आपल्याला कायमचे बंद आहे आणि दुर्दैवाने असह्य यातना, भावनिक छळ सोसायची वेळ तिच्यावर आली तर 'स्वत:ला जाळून' आपले स्त्री-जीवन संपविण्याशिवाय दुसरा मार्गच उपलब्ध नाही तिला. ह्याला जबाबदार फक्त तिचे आईवडील की आपण सर्व ? कोंडीत सापडलेल्या अशा स्त्रीला 'जाळून' घेण्या-व्यतिरिक्त 'दुसरा' मार्ग दाखविण्याची—असा मार्ग शोधण्याची फार गरज आहे. समाजातील आधारहीन दु:खपीडित स्त्रिया अशा मार्गाची वाट पाहात आहेत.

ग्रामीण परिसरातील स्त्रीला 'टाकून' देताना 'आर्थिक परिस्थिती' हेच कारण असावं असं मला वाटत नाही. दारू पिऊन मारहाण करणारा नवरा आणि त्या व्यसनापायी मूळच्या दारिद्र्यात भर घालणारी आर्थिक टंचाई—यामुळे स्त्रीला घर सोडावं लागतं.

खेड्यापाड्यांतून आजही लग्नाची बायको किंवा सून म्हणजे घरची व शेता-वरची फुकटची मजुरी करायला मिळालेली हक्काची गुलाम असाच सर्वसाधारण समज आहे. चौदा-पंधरा वर्षांच्या तारुण्यात नुकतंच पदार्पण करणाऱ्या अशा मुलीला लग्न झाल्यानंतर नव्या घरच्या सर्वच जबाबदाऱ्या एकदम संभाळता येत नाहीत. नवीन घर, नवीन नाती, नवे रीतिरिवाज, नवे काबाडकष्ट हे सर्व समजावून घेताना, त्यानुसार वागताना ही तरुण मुलगी भांबावून जात नसेल का ? शहरातील तथाकथित सुशिक्षित आणि सुस्थितीतील तरुण मुलीलाही संसारातील 'पहिला प्रवेश' गोंधळून टाकतोच ना ?

अशा ह्या नवीन सुनेच्या हातून सुरुवातीला काही चुका घडल्या तर त्याचे आयुष्यभर भांडवल करणे योग्य आहे का ? घरातील सासू-सासरे, दीर-जावा, नणंदा या सर्वांनीच ह्या नववधूला तिच्या 'मूर्खपणाबद्दल' सारखे टोचून बोलायचे ह्याला काही अर्थ आहे का ? ह्या नववधूचे माहेर जर 'गरीब' असेल तर मग उणेदुणे काढायला सुमारच राहात नाही. असेल त्या कठीण परिस्थितीतही

आईबापांनी कौतुकानं वाढविलेल्या मुलीला सासरच्या माणसांच्या तोंडून सतत माहेरचा पाणउतारा, आईबापांना शिव्याशाप, कुळाचा उद्धार हे ऐकून काय वाटत असेल ह्याची पुरुषांना कल्पनासुद्धा करता येणे शक्य नाही. स्वत:च्या खऱ्या-खोट्या दंभाबद्दल दुसरं कुणीतरी काही कमी-जास्त बोलतंय असा संशय जरी आला तरी खवळून उठणारा पुरुष–स्त्रीच्या मनाला मात्र इतकं तुडवून टाकण्यास कसा काय तयार होतो हे आश्चर्यच आहे. स्वत:चे श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी बायकोला शारीरिक वा मानसिक इजा करणे हे शौर्य होऊ शकत नाही. स्त्री बोलत नाही तोपर्यंतच हे चालेल–तिने मन उघडे केले तर पुरुष उद्ध्वस्त होऊन जाईल हे निश्चित.

आणि मग प्रश्न पडतो – स्वत: स्त्री असूनही सासू, जावा, नणंदा या पराकोटीस जाऊन, 'दुसऱ्या' घरातून 'आपल्या' घरी आलेल्या एका मानवी जीवाला जुल्मम सहन करायला भाग पाडतात ते काय आपल्या जीवनातील वैफल्याचा बदला घ्यायचा म्हणून?—की आपल्यासारख्याच एका स्त्रीची शारीरिक व मानसिक खच्ची करताना त्यांच्या काही अतृप्त भावनांना आनंद मिळतो म्हणून—? काहीच समजत नाही.

एखाद्या चुकीबद्दल, न पटणाऱ्या गोष्टीबद्दल रागावणे किंवा 'अशा' परिस्थितीत आपण 'पूर्वी' कसे शहाणपणाने वागायचो हे थोडे गर्वाने सांगणे मानवी भावनांना धरून आहे असे मानण्यास हरकत नाही – पण सासरच्या 'माणसांनी' बारीकसारीक कारणावरून क्रूरतेचे अंतिम टोकच गाठायचे हा अधिकार त्यांना कुणी दिला? ज्या मुलींच्या तोंडावरून दृष्ट काढताना आईची दहा बोटे प्रेमाने वळली असतील तिच्या गालावर पुरुषी हाताचे पंजे उठविण्याचा अधिकार घेणाऱ्यांना घरातील इतर समजदार, वयाने मोठ्या असणाऱ्या माणसांनी आवरायला नको का? जी नववधू, नव्या घरी येताना अनेक नाती जोडण्यासाठी येते – त्या नातेसंबंधांची लाज राखण्यासाठी तरी संबंधितांना अशी क्रूरता नजरेस आली किंवा जाणवली तर ती थांबविण्याचा प्रयत्न करायला काय हरकत आहे? प्रत्येक वेळी – अशा प्रसंगी प्रत्येकानं जर "नवरा-बायकोच्या भांडणात नका रे बाबा पडू!" असे म्हणत गप्प बसायचे ठरवले तर ते योग्य आहे का? वडिलधाऱ्यांची अशा प्रकाराबाबत घरात जरब असणे आवश्यक नाही का?

—तसेच, असे प्रकार एखाद्या घरात जर घडत असतील तर सामाजिक

दबाव आणणे हे कर्तव्य ठरत नाही का ?—आपल्या कानावर अशा वेळी हात ठेवून सोयिस्कर वेळ येताच हुंडाबळी किंवा मानसिक छळापायी झालेल्या आत्मघातांविषयी जाहीर हळहळ व्यक्त करणे ह्याला काही अर्थ उरतो का ? आपल्या समाजात जर एका स्त्रीला अशा क्रूरतेचं बळी व्हावं लागत असेल तर ती गोष्ट केवळ एखाद्या कुटुंबाला, त्या कुटुंबाच्या जातीला किंवा धर्मालाच लांच्छनास्पद नाही तर आपणा सर्व स्त्री-पुरुषांना लज्जास्पद आहे.

कुणाही स्त्री-पुरुषाने चार-चौघांत पुढे येऊन सांगावे, "मी एका गरीब स्त्रीचा छळ केला. मी माझ्या बायकोला आयुष्यभर त्रास दिला. मी माझ्या सुनेला सतत धारेवर धरले – आणि म्हणूनच माझे आयुष्यात भले झाले !" – असे छातीठोकपणे सांगणारी पाचपंचवीस माणसे जरी एखाद्या व्यासपीठावर उभी राहतील तर 'दुसऱ्याला छळूनच माणसाचे भले होते.' असा नियम नव्या मानवी नीतिपाठात आपण घालू शकू.

जाणूनबुजून दारे खिडक्या बंद करून होणाऱ्या या शारीरिक व मानसिक आघातांचे आविष्कार म्हणजेच भरल्या संसारातून परतून आलेल्या स्त्रिया. आत्मघात केला त्या सुटल्या. मरण पावल्या. नामशेष झाल्या. पण ज्या मेल्या नाहीत, ज्यांनी आत्मघात केला नाही त्यांनी जिवंत भळभळणाऱ्या जखमा घेऊन अभागी अश्वत्थाम्यासारखे भटकतच राहायचे का ? – ह्या प्रश्नाचे उत्तर शोधण्याची वेळ आली आहे. समाजाला अश्वत्थाम्यांची भगिनी परवडणार आहे का ?


विभक्त होण्याचे दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे सवत ! – कुठल्याही स्त्रीला सवत स्वीकारणे आवडणारच नाही. काही अपरिहार्य कारणाने स्त्रीने पुरुषाला दुसरे लग्न करण्याची परवानगी दिली तरी ती मनावर दगड ठेवूनच दिलेली असते. पहिली पत्नी असताना दुसरी स्त्री घरात आणण्याची प्रचंड मर्दुमकी गाजविणाऱ्या पुरुषाने त्या दोघींचाही सांभाळ योग्य रीतीने तरी करावा – पण नाही. तसे होत नाही. काही अपवाद वगळता, एक आवडती व एक नावडती राणी सांभाळणे गोष्टीतील राज प्रमाणे त्यांना शक्य होत नाही. हे हल्लीचे मर्द राजे आपल्या नावडत्या राण्यांना चंबूगबाळे आवरून हाकलून देतात. मग तो 'हाकलून' दिलेली स्त्री जिवंत आहे का मेली ह्याची आयुष्यात कधी चौकशीही करत नाहीत.

आपल्याला दुसरे लग्न करण्याचे स्वातंत्र्य हवं, आपल्या विवाहबाह्य संबंधांना समाजाने मान्यता द्यावी असे म्हणणाऱ्या पुरुषांकडे पाहून हसावे का रडावे तेच कळत नाही. त्यांच्या सौभाग्यवतींना मात्र दुसऱ्या पुरुषाकडे नुसती नजर वर करून देखील पाहायचे नाही – बोलणे तर दूरच ! आपल्या पत्नीचा एखाद्या परपुरुषाशी संबंध आहे असा नुसता संशय जरी नवऱ्याला आला तर त्या परपुरुषाचा आणि स्त्रीचा मुडदा हाच शेवट.

स्त्री ही टाकाऊ वस्तू नाही याची पुरुषसत्ताक समाजाला जाणीव करून देण्याची वेळ आलेली आहे. एकदा विवाह होऊन मुले झाल्यावर काही खरोखरच महत्त्वाचे शारीरिक किंवा मानसिक अत्याचाराचे सबळ कारण असल्याशिवाय घटस्फोट मंजूर होऊ नये. पहिल्या पत्नीची व मुलाबाळांची आर्थिकदृष्ट्या पालन-पोषणाची संपूर्ण व्यवस्था केल्याशिवाय पुरुषाला दुसरा विवाह करण्यास केवळ कायद्याने बंदी करून भागणार नाही, अशा पुरुषावर सामाजिक बहिष्कार घालण्याची गरज आहे. पहिला संसार उद्ध्वस्त करून फक्त पैशाच्या जोरावर दुसरा स्त्री संबंध जोडणाऱ्या पुरुषांना तर सामाजिक प्रतिष्ठा नाकारली पाहिजे. स्वतःच्या आर्थिक कमकुवतपणापोटी आपल्या मुलांचे लग्न विवाहित पुरुषाबरोबर करून देण्यास आईबापांनी नकार दिला पाहिजे. टाकून दिलेल्या स्त्रियांचा प्रश्न फार गंभीर आहे, ह्याची दखल घेणं निकडीचं आहे.

ग्रामीण भागातील कष्टकरी स्त्रियांवर जर फारकतीची वेळ आली तर त्यांना योग्य सल्ला देणारी, कायदेशीर पाठपुरावा करणारी जागरूक केंद्रे खेडोपाडी निर्माण व्हायला हवीत. आर्थिक, शारीरिक व मानसिक दृष्टीने खचलेल्या स्त्रीला किंवा तिच्या आईवडिलांना कोटकचेऱ्यांच्या फेऱ्या करणे अशक्यच असते.

लोकशाही राज्य जर मूठभर लोकांकरताच असेल तर मात्र ' टाकून ' दिलेल्या स्त्रियांच्या जिवत प्रेतांनी भरलेल्या समाजावर ' आपण ' राज्य करतोय हे लक्षात घेऊन नेतेमंडळींनी उगाचच स्वकर्तृत्वाची बढाई मारू नये.



१०

देवत्व ?–छे, मनुष्यत्व !

" पती हाच परमेश्वर असं समजून पोरी तू आता जग. त्याला सुखी करण्यासाठी धडपड. त्याची इच्छा मोडू नकोस. त्यातच तुझ्या आयुष्याचे कल्याण आहे— " अजूनही बहुतांशी सर्व थरांतील आया मुलीचा विवाह झाल्यानंतर, डोळे पुशीत मुलीला हेच सांगतात. मुलीचं लग्न ठरल्यापासून घरातील वडिलधाऱ्या बायका आपण आपल्या संसारात कसे जमवून घेतले, कोणकोणत्या अडचणींना न कुरकुरता कसं तोंड दिले व प्रसंग निभावला आणि संसाराचा गाडा रेटला ह्याच गोष्टींची उजळणी सतत करत असतात.

आपलं सारं बालपण. आपले आई-वडील, आपली बहीण-भावंडं, साऱ्या मैत्रिणी, सारे सगेसोयरे व बहुतेक वेळा आपलं जन्मगाव सोडून निघून जायचं यांनी खिन्न झालेली नववधू आपल्या साऱ्या सुखाच्या अपेक्षांचं गाठोडं बांधून आशानिराशेच्या हिंदोळ्यावर झुलत झुलत जीवनातलं हे संक्रमण स्वीकारते. या नववधू मुलीनं स्वतःला कळायला लागल्यापासून आपल्या आईवडिलांच्या संसाराचं विश्लेषण नकळतपणे मनाशी केलेलंच असतं. अनेक प्रसंगी आपल्या आईचं काहीहो चुकलं नसताना तिच्या पदरी चूक कशी बांधली गेली हे पाहिलेलं असतं–पण तसं उघडपणे बोलायची छातीच नसते. आपली खरी

बाजू ठामपणे मांडू न शकणारी आई अशा साऱ्या प्रसंगांतून कसे पुण्य गोळा करते हे त्या वयात खरं म्हणजे कळलेलंच नसतं, मात्र अशा प्रसंगी आलेली अस्वस्थता मनाच्या खालच्या कप्प्यात तिनं दडवलेली असते.

पण तिच्या मनाचे बाकीचे कप्पे तरी रिकामे कुठे असतात ? लहानपणी भावा-बहिणींबरोबर वाढताना स्त्री म्हणून पुढं कसं वागायचं याचेच छोटेमोठे रांजण तिच्या मनाच्या कप्प्यात जागा पटकावतात. प्रत्येक सुखदु:खाच्या प्रसंगी भावात आणि बहिणींत झालेलं उणे-दुणेपण तिला बोचलेलं असतं. ज्या घरांतून सुबत्ता असते तिथं मुलींनाही अतिशय कौतुकानं वाढवितात—उलट मुलगी दुसऱ्या घरी जाणार म्हणून तिची बारीकसारीक हौसही पुरवणारी कुटुंबे देखील आहेत—पण अशा भाग्यवान मुलींचे प्रमाण अर्थातच थोडे आहे.

बारीकसारीक गोष्टींतही जेव्हा मुलीला आपण 'मुलगी' आहोत याचं भान नसतं तेव्हा 'तू मुलगी आहेस, भावाच्या बरोबर भांडू नकोस, मुलीच्या जातीनं उलट उत्तरं देऊ नयेत, भावाचं चुकलं असलं तरी तुला हो म्हणायला काय जातंय ?—असं ठणकावून सांगितलं गेल्यावर तिचं बालमन खट्टू झाल्याशिवाय राहतं का ? हे असे घण मारून तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या कपच्या काढायला बडिलधाऱ्यांनी सुरुवात केलेली असते. खेळताना दांडगट खेळ खेळू नको, झाडावर चढू नको, संध्याकाळी एकटी बाहेर जाऊ नको, गेलीस तर दिवेलागणीच्या आत परत आलंच पाहिजे. ग्रामीण भागात असे मुलीचे बाहेर जाण्याचे प्रसंग उद्‌भवतच नाहीत पण शहरांमधून मुलींना शाळेव्यतिरिक्त इतर काही विषयांत रस असेल तर त्या कार्यक्रमाच्या संदर्भात बाहेर जावे लागते—आज गॅदरिंग आहे, उद्या खेळाच्या स्पर्धा आहेत, परवा आणखी कुठे व्याख्यानमाला आहे—नेहमी नव्हे, पण अशा एखाद्या आवडीमधून तिचं व्यक्तिमत्त्व वाढविण्याची संधी तिला द्यायची असते. पण ह्या आवडीला तिला बहुतेक वेळा पायबंदच घालावा लागतो. दिवेलागणीच्या आत मुलींनी घरात यावे, कारण नसताना बाहेर रेंगाळू नये—या सूचना त्या मुलींचे वय आडमुठे असल्यानेच दिल्या जातात. प्रेमाच्या पोटीच सांगितलं जातं. पण कारण न समजून घेता, कडक कायद्याची अंमलबजावणीच जर घरी होत असेल तर कार्यक्रम अर्धवट टाकून घरी परत येणे तिला नाराजी आणते व नंतर ते बाहेर जाणे नकोच असा निर्णय ती घेते. मात्र याच वेळी आपला भाऊ केव्हाही रात्री-बेरात्री उनाडक्या

करून घरी आला तरी त्याला कोणी काही म्हणत नाही असं जेव्हा तिच्या लक्षात येतं तेव्हा आपण मुलगा असतो तर किती किती बरं झालं असतं असा विचार तिच्या मनात चमकून जातो. पण असा विचार तिच्या मनात येणे हे अयोग्य आहे का ?

आर्थिक परिस्थिती जर बेताची असेल तर मुलगी हुषार असूनही तिला शिक्षणाची संधी दिली जात नाही व घराचा भावी आधार म्हणून ' ढ ' मुलाला शिकवण्या लावून शिक्षणाच्या चक्रात ढकलले जाते. अशावेळीही जर मुलीला ' मुलगी ' म्हणून जन्माला आल्याची खंत टोचत राहिली तर त्याचे परिणाम दूरवर तिला भोगावे लागतात. पुढील आयुष्यात घडणारा छोटा प्रसंगही तिच्या मनावर ' मुलगी ' असण्याचा न्यूनगंड निर्माण करण्यास सुरुवात करतो. काही मुलींच्या बाबतीत हा न्यूनगंड इतक्या मोठ्या प्रमाणात निर्माण होतो की आयुष्यभर स्त्री म्हणून घडणारे स्त्री जीवनातील प्रसंगही त्या मनमोकळ्या आनंदाने उपभोगू शकत नाहीत. स्त्रीत्व साफल्य करणारे बाळंतपणही त्या खुल्या मनाने स्वीकारू शकत नाहीत–उलट मुलगी झाले म्हणून हे हाल सोसावे लागले असे म्हणून त्या दु:खी होतात.

बाप आपल्या मुलीचं लहानपणी अंगाखांद्यावर खेळून कौतुक करतो – पण जरा मोठी झाल्यावर बाप जो मुलीला दुरावतो तो नंतरच्या आयुष्यात फक्त सावलीसारखाच तिला सोबत करतो. बहुतेक मुलींना आपल्या बापाचा अभिमान प्रचंड असतो. बापाच्या सर्वच गोष्टींचे मुलीला कौतुक असते. सावलीसारखी असलेली त्याची मायासुद्धा तिच्या मनाला आभाळाएवढी मोठी करून टाकते. आपल्या आईवर व घरादारावर असलेली वडिलांची जरब मात्र तिच्या मनावर पुरुषाची प्रतिकृती रेखाटून टाकते. आजच्या शहरी, मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय कुटुंबांमधून असा दरारा असणाऱ्या वडिलांचे प्रमाण दर्शनी स्वरूपात तरी कमी प्रमाणात दिसते – पण पृष्ठभागावर न दिसता शांतपणे पुढे जाणाऱ्या पाणबुडीसारखे ते असते हे मात्र निश्चित.

भावाबरोबर वाढत असताना जरी ' संस्कारांनी ' मुलीला पड खायला लावलेलं असतं तरी तिचा भावावर राग नसतो. मुलगी कितीही हूड असली तरी वयाच्या बारा चौदा वर्षांनंतर ती आपोआपच आपल्या घराभोवती जास्त रुंजी घालू लागते. मुलगा बाहेरच्या वातावरणाकडे खेचला जातो. मुलींमधील स्त्रीत्व मुलीला संयम

आपोआप शिकवतं – काही अपवादात्मक उदाहरणे सोडली तर स्त्री ही पुरुषापेक्षा जास्त संयमी आहे – मग ती आर्थिकदृष्ट्या, शैक्षणिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या कुठल्याही स्तरातील असू दे. मात्र ह्या तिच्या नैसर्गिक प्रवृत्तीची जाणीवही न घेता उलट तिची अधिक गळचेपी करण्याची संधी सारेजण घेतात याचे वाईट वाटते. आई-वडील, इतर नातेवाईक मंडळी, सारेसारेजण तिला एकदम 'सुगृहिणी' बनविण्यासाठी धडपडायला लागतात. हे करू नको, ते करू नको असं बोलू नको, असं बसू नको, असं वागू नको....असे नकारात्मक गाणे तिच्या कानावर सतत पडायला लागते. वडिलधाऱ्यांच्या दबावामुळे न आवडणाऱ्या गोष्टींसुद्धा मन मारून करायला ती शिकते. त्या वेळचा तिचा धसमुसळेपणा, तिचा राग, तिची नावड, तिची नाराजी सोयिस्करपणे दुर्लक्षिली जाते. स्वत:चे मत ठामपणे मांडणे, स्वत:च्या आवडी-निवडीचे प्रतिपादन करणे, स्वत:चा स्वाभिमान जागता ठेवणे हे तिला तिच्या पुढच्या आयुष्यात मग शक्यच होत नाही. आई-वडील, सगेसोयरे, सहवासात येणारे सारे वयाने मोठे स्त्री-पुरुष ह्या नवीन पिढीतील स्त्रीव्यक्तिमत्त्वाचे कंगोरे गुळगुळीत करून टाकतात आणि आपल्याच आचार–विचारांची प्रतिकृती कशी निर्माण केली म्हणून स्वत:ला धन्य मानतात.

लहान असताना बाप आपला संरक्षणकर्ता आहे हे मुलीनं जाणलेलंच असतं. पण नंतर ज्याच्याशी तू खेळतेस, भांडतेस, रुसतेस तो भाऊही तुझा रक्षणकर्ता आहे हे वारंवार सांगितलं तर जातंच पण सणाद्वारे तिच्या व मुलाच्याही मनावर पक्के बिंबवले जाते. आपल्या संस्कृतीत पित्याचे कर्तृत्व आपण सगळेजण फक्त वडिलांनी 'साठी' गाठली की मान्य करतो. मात्र 'भाऊबीज' व 'रक्षाबंधन' ह्या दोन सणांत स्त्री ही भावाला ओवाळून त्याला तू माझा रक्षणकर्ता आहेस हेच परोपरीने सांगते. आपल्या जीवनाचा माहेरचा दोर ती भावाशी घट्ट बांधून टाकते. त्याला काहीही कारणांनी दुखावणं मग तिला आयुष्यभर शक्य होत नाही. आपल्याभोवती पारतंत्र्याच्या दोराचा आणखी एक विळखा घालते. आताच्या काळात शिकलेल्या, सधन स्थितीत असलेल्या बहिणींच्या बाबतीत तिच्या आयुष्याची जबाबदारी घेण्याची वेळ खूपशा बंधुराजांवर येत नाही पण नंतरच्या जीवनात दुर्दैवाने संसारसुख लाभले नाही तर ग्रामीण भगिनी भावावरच विसंबून माहेरी परतते किंवा तरुण वयात वैधव्य आले तर एवढे एकच नाते अधिकाराने

ती राबवते – दुसऱ्या हितसंबंधीयाबरोबर तिचे राहणे वा तिची दुसऱ्या नातेवाइकाने घेतलेली जबाबदारी समाजाला मान्य नाही. पुरुषालाही या जबाबदारीचा त्रास होत असणारच – कारण स्वत:ची स्त्री व बहीण यांच्यातील संबंध आनंददायी असतीलच असे नाही. स्त्रीला भावाचा भावनिक आधार वाटणे वेगळे आणि सर्व जबाबदारी टाकून त्याची व भावजयीची गुलाम होऊन स्वातंत्र्य गमावणे वेगळे. भावाचा आधार मनाशी धरून ती अधिक कमकुवत होते हे मात्र निश्चित. स्त्री म्हणून तिच्यावर लादण्यात आलेली पुटं हळू हळू एकजीव होऊन घट्ट बनतात. मात्र या वेळी पोकळ सुरक्षितपणाच्या आवरणाखाली ही स्त्री सुखावून जाते.

पण तिचा खरा संरक्षणकर्ता म्हणून स्त्री पाहते मात्र आपल्या नवऱ्याकडे. विवाहवेदीभोवती सात फेरे मारून झाले किंवा रजिस्ट्रारसमोर विवाह–करार-पत्रांवर सही केली की सासरी जाताना सर्वांच्या आशीर्वादातून, स्पर्शातून, बोलण्यातून, सुरुवातीच्या 'पती हाच परमेश्वर' समजून वाग–तोच तुझा रक्षण-कर्ता–या वाक्याचेच वेगवेगळे सूर नाचत असतात. पुढच्या जीवनात तिला जे 'जीवनगाणे' गायचे आहे त्या गाण्याच्या स्वरांचा 'सा' पक्का होतो.

माहेरचे सर्व पाश तोडून आलेली ही नवविवाहिता हळूहळू संसारी स्त्री बनून जाते. विवाहानंतर स्त्रीचं जीवन चाकोरीबद्ध होते हे खरंच पण ह्या स्त्रीजीवनात तिला मानायला लावलेला 'पतिदेव' तिला खरंच संरक्षण देतो काय?—हे तपासून पाहण्यास हरकत तरी नसावी.

ग्रामीण भागातील काही हाताच्या बोटावर मोजण्याएवढी सधन शेतकरी कुटुंबे सोडली तर उरलेल्या स्त्रियांच्या जीवनचक्राचे फेरे फारसे वेगळे नसतात. लहान वयात मुलीचे केलेले लग्न म्हणजे बहुतेकवेळा 'घराण्याची अब्रू' तिच्या कडून धुळीस मिळवली जाऊ नये ह्या एकाच उद्देशापायी झटकलेली जबाब-दारी असते. एका दिवसात बालपणाची रेषा ओलांडून ती मुलगी 'मोठी' होते; 'सून' बनते. सासूबाई आपली चुलीसमोरची जागा तिला देऊन भाकऱ्या बडवायला बसवतात व तिला भाकरी नीट करायला येतेय की नाही हे पाहत तिच्या गुणदोषांची चिकित्सा करायला मोकळ्या होतात. केरवारा, धुणीभांडी, लाकूडफाटा गोळा करणे, दुरून विहिरीवरून पाणी आणणे, गुरा-ढोरांची देखभाल, शेतावर कामाला जाणे नाहीतर रोजगारहमीवर रोजी लावणे–

या कष्टप्रद जीवनपद्धतीत सूनबाई थकूनच जाते. लाखांत एखादी सासू समजूतदार जी नवीन सुनेचं वय समजून घेते. ताटात पडेल तेवढंच खायचं. तोंड बरती करून मागायचं नाही. अंगावर वस्त्र म्हणावं तर दोनदांड्याचं, गाठी मारलेलं लुगडं आणि ठिगळ लावलेलं पोलकं. थकून जाऊन जमिनीला कधी पाठ टेकतोय असं तिला होऊन गेलेलं असतं—पण गोधडीवर देह पसरताच झोप नाहीच. नवऱ्याच्या स्पर्शानं पुन्हा जाग. शरीरसुख मिळविण्यासाठी तिचं हपापलेलं मन व देह नैसर्गिकरीत्या थोडा उमलून उठतो–पण सारा अबोल शृंगार. शृंगाराची चेष्टा करून निघून गेलेला जोडीदार पुन्हा तिला एकटीच टाकतो. ह्या साऱ्या जीवनाच्या रहाटावर ती नुसती फिरत राहाते. कधीतरी शारीरिक त्रास असह्य झाला, मानसिक दुःख अनावर झाले तर बोलायचे कुणापाशी हे तिला कळत नाही. आपल्या नवऱ्याकडे तिनं त्या त्रासाची वाच्यता केली तर दुःख दूर करणे बाजूलाच—उलट ज्यांच्यामुळे तिला त्रास होतोय म्हणून तक्रार मांडली जाते त्या संबंधीयांशी, त्या परिस्थितीशी मुकाबला करणे त्या संरक्षणकर्त्या नवऱ्याला अशक्यच असते.—त्यामुळे वड्याचे तेल वांग्यावर या नियमाने तो आपल्या बायकोवरच हात उगारतो. आपला 'पुरुषार्थ' आपल्या हक्काच्या माणसाकडे असा हिंसेने दाखवतो. ज्याला आपण देव मानतो तो आपणाला सर्व सुखं तर जाऊ देत पण घरात घडणाऱ्या अन्यायापासूनही वाचवू शकत नाही याची खंत ग्रामीण, गरीब वा साधारण आर्थिक परिस्थिती असलेल्या विवाहितांना वाटली तर ती खंत अस्वाभाविक आहे का ?

ग्रामीण, सधन व सुस्थितीतील कुटुंबांमधून विवाहितांना कामे करावीच लागतात –पण त्यांचा बोजा असा त्यांना वागावावा लागत नाही. खायला पोटभर व ल्यायला अंगभर वस्त्र मिळत असल्याने उंबरठ्याच्या आत त्या विवाहितांनी आनंदानं जगावं अशीच घरातील सर्वांची इच्छा असते. तिच्या काही व्यक्तिगत आशा-आकांक्षा वा तक्रार असू शकते हे घरातील कुणाच्याच खिजगणतीत नसतं. त्या इच्छा सर्वांसमोर मांडण्याचं स्वातंत्र्य मिळविण्यासाठी तिला खूप वर्षं वाट पाहावी लागते. ती सासू होते तेव्हाच तो अधिकार तिला मिळत असावा. उमेदीत नाही.

मध्यमवर्गीय शहरी स्त्रीच्या वैवाहिक जीवनात फक्त राहणीमानाच्या दृष्टीने

फरक पडलेला असतो. पण बाईच्या मागचे कष्ट व मानसिक आंदोलने तीच असतात. ग्रामीण भगिनीच्या तुलनेत तिचे शारीरिक कष्ट शहरी सुविधा असल्याने कमी असतात. तिच्या हातात नगद रुपयेही पडतात पण त्या पैशात सर्व जीवन व्यवहाराच्या गोष्टींची तरतूद करताना तिची तारांबळच उडते. शहरात सतत नजरेसमोर असणाऱ्या विविध प्रलोभनांच्या दर्शनाने ती खिन्न होते. नवऱ्याचे कौतुक तिच्या थोडंफार वाट्याला येतं. सिनेमा–नाटक–हॉटेल यांची काही झलक ती ठेव्यासारखी सांभाळते तोच एखाद्या मुलाची आई बनून धकाधकीच्या जीवनरहाटीत अडकते. लहान जागा, लहान मूल, पैशाचं लहान गाठोडं यांचा मेळ घालताना खूपदा नवरा कधी जुगार व दारूच्या व्यसनात अडकला ते तिला कळत नाही. त्यावर तिच्याजवळ इलाजही काही नसतो. तिचे हालच तिला सोबत करतात. काही वेळा संरक्षणकर्त्या 'देवाचे'च संरक्षण करण्याची तिच्यावर वेळ येते. तिच्या आईचे शब्द–तिची पाठवणी करताना गदगदून बोललेले शब्द तिला आठवतात. ती फक्त मनाशी हसते.

उच्च मध्यमवर्गीय स्त्री, सुशिक्षित व नोकरी करणारी स्त्री वैवाहिक जीवनाची सुरुवात करताना आर्थिक विवंचनेनं ग्रासलेली नसते–इतर स्तरांतील भगिनींपेक्षा तिच्या ठायी सुखाचं माप अनेक पद्धतीनं सांडतं. पण नवऱ्याची प्रतिष्ठा सांभाळणे, त्याच्या सर्व व्यसनांचा आदर करणे, स्वत:चं व्यक्तिमत्त्व विसरणे व आपण सुखी आहोत याचा आभास निर्माण करण्यात ती खरी कसरत करते. भौतिक व शारीरिक सुखसोयींची समृद्धता तिला पांगळं करते. तिचं मन शांत आहे की अशांत आहे हे तिचं तिला समजेनासं होतं. नवऱ्याचं 'देवपण' ती स्वीकारते पण ह्या देवाच्या पूजाअर्चेची, फुलं–पुष्पं–तोयंची व्यवस्था करताना ती संरक्षणकर्ता ह्या शब्दाची व्युत्पत्ती शोधण्यात गढून जाते.

पुरातनकाळी घराबाहेर वावरताना स्त्रीला शारीरिक सुरक्षितता अशी जवळ जवळ नसेच. पुरुषांच्या दृष्टीने तिचे अपहरण करणे हे युद्धातून धनसंपत्ती मिळविण्याइतकेच महत्त्वाचे असे. नंतरच्या काळात राहणीमानात समाजजीवन खूप स्थिर झाले पण 'पुरुषार्थ' दाखविण्यासाठी युद्धे अटळच असत. या सर्व लढाया आमने-सामने शस्त्रांनी होत असल्याने शारीरिक शक्ती व वैयक्तिक चातुर्य यांचे प्रदर्शन पुरुषाकडून होत असे. त्याच्या स्त्रीला ते शौर्य अभिमानाचे असे. आपला, आपल्या कुटुंबाचा आणि आपल्या राज्याचा संरक्षणकर्ता म्हणून

ती त्याला मोठ्या कौतुकाने ओवाळत असे. आता सारा काळच बदललाय. शारीरिक शक्तीपेक्षा वैज्ञानिक तंत्रज्ञानाने लढाया लढल्या जात आहेत. आजच्या पुरुषाचा शूरपणा त्याच्या दरमहा येणाऱ्या मिळकतीवर उभा राहिलाय. पण अवचित असे संघर्षाचे प्रसंग जर घराबाहेर उद्भवले तर ज्या शारीरिक शौर्याचे आपणा स्त्रियांना आकर्षण असते ते किती बुद्धिजीवी पुरुष देऊ शकतील याबद्दल शंकाच आहे. सुसंस्कृतपणाच्या आवरणाखालचे हे शौर्य सर्व स्त्रियांना आत्मबळ व आत्मविश्वास देत असेल असे वाटत नाही. आजच्या समाजात संरक्षणकर्त्याची भूमिका बजावणाऱ्या पुरुषाने स्त्रीला घरात जास्त असुरक्षित करून टाकलेय याचे वाईट वाटतेय. आज स्त्रीने घरातील व घराबाहेरील स्वतःची सुरक्षितता स्वतःच संभाळायची आहे.

देवत्वाचा दुसरा गुण म्हणजे आपल्या भक्ताचं भरण-पोषण करण्याची जबाबदारी घेणे. त्या गुणाचेही अवमूल्न झाले आहे असे वाटायला लागले आहे. अर्थार्जनाची कामे आज जिथे स्त्री व पुरुष दोघेही करत आहेत तिथेही नवरेपणाचा अधिकार गाजविल्याशिवाय पुरुषाला श्रेष्ठ वाटत नाही. त्याने मिळवलेल्या पैशाचा विनियोग तो स्वतःच्या इच्छेने करतो. मात्र ते स्वातंत्र्य फारच थोड्या स्त्रियांच्या नशिबात असते. मग जिथे फक्त पुरुषच अर्थार्जन करतो तिथे त्याने सर्वांना खाऊ-पिऊ घालताना, स्वतःच्या सामर्थ्याचा अभिमान न धरता, उपकाराच्या ओझ्याखाली सर्वांना गुलाम बनविण्याची वृत्ती का न दाखवावी ? एका भाकरीच्या तुकड्यासाठी, ताटभर जेवणासाठी किंवा ताज-ओबेरॉय सारख्या पंचतारांकित हॉटेल्समधील मेजवानीसाठी 'देवाकडे' भीक मागण्याची पाळी स्त्रीवर का यावी ?

स्त्री लज्जारक्षणार्थ भगवान् श्रीकृष्णाने द्रौपदीला अगणित साड्यांचा पुरवठा केला – ही गोष्ट ऐकताना स्त्रियांचा ऊर असा भरून येतो की डोळ्यांतून पाणी वाहायला लागते. आज ज्या स्त्रियांचे 'पतिदेव' त्यांना अंगभर वस्त्र देऊ शकत नसतील तर त्या स्त्रियांनी नवऱ्याचे 'देवपण' कसे खरे मानावे ?

पुरुषाला देवत्व द्यायची कल्पना आपण स्त्रियांनी मनातून काढून टाकायला पाहिजे. पुरुषाला देवासमान मानण्यात आपण स्त्रिया खरोखरच चूक करतोय व मनोमनी दुःखी होतोय. पुरुषालाही हे देवत्वाचे ओझे कदाचित नको असेल. हे देवत्व लादणे पुरुषालाही त्रास देत नसेल असे मानणे चुकीचे होईल.

पुरुषावरचं हे ओझं आपण काढून टाकू आणि दोघेही मोकळे होऊ.

आपल्या स्त्रीजीवनाभोवती लहानपणापासून उभारल्या गेलेल्या भिंती – त्यावरचा विवाहाचा गिलावा, प्रथम लावलेला 'पती हा परमेश्वर' चा प्रायमर व मग नंतर लावलेले अनेक मुलायम रंग बघताना असं जाणवतं की आज हे रंग काढून टाकायला हवेत – खरवडून खरवडून – म्हणजे मग ते आपणहून उडून जाताहेत याचा धक्का दोघांनाही बसणार नाही. हलके वेधक रंग गोंजारण्याचे दिवस सर्वत्रच संपलेत. गिलावे व भिंतीसुद्धा उचकटून पुन्हा तयार करायला हव्यात कारण सर्वांच्याच मनःपटलाला दुसरा रंग देण्याची गरज आहे.

लहानपणापासूनच्या नकळत बंधनातून आपण स्त्री-पुरुष जर मोकळे झालो– एकमेकांच्याकडून इच्छापूर्तीच्या अपेक्षा खूप कमी केल्या व स्वतःला – सहजीवनाला – व संसाराला सुयोग्य असे वर्तन करावयाचे ठरविले तर अधिक सुरक्षितता दोघांनाही लाभेल. जीवन मोहक बनेल. फक्त ह्या मोहक रंगाचा प्रायमर वेगळा असेल.

"पती हा परमेश्वर नव्हे – देव नव्हे – तो आपल्यासारखाच माणूस आहे."

११

मुक्तीची पहाट

"स्त्री संघटित होऊन आपले स्त्री-मुक्तीचे स्वप्न साकार करू शकेल का?"

"– का नाही होणार? तिचं स्वप्न साकार जरूर होईल."

– वरील संभाषण कानी पडताच समस्त स्त्री-जात, तिच्या करोडो रूपांमध्ये पुरुषाशी लढायला जीवनाच्या रणांगणावर उतरली आहे असे चित्र सर्वांच्या डोळ्यांसमोर तरळतेय ना? घाबरू नका. अशा नुसत्या लाखो, करोडो आकड्यांच्या भाषेत तिला मोजून स्त्री संघटित झालीय असे म्हणणे आणि तिच्या मुक्ततेचे दार तिला खुले झाले असे समजणे बरोबर नाही.

सर्व स्त्रिया एकमेकीच्या सुखदु:खाच्या सहसंवेदनांनी जेव्हा जुडल्या जाणार तेव्हाच त्या संघटित होणार. श्रीमत-गरीब, शिक्षित-अशिक्षित, अर्थार्जन करणारी– पैसे न कमावणारी – एकत्र कुटुंबात राहणारी – विभक्त कुटुंब सजवणारी, लेकुरवाळी – वांझ, सौभाग्यवती – परित्यक्ता अविवाहित – विधवा, सनाथ – अनाथ व सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आई व सासू अशा दोन्ही भूमिका भूषवणारी पण दुभंगलेलं व्यक्तिमत्त्व नसणारी स्त्री जेव्हा छोट्या छोट्या समुदायांनी, त्यांच्यापुरत्या व्यापलेल्या विश्वात एकमेकींची कदर करणार आहेत तेव्हाच तिचे

मुक्ततेचे दार खुले होणार आहे. पुरुषाशी अनेक नात्यांनी बद्ध असलेली स्त्री पुरुषाला जेव्हा त्याच्याकडून स्त्री बाबतीत होणारा अन्याय 'थांबव' म्हणून इशारा देणार तेव्हाच स्त्रीच्या जाणीव-जागृतीला समाधान मिळण्याची शक्यता निर्माण होणार आहे – मग तिची मुक्ततेची मागणी संपणार आहे.

चला, म्हणजे स्त्रियाच स्त्रियांची मुक्तता करणार आहेत तर? — हुश्श्य म्हणून पुरुषांना कपाळावरचा घाम पुसायला हरकत नाही. पण ह्या चार घर्मबिंदूंपेक्षा घामाच्या धारा पुरुषांनाच अधिक गाळायच्या आहेत. स्त्रीला स्वत:ला खुपणाऱ्या ज्या अवस्था मी मांडल्या आहेत त्या साऱ्यांमध्ये समान असलेला घटक म्हणजे पुरुष आहे. त्यालाच अलिप्तपणे स्त्री–दोषांकडे जास्त चांगल्या तऱ्हेने पाहता येईल व त्या दोषांचे निराकरण करण्यात हातभार लावता येईल. हे जर पुरुष करू शकला तर आपल्या जोडीदारणीबरोबर – दौडत तो सारा जीवनवेग वाढवू शकेल आणि स्त्री व पुरुष या दोघांनाही पैलतीर गाठताना समाधान लाभेल.

श्रीमंत-गरीब. आर्थिकदृष्ट्या संपन्न घरात जन्म घेणे वा गरिबाच्या चंद्रमौळी झोपडीत जन्माला येणे हे कुणाच्याच हाती नसते. जन्माला येताना श्रीमत घरात आपल्याला जन्म मिळाला म्हणून हसत हसत आलेलं बालक कुणी ऐकलंय का? स्त्री-पुरुष या दोघांनाही विधात्याने तरी एका समान पातळीवरच जगात धाडलेय. त्यांच्या जन्माला येण्याच्या क्रियेत तरी समान संधी दिली आहे. मग विधात्याचे बोलावणे आले म्हणून हे जग सोडून जाताना जीवन जगल्याचा थोडातरी आनंद प्रत्येकाला पांघरायला मिळायला नको का?

आई-बापांच्या अंगाखांद्यावर वाढणाऱ्या मुलाला पैशाची संपन्नता वा दरिद्रीपणा थोडाच कळतो? पण मूल जसे वाढायला लागते, त्याला जेव्हा कळायला लागते तेव्हा आपण आई-बाप त्यांना परिस्थितीची एवढी पक्की जाणीव करून देतो की त्यामुळे आलेला न्यूनगंड वा मस्ती मग आयुष्यभर उतरतच नाही. लहानपणी खेळतानासुद्धा आपला भारी किमतीचा फ्रॉक मळेल व साधे कपडे घालून मळलल्या मुलींच्यात खेळणे आवडत नाही म्हणून जी मुलगी अलग राहते ती नंतरच्या आयुष्यात नवऱ्याच्या कमाईच्या साडीला भिरकावून देते. एकुलती एक साडी स्वच्छ धुऊन, चुणी पडू नये म्हणून उशाशी घेऊन निजणाऱ्या आपल्याच गुणी मैत्रिणीला ओळख देण्यास कचरते. कपड्यावरून

व्यक्तीची योग्यता ठरविणे बरोबर आहे का? त्यातून अंगभर वस्त्र न नेसलेली स्त्री दृष्टीस पडणे हे स्त्री-पुरुष दोघांनाही लज्जास्पदच नाही का? आई–बाप, भाऊ–बहीण, दीर–जाऊ, काकी–मावशी आणि त्रयस्थ म्हणूनही वावरणाऱ्या साऱ्याजणांना ती शरमेची गोष्ट आहे. प्रत्येक बऱ्या परिस्थितीतील स्त्रीने आपल्या जवळपास वावरणाऱ्या अशा अभागी स्त्रीला वस्त्रांकित करणे जरुरीचे आहे. अपुरं, फाटलेलं, जोड लावलेलं पातळ व फाटकं, ठिगळं लावलेलं पोलकं घातलेली स्त्री सर्वांचीच भ्रू घालवते. "बाईच्या जन्माला तर आलो पण लाज राखायला जर अंगावर धडुतं नसेल तर यापेक्षा चुडेलणीचा जन्म बरा म्हणायचा." असे अंतःकरण पिळवटून टाकणारे उद्‌गार नुसतेच हवेत विरून द्यायचे का? अशा परिस्थितीतील स्त्रीला स्त्रीनंच मदत केली पाहिजे, पुरुषानेही अशी मदत जरूर करावी–पण निर्हेतुकपणे. कुणीही आपल्याकडे मदत मागितली तर आपापल्या कुवतीनुसार प्रत्येकजण मदत करतो किंवा प्रत्येकाने मदत करावीच पण मागितल्याविना गरज भागविण्यात जास्त सुदरता आहे.

आपण स्त्री-पुरुष दागदागिने व चैनीच्या गोष्टींची खैरात नेहमीच आपल्या तोलामोलाच्या व गरज नसलेल्या व्यक्तींच्यावर करत असतो–पण स्वतःचा, स्वतः श्रेष्ठ समजत असलेला दर्जा संभाळताना होणारी कसरत गरजू लोकांना मदत करताना कधीच करावी लागत नाही. अडीअडचणीत असलेल्या आपल्या स्त्री भगिनींना जमेल तेवढी मदत करण्यास तरी काय हरकत असावी? स्वभावतः कंजूष अन् पत्नीकडून पै-पैशाचा हिशेब मागणाऱ्या बऱ्या परिस्थितीतील पुरुषांनी याबाबतीत आपल्या आईस, पत्नीस वा भगिनीस थोडी सूट द्यायला हरकत नाही. "लग्न होऊन आम्ही या घरात आलोय–पण एखादी वस्तू वा चार आणे उचलून द्यायची सत्ता आम्हाला नाही"–—अशी वक्तव्यं 'सहृदयता' मारून टाकणार की काय म्हणूनच भीती वाटते. हे सहृदयतेने केलेलं दान अनाठायी नसतं–आपलं स्वतःचं जीवन जगताना, समाजात वावरताना अनेकांच्या सुप्त दानावर आपणही जगत असतो. आपल्याला मिळालेल्या भाग्याला असूयेची नजर लागू नये असं वाटत असेल तर प्रत्येक स्त्रीने आपल्या संबंधात येणाऱ्या स्त्रियांच्या स्त्रात्वाचा मान संभाळावा 'मी जगावेगळी' असं म्हणून जगात आपण राहू शकत नाही. हे समजायला कठीण नाही पण उमजायला कठीण आहे—

मी स्वत: शिकलेली व दुसरी समोर असलेली न शिकलेली – अडाणी – अशिक्षित – असा स्त्रीने स्त्रीशी भाव धरणेही चूक आहे. शिक्षणाची अनुकूल संधी लाभल्याने एस्. एस्. सी., बी. ए. अगर उच्चतम डिग्र्यांची बिरुदावली लावत असल्याने आपण वेगळे, शहाणपण मिळवलेले 'सुशिक्षित'. पण त्यामुळे अशिक्षितांच्या 'शहाणपणाला' कमी लेखण्याचा अधिकार आपल्याला मिळालेला नसतो हे लक्षात ठेवलंच पाहिजे. सामान्य जीवन जगणारी प्रत्येक व्यक्ती आयुष्य जगताना, स्वत:चं अस्तित्व टिकविण्यासाठी ज्या नैतिकमूल्यांचा, आर्थिक परिस्थितीचा व सामाजिक व्यवस्थेबद्दलचा जो निष्कर्ष काढते तो बहुत प्रमाणात सारखाच असतो असे मला वाटते. (मानसिक विकृती वा दौर्बल्य घेऊन जगणारे वगळता). प्रत्येक भाषेचा अभ्यास करताना त्या त्या भाषेची समृद्धीही वाक्प्रचार म्हणींवरूनही ओळखतात. हे वाक्प्रचार वा म्हणी कुणा एका व्यक्तीने काढलेले नसतात – तर साऱ्या समाजातील घटकांचे 'त्या' निर्माण करण्यात व प्रचलित करण्यात हातभार असतो. लमाणी स्त्रीच्या घागऱ्यावर जसे छोटे छोटे आरसे आकृतिबंध तयार करतात तसे हे अशिक्षितांच्या शहाणपणाचे नमुने जीवनसंस्कृतीचे प्रतिबिंब दाखवतात. स्वत: अशिक्षित असलेले तथाकथित सुशिक्षितांना देखील मान देतात आणि म्हणूनच सुशिक्षितांनी अशिक्षितांची अवहेलना करू नये.

'एकत्र कुटुंब पद्धती' आज शहरातून फारशा प्रमाणात दिसत नसली तरी गावातून -- खेडोपाडी आजही तीच जास्त प्रमाणात दिसून येते. शहरांतून 'स्वतंत्र कुटुंबे' जास्त आढळतात. या दोन्ही कुटुंबव्यवस्थांचे फायदे – तोटे आज सर्वांना जाणवू लागलेत. स्वतंत्रपणे संसार करणाऱ्या स्त्रीने एकत्र कुटुंबातून राहणाऱ्या सर्व नातेवाईक भगिनींचे जास्तच कौतुक करायला पाहिजे. त्या स्त्रियांबद्दल जास्त आदर दाखवायला हवा –कारण आपल्या स्वतंत्र संसारात स्त्रीला जीवनाच्या साऱ्या मूलभूत भावनांचे स्वरूप – उदा. प्रेम, राग, लोभ, रुसवा, मोकळेपणा, शृंगार – उत्कटतेने अनुभवता येते. एकत्र कुटुंबात ते उपभोगायला मिळतच नाही असा अलिखित नियम नाही – पण त्या साऱ्या स्वरूपांना एक संयमित करणारी चौकट तिथे निश्चित असते कसलेही बंधन नसलेल्याला स्वातंत्र्य म्हणायचं की जे बंधनाची मर्यादा स्वीकारते त्याला खरे स्वातंत्र्य म्हणायचं हे ठरविणे कठीण आहे. आपणा सर्वांनाच आपण तेव्हढे दु:खात व दुसरे


सुखात असंच नेहमी वाटतं – तो आभास असला तरीही. एकत्र कुटुंबात राहणाऱ्या पुरुषाची जबाबदारी जास्त असते पण तसेच कौटुंबिक वस्त्राच्या सुखदुःखाच्या धाग्यांमधून त्या पुरुषाला सुखाचे धागे अधिक मिळतात. वेगवेगळ्या नात्यांचे प्रेम मिळते. स्वतंत्र संसारातील पुरुषावर फक्त त्याच्याच संसाराची जबाबदारी असते. सुखदुःखाचे धागे गोळा करत तो नवीन कौटुंबिक वस्त्र विणतो – अधिक दमतो, अधिक थकतो.

लेकुरवाळी स्त्री आणि काही कारणाने मातृत्व न लाभलेली स्त्री एकमेकींच्या वैरिणी मुळीच नाहीत. वंध्य स्त्रीला आपल्या मुलांवर माया करू न देणे, वांझ बाईची मुलांना दृष्ट लागेल म्हणून भीती बाळगणे बरोबर नाही. वंध्य स्त्रीला स्वतःचं मातृत्व फळाला येऊ शकलं नाही म्हणून व्यक्तिगत दुःख जरूर असणार पण याचा अर्थ तिची माया आटते असा नाही. लहान मुलाचं गोंडस रूप, त्याचे बालपणातील खेळ, मुलाचा वाढत असतानाचा अवखळपणा, त्याचा लुसलुशीत स्पर्श तिला आनंद देत नसेल असं म्हणणं कठोरपणाचं ठरेल. मातृत्वाच्या भावनेला असं फळाफुलाला आलेलं मातृत्व बघून कधी मृत्यू येत नाही. मातृत्वाच्या भावनेचा मृत्यू ज्या स्त्रीच्या जीवनात घडतो तो तिनेच जन्माला घातलेल्या मुलांकडून–दुसऱ्या कुणाकडूनही नाही. लेकुरवाळ्या स्त्रिया मूल नसलेल्या स्त्रीमध्ये वागणुकीने कडवटपणा आणतात. दुर्दैवाने एखादी लहान मुलांची आई मृत्युमुखी पडली तर मुलं पोरकी झाली असं आपण म्हणतो पण मुलं नसणाऱ्या स्त्रीला 'आपण' पोरकं करणार नाही याची सर्व स्त्रीवर्गानं खबरदारी घ्यायला नको का? पुरुषांचा अशा स्त्रीबद्दलचा दृष्टिकोण तर पूर्णपणे बदलायला हवा. एकदा आपण आपली जीवन–सहचरी निश्चित केल्यावर जर स्त्रीला मूल झाले नाही तर तो सर्वस्वी तिचाच दोष आहे असे मानू नये. दोष दोघांपैकी कुणाचाही असू शकतो. लग्नबंधन तोडणे हा त्यावरचा उपाय शोधणे अमानुष आहे. दुसरी सहचरी किंवा मादी न निवडता एखादे अनाथ मूल दत्तक घेऊन सहज वाढविता येईल किंवा एकमेकांना आनंद देत सहजीवन नक्की जगता येईल.

मूल होऊनही लेकुरवाळ्या स्त्रीच्या जीवनात टांगलेली दुसरी तलवार म्हणजे नुसत्या मुलीच जन्माला येणं. स्वतःला मुलगा नसणं याचं स्त्रीपुरुषांना वाईट वाटणं हे मुलीच मूल न होणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या दुःखापेक्षा खूपच कमी आहे.

नुसत्या मुलीच जन्माला येण्यामध्ये पुरुषाच्या वीर्यातील शुक्रजंतूमधील Xआणि Y क्रोमोसोममधील Y स्वरूपाचे क्रोमोसोम्स हे हतबल ठरतात असे शास्त्रीय दृष्ट्या सिद्ध झालेले आहे. गेल्या वीस वर्षांत खूपशा सुशिक्षित पुरुषांची मते या मुली होण्याबाबतीत बदलली आहेत व फक्त मुली झाल्या म्हणून मनापासून ते खंत करत नाहीत. पण बहुतांशी पुरुष अशा स्त्रीला मुलींसह सोडचिठ्ठी देऊन दुसरा विवाह करतात. वंध्य स्त्रीला नवऱ्याने सोडले तर ती नशिबाला दोष देत जिणं जगते. परंतु मुलगा नाही म्हणून मुलीसह जर नवऱ्याने स्त्रीला सोडून दिले तर त्या स्त्रीची अवस्था भविष्याच्या चिंतेने किती काळेवडून जात असेल याची पुरुषाला कल्पना येणे खरंच शक्य नाही.

सौभाग्यवती स्त्रियांना आपल्या समाजानं बहाल केलेलं सामाजिक स्वास्थ्य जेवढया उच्च प्रतीचं आहे तेवढंच अविवाहित, परित्यक्ता वा विधवा स्त्रीचं सामाजिक स्वास्थ्य नीच प्रतीचं आहे. विवाह होऊन गळ्यात काळे मणी बांधले गेले की त्या स्त्रीचा रुबाब वाढतो—मग ज्याच्या नावानं हे काळे मणी बांधले जातात तो कसा का असेना–फक्त पुरुषालिंगी असला म्हणजे झालं. स्वत:च्या कपाळावरील कुंकवाला धनी मिळाला म्हणून ती सुखावते. स्वत:कडून आपल्या अभागी भगिनींच्यावर होणारा अन्याय तिला जाणवत नाही. परित्यक्ता, अविवाहित विधवा स्त्रियांवर दूषण लावण्यात ती भूषण मानते. समाजातील सर्व स्तरांतील स्त्रियांकडून वैवाहिकतेचा अहकार जेव्हा कटू शब्दांचा पखरण करू लागतो तेव्हा त्या क्षणी साऱ्या स्त्रीवर्गाची बुद्धी भ्रमिष्ट तर झाली नाही ना ?—असाच प्रश्न पडतो. सुपातल्या जोंधळ्यांनो जात्यात भरडल्या जाणाऱ्या जोंधळ्यांना हसण्यासारखे आहे हे. दुर्दैवाने ज्यांच्यावर एकट जीवन जगण्याची वेळ आलेली आहे त्यांना दया वा कीव नको आहे. पण सहानुभूतीच्या चार शब्दांनाही त्यांना महाग करू नका. बोलतांना अशा स्त्रियांना उणेपणाची भावना न दाखवण्याची खबरदारी घेणे प्रत्येकास सहज शक्य आहे. असं न होईल तर मात्र स्त्रियांची आपण जोडू पाहत असलेली गुफण मध्येच कमकुवत होईल. एकटे जीवन जगणाऱ्या कसल्याही परिस्थितीतील स्त्रीच्या डोळ्यांत पाणी येणार नाही याकरता आपण विवाहित स्त्रियांनीच धडपडलं पाहिजे. अजाणता काही प्रसंगी आपण त्यांना दुखावलं तर लगेच आपल्या बोलण्याचा, वर्तनाचा खुलासा करायला पाहिजे. अशा स्त्रियाही समजावून घेतात. पण जाणूनबुजून काढलेले बोचणारे



शब्द वा वागणूक यांना माफी कधीही नसते कारण कुत्सित मनाची दुर्गंधी घेऊनच ते शब्द वा वर्तन प्रवाम करत असते. आपल्या मनावर व जिभेवर ताबा आणण्याचा प्रयत्न विवाहित स्त्रियांनी करायला हवा.

परित्यक्ता, अविवाहित वा विधवा स्त्रियांना पुरुषांनी सहानुभूती दाखवायची आहे ती वेगळ्याप्रकारे. गरजेच्या प्रसंगी पुरुषाला मदतीची हाक मारण्याचा आत्मविश्वास अशा नातेवाईक वा ओळखीच्या स्त्रियांना वाटला पाहिजे. – आणि अशी मदत करताना त्या स्त्रियांना मिंधेपणाची भावना येणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. अडचणीच्या वेळेला केलेल्या मदतीची परतफेड हक्काने वैयक्तिक शारीरिक सुखाच्या स्वरूपात अबलेने करावी अशी पुसटशी इच्छाही मनात आणू नये. त्यांच्या असहाय्यपणाचे भांडवल करू नये. अशा प्रसंगांच्या वेळी त्या स्त्रियांचं हळवं मन आणि पुरुषाची भावविवशता नाजूक गुंतागुंत करण्याची शक्यता जास्त असते – अशा वेळी आपल्याकडून नुसताच भावनांचा खेळ खेळण्यापेक्षा जबाबदारीने त्यांना मानाचा आधार द्यावा. असा आधार हा कधी तिरस्करणीय ठरणार नाही. विवाहित पुरुष आपल्या बायकोकडून वा इतर कुटुंबियांकडून मदतीचा हात देतील व अविवाहित, विधुर पुरुष जास्त जबाबदारीने त्यांच्याशी वागतील अशी खात्री बाळगायला काय हरकत आहे? सनाथ व अनाथ स्त्रियांच्या सुखाचा तराजू डोळ्यांत खुपण्याएवढा विजोड न ठेवण्याचा सर्व स्त्री-पुरुषांनी प्रयत्न करायला हवा.

आता सर्वांत महत्त्वाच्या नात्यातील स्त्रीची कसरत. आई म्हणून आपल्या मुला-मुलींचे दुर्गुणही कौतुकास्पद बनवायचे आणि परक्या घरातून आलेल्या मुलीला तिच्यातील गुणांची कदरही दाखवायची नाही हे बरोबर आहे का? एकदा परक्याची मुलगी सून म्हणून मान्य केल्यावर तिला आपल्या कुटुंबपद्धतीची माहिती वेळप्रसंगी द्यायचीच असते – पण ती पद्धत, ते रीतिरिवाज एकदम आत्मसात करणे सर्वांना पटकन् जमत नाही. थोडा कालावधी जावा लागतो. सुनेने हे नवीन घर, नातेवाईक आपले म्हणून विवाह होतानाच मानलेले असतात – पण त्या भावना जर मनाच्याच तळाशी राहिल्या, त्यांना पृष्ठभाग कधी गाठूनच दिला नाही तर आपणाला त्या दिसत नाहीत असे म्हणणे अन्यायाचे आहे. आत्ताचा काळ हा सुजाण नागरिकांनी सुधारणा पसरविण्याचा आहे. तेव्हा आनंदी वातावरणातील भाग्यवान सासू-सुनांनी, आई-मुलींनी एकमेकांशी

केलेली मन-मिळवणूक सर्वांना व खास करून पुरुषाला अतिशय आनंद देणारी आहे, सांसरिक सुखाचा लाभ दुणावणारी आहे. अशी शंभर टक्के मन-जुळवणी दररोजच्या व्यवहारात कुणालाच साधणार नाही. दोन्ही बाजूचं असणारं उणेपण एकमेकांस फार खटकणार नाही याची खबरदारी घेण्याचं सर्वांनी ठरवलं तर साधणार नाही असं थोडंच आहे? पाटीवरचा केलेला दररोजचा अभ्यास हा दररोज रात्री पुसून टाकायचा असतो–दुसऱ्या दिवशी पाटी ही स्वच्छच हवी. पाटीवरची अक्षरे म्हणजे काही काळ्या दगडावरची रेघ नव्हे हे स्त्रियांनी लक्षात ठेवलं पाहिजे. आपल्या जिवलगाची आई व पत्नी या नात्यात चिरफाड करणे आईला व पत्नीला सुखावह होत नाही आणि पुरुषाला तर नाहीच नाही.

स्त्रीने स्त्रीला जाणून घ्यावे....आपल्या आजूबाजूच्या स्त्रियांवर आपल्याकडून अन्याय होणार नाही; आपल्याकडून त्या शक्यतो दुखावल्या जाणार नाहीत याची सर्वतोपरी काळजी घेणे म्हणजे स्त्रीमुक्तीची अर्धी वाटचाल पुरी होते. आता पुन्हा अर्धी वाटचाल करताना पुरुषांची संगत करायची आहे—संसाराला पूर्णत्व देऊन दोघांनीही मुक्ती मिळवायची आहे.

संसारात केवळ आपल्याच सुखोपभोगांचा स्त्री वा पुरुषाने केलेला विचार बंधने वाढवतो. ज्या संसारामध्ये स्त्री आणि पुरुष या दोघांच्याही सहज प्रवृत्तींना विकसित होण्याची, उमलण्याची संधी मिळते तिथे असहनीय बंधनांचा प्रश्न येत नाही. या शतकाच्या सुरुवातीपासून आपल्या सामाजिक जीवनात स्त्रीला स्वत:तील खूपशा गुणांचा विकास करून घेण्याच्या शक्यता निर्माण व्हायला सुरुवात झाली व आता त्या शक्यतेच्या कक्षा रुंदावतच आहेत. पण सांसारिक स्त्रीला त्यातील आपल्या आवडीची गोष्ट करण्याची संधी मिळाली असता ती संधी घेऊ दिली जात नाही तेव्हा ती दुखावते—जखमी होते. दररोजच्या जगण्यात चपात्या-भाकऱ्या करताना हात पोळला म्हणून ती कांतुक करत बसत नाही. थोडीशी भगभग झाल्यावर तो चटका ती विसरूनही जाते. पण स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाची एखादी कळी उमलता उमलता जेव्हा खुडली जाते तेव्हा ती मरगळते. सुकून जाते. पतीच्या साऱ्या गुणदोषांसह त्याला स्वीकारून–त्यालाच 'सर्वस्वी' मानून आजन्म सहकार्यरत असणाऱ्या स्त्रिया खूप आहेत. आज आपल्या स्त्रीच्या स्त्री म्हणून काही भावना असतील त्या पुरुषाने समजावून घेण्याची उत्सुकता दाखवण्याची गरज आहे. त्या भावनेचा आदर करण्याची

गरज आहे. पुरुषाकडून मिळालेलं एवढं सहकार्यही स्त्रीला मोकळेपणी श्वासोच्छ्वास करायला लावेल. कोणत्याही गोष्टीचा अत्याग्रह; गुणग्राहकता, आणि थोडीशी जीवनपद्धत बदलण्याची तयारी पुरुषाने दाखवली तर त्याला कसलेही जादा बंधन बसण्याची व जीवनात ताण येण्याची परिस्थिती येण्याची शक्यता कमी आहे.

खुपणाऱ्या प्रत्येक काट्याचा नायटा होत नाही–खूपसे सलणारे काटे सहजपणे दूर करता येतात. आक्रोशणारी स्त्रियांची मने नुसती चर्चा करून शांत होणार नाहीत. प्रत्येक स्त्रीचे खुपणारे शारीरिक व मानसिक काटे वेगवेगळे असतात--वेगवेगळ्या ठिकाणी ते रुतलेले असतात. हे बोचणारे काटे काढून टाकायला जरी पुरुषांनी हात पुढे केला व एक हळुवार फुंकर घातली तरी स्त्री समाधानी होणार आहे–तिची वाटचाल ती करणार आहे.

स्त्रियांनी स्वतःचं मानसिक सामर्थ्य मिळविण्यासाठी आता धडपडायच आहे आणि ते सामर्थ्य सत्कारणी लावण्याचा प्रयत्न करायचा आहे. आपल्या इच्छा, आकांक्षा, सर्वस्वाची वा संसाराची होळी करूनच पुऱ्या करून घेतल्या पाहिजेत असं नाही–पण आपल्याला अपेक्षित असलेल्या मुक्तीची पहाट आपल्याला भावी पिढीकडून उजाडली असं कळलं तरी आनंदच आहे. आपल्याला न लाभलेल्या समाजजीवनाबद्दल हळहळत बसण्यापेक्षा विकासशील व्यक्तिमत्त्वांची ताकद भावी पिढीत उतरवण्याची जबाबदारी स्वीकारून आपल्यात मूलतः असलेल्या वंशवृद्धी व वंशसंवर्धन या प्रवृत्तींचा आदर आपण सर्वांनी केला पाहिजे. समंजसपणे एका स्त्रीने दिलेले सहकार्य दुसऱ्या स्त्रीला जोडून घेऊनच स्त्रीसंघटन चालू राहील–पुरुषाने आपल्या सत्ताविरहित वृत्तीने साथ दिली तर मुक्तीची पहाट लवकर होईल—पण रात्रीचे प्रहर हळूहळू सरले तरी पहाट ही होणारच.

१२

रक्ताचे नाते

नवरा जेव्हा जेव्हा बायकोला घराबाहेर हाकलून देतो व सांगतो की " माझा दरवाजा तुला कायमचा बंद. तू तुझ्या आईबापाकडे चालती हो. कुठेही जा पण मला तोंड दाखवू नको. " तेव्हा बहुतेक प्रमाणात अशा घराबाहेर काढलेल्या स्त्रीला मुलं असतील तर ती स्त्री एकटी कधीच निघून जात नाही. पैशाची मागणीही ती स्त्री त्या परिस्थितीत करत नाही. मात्र आपल्या मुलांना सोडून जाणं तिला मान्य नसतं. आपल्या नवऱ्याशी भांडून ती मुलांना उचलून बरोबर घेते आणि माहेरचा रस्ता धरते. मुलं सासरी ठेवून अशी स्त्री एकटीच परतल्याची उदाहरणे फार कमी आहेत.

असं विभक्त होताना नवरा जेव्हा आपल्या मुलांवरचा अधिकार सोडायला तयार होत नाही तेव्हा तो मुलांचीही वाटणी करण्याचा हट्ट धरतो. आपला मुलगा स्वत:जवळ ठेवतो व मुलीला आईबरोबर पाठवून देतो. अगदी सुशिक्षित समाजात देखील जोडप्यांना जेव्हा विभक्त होण्याची वेळ येते तेव्हा मुलं असतील तर विभागणी अशीच होते – मुलगा बापाकडे आणि मुलगी आईकडे. मुलांच्या विभागणीवरून समजा दोघांत वाद झाले तर कोर्टात जाताच तिथेही निर्णय मुलगा बापाकडे व मुलगी आईकडे असाच बहुतेक वेळा होतो.

आधीच सर्व त्रासांनी गांजलेली स्त्री मुलांचे लोढणं पायात अडकवून कशाला परतते ? मुलांना जर तिकडेच सासरी तिनं ठेवलं तर मुलांच्या पालनपोषणाचा तिचा खर्च तरी वाचेल. माहेरी अथवा स्वतंत्र राहिली तर स्वत:साठी अर्थार्जन करण्यास ती मोकळी राहील. तिचं जीवन स्वतंत्रपणे जगणं तिला अधिक सोपं जाईल. स्वत:च्या हाताने आपल्या पायात मुलांच्या बेड्या ती अडकवून घेते. हा स्त्रीचा मूर्खपणा आहे असं काहीजण या परित्यक्तेच्या जीवनाबद्दल बोलतात.

खरंच स्त्री स्वत: त्या संसारात उद्ध्वस्त झाली असताना या जंजाळात गुरफटून घेण्यास का तयार होते ? आपली आर्थिक ताकद, असुरक्षितपणा आणि मुलांच्या लालनपालनाची जोखीम अशा सर्वच पायऱ्यांवरची कसरत करण्यास तयार होणाऱ्या स्त्रीच्या मनाची घडण काय असावी ?

या अवघड परिस्थितीतही ती पैशाचा किंवा आर्थिक अडचणींचा विचार न करता, आपल्यामागे या घरात मुलांचे संगोपन होणे कठीण आहे–आपण घरी नसताना मुलांचे हाल होणे अपरिहार्य आहे ही भावना स्त्रीला इतकी क्लेशकारक होते की आपल्या मुलांना उचलून ती चालू लागते. मुलांचे होणारे हाल हे एक प्रकारे तिचेच हाल असतात.

नवऱ्याने तर बाहेर काढले. इथून पुढे कुठेही लाचारीनेच जगणे आहे. पोटाची भूक भागवण्यासाठी कष्ट तर चुकणार नाहीतच. निदान आपली मुलं आपल्यासमवेत असली तर जीवन जगण्याला थोडाफार अर्थ तरी येईल. अवहेलनेचे आयुष्य सुटण्याची एकच संधी या मुलांना मोठे केल्यानंतर मिळण्याची शक्यता आहे असा स्वार्थी पण दूरदृष्टीचा विचारही तिच्या मनात येत असण्याची शक्यता आहे.

आपल्या संसाराबाहेर आपलं पाऊल पडताच आपण ह्या घराचे दरवाजे कायमचे बंद करून घेण्यापेक्षा मुलांना जर आपल्या समवेत ठेवलं तर त्यांच्या प्रेमाखातर तरी नवरा पुन्हा आपल्याला परत बोलावेल असा भोळा भाव ती उराशी बाळगत असण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

नवऱ्याने घराबाहेर काढलेल्या स्त्रिया मुलांसहित संसारातून बाहेर पडण्याच्या कृतीवर असे वरील दोन-तीन विचार मनात चमकून जातात. पण—

नवरा-बायको विवाहबंधनाने एकत्र येतात ती कुटुंबसंस्था निर्माण करण्यासाठी. फार पूर्वी कशाला या शतकाच्या सुरुवातीपर्यंत आपल्याकडे विवाहाची निमंत्रण–

पत्रिका 'श्री. अ. ब. क. यांची मुलगी व श्रीयुत त. थ. द. यांचा मुलगा–या दोघांचा शरीरसंबंध करण्याचे योजिले आहे. तेव्हा आपण आशीर्वादास यावे' –अशी असे. विवाहाचा मूळ हेतू इतक्या स्पष्टपणे समाजासमोर मांडणे कुणालाच खटकत नसे.

एक स्त्री व एक पुरुष, एक नर व एक मादी प्रजोत्पादनाच्या कार्यासाठी एकत्र येतात हे खरं. नवरा बायकोचं नातं निर्माण होतं. सहवासाने भावबंध निर्माण होतात. मुलं जन्माला येतात. स्त्री-पुरुषांचं घर आकार घेतं. समाजाने आखलेल्या चौकटीत आपापली कर्तव्ये पार पाडत ती दोघंजण मरण येईपर्यंत जगतात. हे नवरा-बायकोचं मानायला लावलेलं नातं कृत्रिम असतं. नवरा-बायकोच्या नात्यात रक्ताच्या नात्याचा संबंध नसतो. नवरा-बायकोच्या धमन्यांतून वाहाणारं रक्त हे वेगवेगळ्या कुळीचं असतं.

पण जेव्हा फारकतीची वेळ येते तेव्हा स्त्रीच्या रक्तामांसाने वाढलेला जीव सोडून दूऽऽर जाण्याची कल्पनाही तिला सहन होत नाही. हे मुलांना सोडून जाणं स्त्रीला उमगत नाही. नऊ महिन्यांचा गर्भवास आणि नंतरच्या आठदहा वर्षांपर्यंतचे लालन-पालन तिला रक्ताच्या आणि प्रेमाच्या भावबंधनांनी पुरेपुरे वेढून टाकते. तिची आणि मुलांची नाळ जन्माला येताना तोडली म्हणून तुटत नाही. मुलगा असो वा मुलगी असो–दोन्ही जीवांना आयुष्यभर नाळेची खूण वागवावी लागते.

आपले आई-वडील व बहीण-भाऊ यांची तरी ओढ सर्व स्त्री-पुरुषांना का वाटते? भाऊ-बहीण व आई यांच्यातील नऊ मासांच्या गर्भवासाची एकात्मता सारखी असते. भावा-भावांची भावा-बहिणींची किंवा बहिणी-बहिणींची गाठ वर्षानुवर्षे होत नसेल–पण जेव्हा ती होते तेव्हा एकाच आईची आपण लेकरे आहोत हा भाव मनात खोल रुजलेला असतो. तोच त्यांना एकत्र गुंफतो. आपला सर्वांचा पिंड आईच्या गर्भाशयात वाढला, आईचा श्वास-उच्छ्वास हा आपल्या सर्वांचा श्वास-उच्छ्वास काही काळ होता हे कुणाला नाकारता येत नाही. जन्मदात्या आईला तर नाहीच नाही.

पुरुषाला आपल्या अपत्याविषयी ओढ नसते असं कुणीच म्हणणार नाही. त्यालाही प्रेमभावना असते. पण स्वत:च्या पुरुषत्वाचा एव्हढा अहंकार व दंभ त्याच्या मनात रुजलेला असतो की दुसऱ्या स्त्रीशी संग करून आपण केव्हाही

आणखी मुलं जन्माला घालू शकतो या विश्वासापायी तो या मुलांविषयी बेफिकिरी, तिरस्कार उघडपणे दाखवण्यास धजावतो. असलेल्या स्त्रीचा व मुलांचा संभाळ स्वकर्तृत्वाने करण्याऐवजी दुसरा संसार थाटून आणखी मुले जन्माला घालण्याचे 'कर्तृत्व' तो दाखवू शकतो.

स्वतःच्या आर्थिक कुवतीचा विचार पुरुष नक्कीच करत असावा असे त्याच्या जबाबदारी टाळण्याच्या वृत्तीवरून वाटते. बरं झालं मुलांची ब्याद गेली. एकटा सडाफटिंग मी कसेही जीवन जगेन. दुसरा संसार थाटीन अगर न थाटीन पण मस्त जीवन जगीन असा विचार त्याला मुलांचे पाश तोडण्यास प्रवृत्त करत असेल यात शंका घेण्याचे कारण नाही. कुठलाही गरीब बाप आपणहून आपल्या मुलांची जबाबदारी घेत नाही. कुठल्याही बऱ्या स्थितीतला बाप आपणहून आपल्या मुलांची तरी आर्थिक जबाबदारी घेण्यास उत्सुकता दाखवत नाही, अन् सुरुवातीला थोडी मदत दिली तरी कालान्तराने त्या मदतीत खंडच पडतो. जिथं जिथं बापानं मुलांची जबाबदारी घेतली आहे तो बाप सुस्थितीतीलच असतो.

आपल्या अपत्यांचे व्यवस्थित पालन कुठल्याही स्त्रीच्या मदतीशिवाय होणे अशक्य आहे हे सुद्धा पुरुषाला माहीत असते. ज्या ठिकाणी आपल्या आर्थिक कुवतीनुसार मुले संभाळण्यास एखाद्या स्त्रीची पगारी नेमणूक शक्य नसते तिथे मुलं संभाळण्याकरता म्हणूनच दुसऱ्या विवाहाचा प्रस्ताव मांडलेला कितीतरी वेळा आपण पाहतो. आपल्या मुलांना वाढविण्याची जबाबदारी घेतलेल्या पुरुषाला बहुतकरून आई, बहीण, वहिनी, आत्या, मावशी—अशा कुणा ना कुणा पत्नी-व्यतिरिक्त स्त्रीचे साहाय्य असते. म्हणजेच आर्थिक सुस्थिती व दुसऱ्या स्त्रीचे मुलांच्या संगोपनातील सहकार्यच पुरुषाला स्वतःच्या मुलांचा ताबा घेण्यास उद्युक्त करतं.

नवरा आपल्या बायकोला जेव्हा घरातून हाकलून देतो किंवा रीतसर विभक्त होतो तेव्हा स्त्री लहान मुलं असतील तर अधिकच – पण आपल्या मुलाबाळांसह घराबाहेर पडणं अधिक पसंत करते. तिचं मुलांशी असलेलं रक्ताचं नातं तिला सोडता येत नाही. नवरा जास्त व्यवहारी असतो – स्त्री अव्यवहारी असते. कोणतेही गुण-दोष या स्त्री-पुरुष वृत्तीला लावले तरी एक मात्र खरं आहे—

नवरा बायकोचं नातं कितीही थोर असलं तरी ते रक्ताचं नसतं.

१३

निळी जीवनज्योत

बाळंतपण किंवा नवीन जीवाने ह्या जगात प्रवेश करणे – ह्या निसर्गनियमानुसारच्या वंशसातत्याच्या प्रक्रियेत पुरुष कितपत भाग घेऊ शकतो ?—

—काहीही नाही. ह्या निर्मितीच्या क्रियेत पुरुषाचा सहभाग काहीही नसतो हेच उत्तर सर्वांना द्यायला पाहिजे. स्त्रीच्या देहातूनच आपल्यासारखा नवीन जीव जन्माला येतो हे उघड सत्य नाकारण्याचा प्रश्नच उद्भवत नाही – मात्र जेव्हा जेव्हा अशी निर्मिती त्याच्या नजरेस पडते तेव्हा निसर्गाच्या मूलभूत सामर्थ्याची जाणीव नसल्याने ही सारी प्रक्रिया ' किमया ' वाटते.

बाळंतपणातील वेदना व सुखदुःख यावर स्त्रीची संपूर्ण मालकी आहे. ह्या एकाच शारीरिक व मानसिक खळखळीत स्त्री संपूर्ण एकान्त भोगते – सम्राटाशिवाय ती सम्राज्ञी ठरते. पुरुषाला संपूर्ण वंचित असलेले हे सुख स्त्रीच उपभोगिते--" अहो आम्ही कुठे आग्रह धरतोय ते सुख वा दुःख आम्हाला अनुभवायचे आहे म्हणून -- तुमचं बाळंतपण तुम्हा स्त्रियांनाच लखलाभ होवो. ही जबाबदारी निसर्गाने आम्हाला दिलेलीच नाही व म्हणूनच आम्ही मुक्त आहोत – " बाळंतपण व त्यातील पुरुषाचा सहभाग ह्यावर चर्चा सुरू केली की प्रत्येक पुरुष जनात व मनात अशीच वाक्ये बोलतो. खरं आहे. निसर्गाने

नवीन जीव जन्माला घालायची जबाबदारी पुरुषावर टाकलेली नाही. पुरुषाचा मुक्ततेचा आनंद हा फसवा आहे, कारण निसर्गाने तुम्हा पुरुषांना स्त्रीपेक्षा कमी दर्जाचं ठरविलं आहे. तुमची ही कमतरता जर तुम्हा पुरुषांना वरदान वाटत असेल तर ते चुकीचे आहे. जीवनातील विविध विषयांच्या, विचारांच्या, वस्तूंच्या निर्मितीविषयी (Creation) व त्या सामर्थ्याविषयी अभिमान बाळगणाऱ्या, स्तुतिसुमनांची खैरात करून घेण्यात रमलेल्या पुरुषाने एकच लक्षात ठेवावे – (Creation) किंवा अस्सल निर्मिती स्त्रीकडूनच होते – आणि त्या निर्मितीची प्रक्रिया पुरुषाच्या अस्तित्वाशिवाय घडू शकते. बाळंतपणाची क्रिया दूरस्थ राहून पुरुष पाहू शकतात पण त्यांचा प्रत्यक्ष सहभाग नगण्य असतो; नव्हे किंचितही नसतो.

सर्व जगात, जिथं जिथं मानववसाहती पुरातन कालापासून आहेत तिथं पुरुषाला निश्चितपणे जाणवलं की, स्त्री ही आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहे. स्त्रीचा पुरुषांनी आदरच केला. त्याने निर्माण केलेल्या प्रत्येक भाषेत स्त्रीचा गौरव केला. आपल्या भारतीय संस्कृतीत तर ' आई ही देवासमान आहे ' हे प्रथम लिहिले. आईचं महत्त्व स्वर्गापेक्षा थोर आहे म्हणून मानलं. जी गोष्ट आपल्या मनाला पटते तिच्या अनुसार तशी वागणूकही असायला हवी. मग स्त्रीचे श्रेष्ठत्व पटूनही आजच्या समाजात पुरुषाकडून होणारी तिची अवहेलना, पुरुषाची तिच्या-विषयीची तुच्छता ही स्त्रीपेक्षा आपण कमी दर्जाचे आहोत ह्या व्यंगावर पांघरूण घालून रुबाब करण्याचीच धडपड म्हणावी लागेल.

आजच्या काळांत स्त्रीला ' समानतेची ' मागणी करावी लागावी इतकं तिचं पारडं खाली घसरलं कसं ? – हे चित्र रेखाटायचं म्हटलं तर अनेक प्रसंग-मालिका पुरातनकालापासून आजपर्यंत नजरेसमोर तरळायला लागतात.

पुरुष जेव्हा संपत्ती व सुखाची साधने गोळा करू लागला तेव्हा आपल्या मृत्यूनंतर ह्या सर्वांचा उपभोग कुणी घ्यावा ? – त्यावर कुणाची मालकी असावी —याचा विचार करू लागला तेव्हा आपल्या ' पितृत्वा 'ची जपणूक आपण जर काटेकोरपणे केली तर आपल्यापासून निर्माण झालेला जीवच या मालकीस जवळचा आहे असे त्याला नक्की वाटले असणार. आपणच नवीन जन्माला आलेल्या जिवाचे पिता आहोत याची निश्चिती मनास यावी म्हणून आपणास आवडलेल्या वा आपण जिच्याशी संग केलेला आहे तिचा दुसऱ्या पुरुषाशी संबंध

येऊ नये म्हणून त्या स्त्रीच्या हालचालीवर प्रथम त्याने बंधने घालण्यास सुरुवात केली आणि तिची वागण्याची विशिष्ट पद्धत हळूहळू पक्की केली. नंतरच्या कालावधीत पुरुषाला आपली स्त्री दुसऱ्या पुरुषाच्या संबंधात येण्याच्या जेवढ्या जेवढ्या शक्यता दिसू लागल्या तेवढी तेवढी तिच्यावरची बंधने तो अधिक घट्ट करू लागला. सामाजिक चालीरीतीच्या नावाखाली तिला त्याने कैदी केलं आणि धार्मिक पाप-पुण्याचं भलं मोठं कुलप बसवून स्वतःचा कर्तेपणा पुरुष मिरवायला लागला.

स्वतःच्या वंशजाचं शुद्ध रूप पाहण्यासाठी पुरुषानं कुटुंबातील स्त्रीची जागा घराच्या उंबरठ्याबाहेर नाही असं निश्चित केलं. घरात राहून कुटुंबाची देखभाल करणाऱ्या स्त्रीला 'गुणवान' बनविलं. आपलं नखही परपुरुषाच्या नजरेला न पडू देणाऱ्या स्त्रीला 'पतिव्रता' बनविलं, घराबाहेर वावरणाऱ्या स्त्रीला 'पतिता' ठरविलं. एकविसाव्या शतकाकडे धावत असताना खूपशा पुरुषांच्या मनात आजही घराबाहेर कार्यक्षेत्र निर्माण करणारी स्त्री 'चालू' आहे ही भावना संपूर्णपणे गलेली नाही. घुंगट, गोषा, बुरखा घालणाऱ्या स्त्रियांना 'शालीनता' प्रदान केली अन् तो न पाळणाऱ्या स्त्रियांना 'उच्छृंखलपणा 'च लेबल लावलं.

स्त्रीनं स्वतःच्या निर्मितीची असलेली ताकद संपत्ती म्हणून स्वतः न वापरता पुरुषाला भांडवल म्हणून वापरायला दिली – आणि ती गुंतून पडली. नऊ मासांचं गर्भारपण व नंतर जन्मलेल्या मुलांचे संगोपन करताना एकाच पुरुषाने दिलेले संरक्षण, सुख व स्वास्थ्य तिला सुखावून गेलं यात शंका नाही. स्वतःची शारीरिक व मानसिक स्थित्यंतरे यांनी तिची नैसर्गिक कामवासना वाढत्या वयाबरोबर कमी झाली असण्याची शक्यता तर नाकारता येतच नाही व म्हणूनच एकाच पुरुषाशी संबंध ठेवून जीवनाला येणारं स्थैर्य तिनं सोडलं नसणार.

आजही जगात जिथं एक स्त्री व अनेक पुरुष (Polyandry) अशी कुटुंबपद्धती अस्तित्वात आहे तिथे त्या स्त्रीला कामजीवनातील वैचित्र्य अनुभवण्याकरता ती पद्धती रूढ झाली नसून जमातीतील पुरुषांची संख्या जास्त व स्त्रियांची संख्या कमी अशी असल्यामुळे ती कुटुंबपद्धती झाली आहे. खूपशा आदिवासी जमातीतही वयात आलेले स्त्री-पुरुष त्यांचे कामजीवन मुक्तपणे अनुभवतात. पण काही कालानंतर त्यातील तरुण मुलीही विवाह करून एकाच पुरुषाशी संसार थाटण्याचे पसंत करतात. कामजीवनातील वैचित्र्याची स्त्री-

पुरुषातील आवड किंवा कामोपभोगाच्या इच्छापूर्तीचे स्त्री-पुरुषांतील कमी–जास्त प्रमाण जीवन जगताना आपण सारेजण पाहात असतोच. पण काही स्त्रियांचे अपवाद वगळता बहुतेक स्त्रिया एकपतित्वच स्वीकारतात, असे दिसण्यात येते.

स्त्रीनं स्वत:ला मिळालेलं सुखाचं तबक आनंदानं स्वीकारलं पण ते तबक तसं तकलादू होतं हेही तिच्या लक्षात आलं.

गेल्या दीड-दोनशे वर्षांत स्त्री-जीवन झपाट्याने बदलले. स्त्रीला शिक्षण व आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्यामुळे तिच्या चाकोरीबद्ध जीवनाच्या कक्षा ओलांडण्यात ती यशस्वी झाली. स्वत:ला आवडणाऱ्या खूपशा गोष्टी आयुष्यात प्रत्यक्ष करून बघण्याची संधी मिळावी–त्या संधीचा उपयोग करून स्वत:चे व्यक्तिमत्त्व संपन्न करण्यासाठी ती धडपडू लागली. अशा प्रयत्नात तिला जिथे जिथे अयोग्य वागणूक आढळली तिथं ती पुरुषाला विचारांनी, बोलून, पटवून, बंधनांची जाणीव करून द्यायला लागली. आज जेव्हा या बंधनांच्या विरुद्ध स्त्रिया बंड करण्याची वृत्ती दाखवतात ती पुरुषाला आवडत नाही. मनातून पटूनही उघडपणे काही चुकांची कबुली देणे व बदल करण्याचे आश्वासन देणे बहुतांशी पुरुषवर्गास जड जाते. सुजाणपणे विचार न करणारे पुरुष लगेच स्वत:ला तिच्या भूमिकेत नेऊन बसवितात आणि निव्वळ त्या कल्पनेतील भूमिकेतही अस्वस्थ होतात. निव्वळ त्या कल्पनेनेही व्याकुळ होतात. पण एखाद्या खटकणाऱ्या गोष्टीबद्दल विरोध दाखवणे म्हणजे लगेच त्या परिस्थितीचे दुसरे टोक गाठणे असे नसते. स्त्रीने तिला बोचलेले विचार पुरुषाकडे उघडपणे मांडले तर लगेच ती काही स्वतंत्र होऊन पुरुषाला बंधनात अडकवणारच असा त्या बोलण्याचा अर्थ होत नाही. कारण जीवन जगताना जिथे हो किंवा नाही ही टोकाचीच भूमिका घ्यावी लागते अशी परिस्थिती फार कमी वेळा उभी राहते.

अर्थार्जन, स्वत:च्या जीवनाचे पोषण, वंशवृद्धी आणि नवीन जन्माला आलेल्या जीवाचे लालन-पालन–हे सर्व एकटी स्त्री करू शकणार नाही याची स्त्रीवर्गाला पूर्ण कल्पना आहे (काही जिद्दी अपवाद सोडले तर). किंबहुना आधुनिक, सुशिक्षित व कर्तबगार स्त्रीला जीवनात पुरुषाची किती गरज आहे, मुलांच्या संगोपनात पुरुषाचा सहभाग किती आवश्यक आहे ह्याची जास्त चांगली कल्पना आहे. म्हणूनच स्त्रीमुक्तीचे विचार प्रगट करताना व्यक्ति-स्वातंत्र्याच्या कितीही गप्पा ती करत असली तरी जेव्हा एखाद्या कौटुंबिक

तणावाच्या प्रसंगी पुरुष तिला चालती हो म्हणाला, किंवा मुलाबाळांसह तिला घरातून घालवून देण्याची भाषा बोलला तरी ती स्त्री सहजासहजी अशी उठून घराबाहेर जात नाही.

यात तिच्या स्वार्थाचाच भाग अधिक आहे असं आपण म्हणतो अन् थोड्या प्रमाणात तो आहेही. पण स्वतःचे वय, आर्थिक परिस्थिती, समाजातील टाकलेल्या स्त्रीबद्दलची उपेक्षितपणाची भावना, आई-वडील व हितसंबंधीयांची मानसिक कुचंबणा, मुलांचे भावी जीवन या सर्वांचा विचार करून ती अपमान विसरण्याचा जमेल तसा प्रयत्न करू लागते. जेव्हा विभक्त होण्याशिवाय दुसरा पर्यायच नाही अशी परिस्थिती निर्माण होते तेव्हा मात्र ती सारे सुप्त धैर्य गोळा करते आणि येणाऱ्या परिस्थितीला तोंड देण्यास सज्ज होते. विभक्त होणे हे स्त्री व पुरुष या दोघांनाही खरे म्हणजे अपमानकारकच आहे, मुले असतील तर अधिक गुंतागुंतीचे आहे. एकदा उपभोगिलेले सुरक्षित जीवन विस्कटले गेल्यावर स्त्री पुरुषांचे विभक्त जगणे कसे दिसते? एकाकी स्त्री ही वरकरणी भौतिकदृष्ट्या आपणाला विस्कळित झालेली दिसते, पण मानसिकदृष्टीने पुरुष हा जास्त उद्ध्वस्त झालेला दिसेल. सर्व तऱ्हेचे स्वातंत्र्य असूनही पुरुष अधिक खचलेला असेल. एकटे स्त्री-जीवन जगतानाची धडपड ही धडाडी ठरेल व एकाकी पुरुषाने केलेली जीवन जगतानाची धडपड केविलवाणी ठरेल. दोघांनाही पुढील जीवन जगताना प्रचंड तडजोडी कराव्या लागतील तेव्हा ह्या प्रचंड तडजोडी करण्यासाठी लागणारी ताकद मुळात ती परिस्थती निर्माण न होऊ देण्यासाठी दोघांनीही खर्च केली तर कुठे विघडणार आहे?

स्त्रीमुक्तीचे विचार, स्त्री-स्वातंत्र्याबद्दलची चर्चा एखाद्या कुटुंबात सुरू झाली की तिची परिणती विस्फोटातच झाली पाहिजे असं नाही—पण दुर्दैवाने बहुतेक वेळा अशा चर्चांचा शेवट नाराजीत होतो. पुरुषप्रधान कौटुंबिक जीवनात पुरुषाला काही गोष्टी मनापासून पटल्या तरी त्याचा उघडपणे स्वीकार करणे त्याला अपमानास्पद वाटते. स्वतःची जीवनपद्धती बदलण्याची कल्पना त्याला त्रासदायक वाटते आणि त्यामुळे परंपरागत चालत आलेल्या विचाराचे प्रतिपादन करत राहणे त्याला भाग पडते.

स्वतःच्या न्याय्य हक्कांचे समर्थन करताना स्त्रीची जागा ही मुळातच आणि सततच आरोपीच्या पिंजऱ्यातली असणं योग्य आहे का? आजच्या आधुनिक,

शिक्षित, कर्तबगार स्त्रीलाही स्वत:चं घर मोडणं ही कल्पना असहनीय असते आर्थिक, मानसिक व सामाजिक तणावांचे ताण आपल्या जीवनात येऊ नयेत म्हणून ती बहुतेक वेळा शाब्दिक चकमकीच्या वेळी गप्प बसते. फेरविचार करते. झालेल्या चर्चेत स्वत:ची हार स्वीकारते व जोडीदारास श्रेष्ठत्व देते. खूपशा गोष्टी मनाला लावून न घेता दररोजचे जीवन थोड्याफार उत्साहाने सुरू करते. पण दिसणारी परिस्थिती जरी पूर्ववत् वाटली तरी तिच्या मनात धुमसणारी घुसमट प्रचंड असते. आपल्या जाणिवा जागृत झाल्या नसत्या तर बरं झालं असतं असे म्हणण्याची तिच्यावर वेळ येते. मानवी जीवनाचं अपुरेपण तिला काही क्षणी तरी फार जाणवतं. आपल्या तथाकथित अशिक्षित व व्यक्तिस्वातंत्र्याची लसही न लागलेल्या भगिनींचा ती काही क्षणांपुरता का होईना हेवा करते. त्या भगिनींच्या उपजत शहाणपणाच्या वापराचे कौशल्य तिला अस्वस्थ करते—त्या शहाणपणाच्या मागे दडलेली सुप्त ताकद तिला नक्की जाणवते.

मग जीवनसंघर्षात आलेली मनाची बधिरावस्था मूकपणे स्वीकारायची का? जीवनात आलेली बधिरता स्वीकारणे म्हणजे चैतन्याचा अपमान नाही का? परंपरेने, संस्काराने मृतवत् झालेल्या स्त्री-जाणिवांना चेतना द्यायलाच हवी.

पण मृतवत् चेतनांना जागृत करण्याचे काम करावयाचे नाही किंवा या चेतनांना जागृत करण्याचे कामच आम्ही अंगीकारिले आहे असे नकारार्थी - होकारार्थी भाव स्त्री-पुरुषांनी मनाशी बाळगणे चूक आहे. व्यक्तीच्या जीवनात हा महत्त्वाचा क्षण आहे. जीवनात झुंजताना व्यक्तीला अनेक कसोटींच्या प्रसंगांतून जावे लागते—अशा एखाद्या प्रसंगीच, व्यक्तीची मृतवत् जाणिवेला जागृत करण्याची गरज जेवढी तीव्र असते तेवढ्याच तीव्रतेने त्याची जाणीव जिवत होत. ह्या जाणीव-जागृतीचा क्षण शिकवता येत नाही—लादता तर येतच नाही.

घनदाट जंगलामध्ये सोसाट्याचा वारा घुसतो आणि एक ठिणगी तयार होते. हां हां म्हणता त्या छोट्याशा ठिणगीचे रूपांतर वणव्यात होते—पुरे जंगल भेदरून उठते. बेचिराख होऊन जाते.

आपण थोडेच मनुष्यजात बेचिराख करण्याचा विचार करतोय? मुळीच नाही. त्या कामात जगातील सर्व शास्त्रज्ञांना गुंतविण्याचे काम राजकारणी वृत्तीने करून ठेवले आहे. स्त्रीच्या मनातील काही चेतना ह्या मृतवत् झालेल्या आहेत-


मृत नाहीत. वाळलेल्या लाकडामध्ये अग्नी निर्माण करण्याची ताकद सुप्त असते. या मृतवत् चेतनांची आपण आज जी वाळलेली लाकडे करू पाहतोय ती परिस्थिती टाळण्याचा प्रयत्न केला तर? आजच्या काष्ठवत् चेतनांतूनही काही ठिणग्या ह्या आपोआप निर्माण होणार आहेत—वणवे पेटणार आहेत—पेटलेले आपण सर्वजणच पाहात आहोत. या ठिणग्यांमधून पेटणाऱ्या आगी जर आपण शमवू शकलो नाही, त्यांची दखल घेऊन वेळीच उपाय योजिले नाहीत तर मात्र हाती फक्त राखच उरणार आहे. मात्र ती राख हातात घेऊन सारे समाज-शास्त्रज्ञ, विचारवंत, उद्योगपती व राजकीय नेते आता या राखेमधून पुन्हा जीवन निर्माण करू या म्हणून बसले तर ते मात्र शक्य नाही.

स्फुलिंगाने निर्माण होणाऱ्या आगीला घाबरून चालणार नाही—आग ही उबदारकही असते. ती ऊब चेतना निर्माण करणारी असते. तिचं चेतना प्रज्वलित करणारं रूप हाती घेऊन आपण जीवन तेजोमय करू या, जीवन अधिक सुंदर करू या, असं ठरविण्यात काही आभाळ तर कोसळत नाही. स्त्री विरुद्ध पुरुष असं हे युद्ध मुळीच नाही एकमेकाला पूरक साथ देत ह्या दोघांना स्वातंत्र्यासाठी लढायचं आहे. स्त्री आणि पुरुष या दोघांनीही यातील यश मिरवायचे आहे.

चैतन्याचं रूप नेहमीच लोभसवाणं असतं. हे लोभसवाणं रूप आपल्या हयातीत आपण नाही पाहू शकलो तरी फारसं बिघडणार नाही. पुढची पिढी वा त्यापुढील पिढी नक्की समाधानी जीवनाचा लाभ घेईल. आत्ता समाजाची स्थिती समाधानी जीवनाचं रूप आकलन करण्याची शक्ती गमावून जाण्याच्या अवस्थेत आहे. तेव्हा जागृती येण्यासाठी ह्या पिढीत आगीचे डोंब उसळण्याचाच काळ आहे. ह्या आगात काहींचे बलिदान आहे. अनेकजणांची घुसमट आहे, तडफड आहे—तगमग आहे. स्त्रियांची जागृती यावर विचार करतानाही नुसते स्त्रीवाचक शब्द मनात उमटत नाहीत. कारण ज्या समाधानी, सुखी पिढीचे रूप आपण रेखाटत आहोत ती स्त्री-पुरुषांची पिढी आहे. तो समाज दोघांचाही आहे. म्हणूनच या आगीत होणारी बलिदाने स्त्रियांप्रमाणे पुरुषांचीही असतील, मनाची घुसमट दोघांचीही असेल आजच्या समाजातील स्त्री-पुरुषांच्यावरील न्याय-अन्यायाचा जेवढा असमतोल असेल तेवढंच प्रमाण ह्या बलिदानाचं आणि घुसमटमारीचं राहणार आहे.

मातृत्व आणि पितृत्व या दोन्हींचं महत्त्व जाणून येणारी पिढी Blue, Blue my world is Blue असं गाणं नक्कीच गाईल. ते जीवनगाणं स्वागतार्ह आहे. निळं आकाश, निळा समुद्र याप्रमाणे या नीलमय जगातील जीवनज्योतही निळीच असेल—आणि ती तशी निळीच हवी. गर्द निळीच हवी—कारण निळ्या ज्योतीने कशावरही कधीच काजळी धरत नाही.




REFBK-0025605